* नागपूर *

* वर्ष ५५ * अंक १६७ *

बुधवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२५

किंमत रु. २/- + वितरण खर्च रु. १/-

एकूण किंमत रु. ३/- पाने १२

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com




# अकोल्यात शासकीय रुग्णालय परिसरात दारूच्या नशेत दोघांमध्ये वाद

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १६ :

अकोला शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या परिसरात एका भटक्या व्यक्तीचा दगडाने ठेचून निर्घृण खून झाल्याने खळबळ उडाली आहे. मंगळवारी पहाटे ४.३० च्या सुमारास ही घटना घडली असून, यामुळे रुग्णालयाच्या सुरक्षा व्यवस्थेवर आणि बंद असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शांताराम शिवराम गोपनारायण (रा. घुसर) नावाचा व्यक्ती रुग्णालय परिसरात झोपला होता. त्यावेळी, दारूच्या नशेत असलेल्या दोन व्यक्तींमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्याने एकाने शांतारामवर दगडाने हल्ला केला, ज्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेत हल्लेखोरही

## एकाचा दगडाने ठेचून खून ; आरोपी जखमी अवस्थेत ताब्यात



जखमी झाला असून, त्याच्यावर त्याच रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तो शुद्धीवर आल्यानंतरच त्याची ओळख आणि खुनाचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले.

**सुरक्षा यंत्रणा कुचकामी, सीसीटीव्ही बंद**

रुग्णालय परिसरात मोठ्या प्रमाणात भटक्या लोकांचे वास्तव्य असते. त्यांच्यातील वादामुळे रुग्णांची आणि नागरिकांची सुरक्षितता धोक्यात येत आहे. ही घटना घडल्यामुळे रुग्णालयाची सुरक्षा व्यवस्था कुचकामी असल्याचे समोर आले आहे.
याव्यतिरिक्त, रुग्णालयातील अनेक वॉर्ड आणि महत्त्वाच्या ठिकाणी बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरे गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहेत, ज्यामुळे पोलिसांच्या तपासात अडथळे येत आहेत. या घटनेमुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी रुग्णालय प्रशासनाकडे सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याची मागणी केली आहे.

शेअर मार्केटमध्ये जास्त नफा देण्याचे आमिष; आरोपी जेरबंद

सायबर पोलिसांनी २० लाख २२ हजार २९०रुपयांची आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणातील आरोपीस अटक केली आहे.आरोपी हा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री येथे वास्तव्यास होता.
४ जून २०२४ रोजी फिर्यादी योगेश अर्जुनजंजाळ (३२), रा. विठ्ठल नगर चौक, मोठी उमरी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार,आरोपीने शेअर मार्केटमध्ये जास्त नफामिळवून देण्याचे आमिष दाखवूनत्यांच्याकडून २० लाख २२ हजार २९०रुपयांची इतकी रक्कम घेतली होती. मात्र,त्यानंतर फसवणूक झाल्याचे लक्षातआल्यावर त्यांनी पोलिसांत तक्रार नोंदवली.
या प्रकरणी फसवणूक तसेचमाहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (सी)अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.
सायबर पोलिसांनी तांत्रिक माहितीच्याआधारे तपास सुरू करून आरोपीचा माग काढला. तपासात आरोपी अल्ताफ अली उर्फ युसूफ अली सय्यद (४२), रा. धनगरगल्ली, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर हा असल्याचे स्पष्ट झाले.
पोलिस पथकाने संभाजीनगर येथे जाऊन त्याला ताब्यात घेतले. आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याला पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. कारवाई सायबर पोलिस निरीक्षक मनीषा तायडे यांच्या पथकाने केली.

# विकास कामात घोळ; अधिकाऱ्यांचे वाहन अडवले : जि.प.मध्ये ठिय्या

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १६ :



सात दिवसात चौकशी करून अहवाल सादर करा, सीईओंचा आदेश

पातूर तालुक्यातील चरणगाव येथील ग्रामस्थ मूलभूत सुविधा व विकास कामांच्या घोळप्रकरणी कारवाई न झाल्याने सोमवारी ग्रामस्थआक्रमक झाले. त्यांनी जिल्हापरिषदेत धाव घेत ठिय्या आंदोलनकेले आणि अधिकाऱ्यांचे वाहन अडवत तेथेच बसले. ग्रामस्थ वअधिकाऱ्यांमध्ये खडाजंगी झाली.ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांना जाबविचारला. सहाय्यक गट विकासअधिकारी व ग्रामस्थांमध्ये शाब्दिकचकमकही झाली. अखेर सातदिवसात चौकशी करून अहवालसादर करण्याचा आदेश मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांना जारीकेला. १५व्या वित्त आयोगाच्या निधीतचरणगाव ग्रामपंचायमध्ये अनियमितता झाल्याची तक्रार काहीसदस्यांनी जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांकडे केलीहोती. ई-निविदा प्रक्रिया न करतासभेची मंजुरी किंवा जमा-खर्चनदेता १४ लाख ६५ हजार ५०० रुपयेअधिकृतरित्या काढल्याचा आरोपतक्रारीत केला होता. निधीतूनसाहित्य खरेदी झाले नसून, विकासकामेही करण्यात आली नाहीत,असेही तक्रारकर्त्यांचे म्हणणे होते.याप्रकरणी प्रशासकीय व फौजदारीकार्यवाही व्हावी, अशीही मागणीकरण्यात आली. गावात पाणीशिरल्याने उपाय योजना करण्यासहअन्य मागण्यांसाठी ग्रामस्थांनी २९ऑगस्ट रोजी पंचायत समितीमध्येधाव घेतली होती. त्यानंतरकारवाईसाठी ग्रामस्थ,लोकप्रतिनिधींनी जिल्हा परिषदेतधाव घेत ठिय्या आंदोलन केले होते.मात्र यावर कारवाई न झाल्याने १५सप्टेंबर रोजी जि.प.मध्ये धाव घेतग्रामस्थांनी आंदोलन केले. अकोला बीडीओंकडे चौकशीचरणगाव येथील चौकशीबाबतमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनानिवेदन देण्यात आले होते.

# नागठाण्याचा वेद सोळंकेचा जागतिक स्तरावर ठसा

## १३ विद्यापीठांची ऑफर ; हाँगकाँग विद्यापीठात प्रवेश, ४० लाखांची शिष्यवृत्ती

■ महासागर प्रतिनिधी,
वाशीम, दि. १६ :



तालुक्यातील नागठाणा गावातील वेद सोळंकेने जागतिक पातळीवर आपल्या मेहनतीचा ठसा उमटवत नवा इतिहास घडवला आहे. जगभरातील तब्बल १३ नामांकित विद्यापीठांकडून पदवीपूर्व शिक्षणासाठी प्रवेश मिळाल्यानंतर त्याने आशिया खंडातील क्रमांक २ आणि जागतिक स्तरावर ११ व्या क्रमांकावर असलेल्या प्रतिष्ठित हाँग कोन्ग विद्यापीठात प्रवेश घेतला आहे.
वेदने पारंपरिक विज्ञान-वैद्यकीय शिक्षणाऐवजी कला शाखेला प्राधान्य दिले. हा निर्णय त्याच्या धाडसाचा पुरावा ठरला. संभाजीनगर येथील नाथ व्हॅली शाळेत त्याने बारावीत सीबीएसई परीक्षेत तब्बल ९७% गुण मिळवले, तर राज्यशास्त्रात शंभर टक्के गुणांची कमाई केली. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या प्रमाणपत्रे, शैक्षणिक सहभाग व सामाजिक कार्यामुळे त्याचे प्रोफाइल जागतिक विद्यापीठांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले.
वेद हा मर्सिडीज-बेन्झफेलो, राईज जागतिक विजेता तसेच पॉप मुव्हमेंट पुरस्कार विजेता आहे. दहावीत असतानाच त्याने संयुक्त राष्ट्र मुख्यालयात प्रभावी भाषण केले होते, तर अलीकडेच ऑक्सफर्ड विद्यापीठात झालेल्या 'राईज समिट'मध्ये त्याने शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या होत्या.
या भाषणाने जागतिक श्रोत्यांच्या मनाला स्पर्श केला आणि सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरलही झाले.
त्याच्या कामगिरीमुळे इंग्लंडमधील ४, अमेरिकेतील ३, युरोपातील ३, आशियातील २ आणि ऑस्ट्रेलियातील १ अशा १३ विद्यापीठांकडून प्रवेशाच्या ऑफर्स त्याला प्राप्त झाल्या. उच्च शिक्षणासाठी त्याला राईज फेलोशिप अंतर्गत दरवर्षी ४० लाख रुपयांपेक्षा जास्त शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे.
यामुळे त्याचे जागतिक दर्जाचे शिक्षण सुलभ होणार आहे. वेद याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.
सध्या वेद पूर्ण शिष्यवृत्तीवर हाँग कोन्ग विद्यापीठात एआय, पर्यावरणशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल आणि समाजशास्त्र या विषयांचा अभ्यास करत आहे.
त्याचा शैक्षणिक प्रवास केवळ यशापुरता मर्यादित न राहता समाजपरिवर्तनाच्या दिशेने चाललेला आहे. नागठाण्यासारख्या छोट्या गावातून जागतिक पातळीवर पोहोचण्याची प्रेरणा वेदने दिली आहे.

## अनुसूचित जमाती आरक्षणासाठी सुरू केलेल्या उपोषणाची सांगता

**मानोरा:** गोर बंजारा समाजास महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी रमेश उर्फ सोनू पवार, रा. उमरी खुर्द, व सकल बंजारा समाज तर्फे ९ सप्टेंबरपासून पोहरादेवी बंजारा विरासत नंगारा येथे आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते.
या उपोषणाची दखल आमदार सई डहाके यांनी घेतली. त्यांनी उपोषणस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली. यावेळी उपविभागीय अधिकारी देवरे, गटविकास अधिकारी, तहसीलदार यांच्यासह शासकीय अधिकारी उपस्थित होते.
आमदार डहाके यांनी या प्रश्नाची संपूर्ण माहिती जाणून घेतल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून सकारात्मक मार्ग काढण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यांच्या आश्वासनानंतर उपोषणकर्त्यांनी समाधान व्यक्त करत उपोषण मागे घेतले.
गेल्या नऊ दिवसांपासून सुरू असलेल्या या उपोषणाला अनेकांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला होता. मात्र आमदार डहाके ह्यानी उपोषण मागे घेण्यात महत्वाची भूमिका बजावली.

# बाजारात आल्या चांदीच्या कामधेनू

## ७०० रुपयांपासून सुरुवात, नक्षीदार मूर्तीचा मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा, दि. १६ :



पितृपक्षाला ८ सप्टेबर पासून सुरुवात झाली असून श्राद्धानंतर ब्राह्मणाला अथवा आपल्या पितरांच्या नावे जेवणाऱ्याला गाय दान देण्याचे महत्त्व सांगितले गेले आहे. प्रत्यक्षात आता गाय देणे सगळ्यांनाच शक्य नसल्याने चांदीची गाय दान देण्याची परंपरा सुरु झाली आहे. त्याअनुशंगाने बुलडाण्यातील सराफा बाजारात मोठया प्रमाणात चांदीच्या गाई उपलब्ध करुन देण्यात आल्या आहे.
सध्या सराफी पेढ्यांमध्ये अगदी ५ ग्रॅम पासून १०० ग्रॅम पर्यंतच्या वजनात चांदीच्या गायी उपलब्ध असून त्यांना पसंती मिळत आहे. विशेष म्हणजे, मुंबई येथून या कमी वजनातील आतून पोकळ असलेल्या गायीच्या मूर्ती बुलडाण्यात पोहोचल्या आहेत. तर बुलडाण्यातील कारागिरांनी तयार केलेल्या भरीव गायींच्या मूर्तीनाही मोठी मागणी आहे. पितृ पक्षात चांदीची गाय दान देण्याला विशेष महत्त्व आहे.
हिंदू धर्मशास्त्रानुसार गाय ही पवित्र मानली जाते. तिला ''कामधेनू'' असेही संबोधले जाते. गाय दान केल्याने सर्व पापांचा नाश होतो आणि दान करणाऱ्याला व त्याच्या पूर्वजांना मोक्षप्राप्ती सोपी होते, असा गरुड पुराणांमध्ये उल्लेख आहे. ब्राह्मण किंवा गरजू व्यक्तींना हे दान दिले जाते.
याचमुळे सराफा पेढ्या मध्ये गाय आणि वासरू असलेल्या चांदीच्या मूर्तीच्या मागणीत दुप्पट वाढ झाली आहे. आकाशाला पोहोचला चांदीचा भाव केवळ बुलडाणा नव्हे तर संपुर्ण राज्यात सध्या चांदीचा भाव सोन्याच्या भावापेक्षा अधिक वरचढ झाला आहे.
चांदीचा भाव सध्या १ लाख २९ हजार असा पोहचला आहे. दिपावली दरम्यान सदर भाव आणखी वाढण्याची शक्यता सराफा बाजारात व्यक्त केली जात आहे.
पोकळ आणि भरीव अशा २ प्रकारच्या मूर्तीचे पर्याय भअगदी पाय ग्रॅमपासून १०० ग्रॅम व त्यावर मागणी असेल त्या वजनात चांदीची काम धेनू आणि वासरू उपलब्ध आहेत.
विशेष म्हणजे हलक्या वजनाच्या गायीची मूर्ती ही मुंबई येथून येतात तर बुलडाण्यातही निर्मित भरीव चांदीच्या गायींना मागणी आहे.
**सारंग वर्मा, सराफा.**

## पुराच्या पाण्याने पिकांचे प्रचंड नुकसान शेत जमीन गेली खरडून पिकेही गेली वाहून



**मानोरा,** तालुक्यातील कोंडोली येथे १३ सप्टेंबर रोजी कोसळलेल्या मुसळधार पावसाने दोन शेतर्क?यांच्या ६ एकर सोयाबीन पेरणी केलेल्या शेतात अरुणावती नदी व गोखी नाल्याचे पुराचे पाणी शेतात गेल्याने शेती खरडून गेली व पिकेही वाहून गेल्याने ७ लाख रुपयाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानीची पाहणी करून भरीव आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आमगव्हाण येथील शेतकरी मिनल सुधाकर चौधरी व गणेश सुभाष चौधरी यांनी केली आहे.कोडोली परिसरात शुक्रवारी दुपारी ३.३० पासून रात्री ८ वाजेपर्यंत पडलेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे अरुणावती नदी व गोखी नाल्याला महापुराचे स्वरूप आले होते. नदी व नाल्याच्या पुराचे पाणी आमगव्हाण येथील शेतकरी मिनल सुधाकर चौधरी यांच्या कोडोली शिवारातील व गणेश सुभाष चौधरी यांच्या सोयाबीन पेरणी केलेल्या शेतात पुराचे पाणी घुसल्याने शेत जमीन खरडून गेली व पिके वाहून गेले आहे. या नैसर्गिक हानीने शेतीसह पिकांचे सात लाख रुपयाचे नुकसान झाल्यामुळे महसूल व कृषी विभागाने नुकसानीची पाहणी व पंचनामा करून भरपाई द्यावी, अशी मागणी पिडीत दोन शेतकऱ्यांनी केली आहे.

# एक दिवसएक घंटाएक सोबत श्रमदान मोहीम

## ग्रामपंचायतींनी सक्रिय सहभाग नोंदवण्याचे सीईओ मेश्राम यांचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १६ :



स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२अंतर्गत स्वच्छता ही सेवा अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छ उत्सव या संकल्पनेत साजरा करण्यात येणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या सूचनेनुसार हा उपक्रम जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये राबवला जाणार आहे. या अभियानात जिल्ह्यातील सर्व नागरिक, संस्था, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट तसेच विविध विभागांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी सोमवारी केले.
अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी-परंपरा दूर होण्यासाठी संत गाडगेबाबा यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. प्रबोधनासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी सामाजिक संघटनांकडून कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यातून स्वच्छतेचा संदेश देण्यात येतो. यंदा कर्मयोगी संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त जयंतीनिमित्त जागर फाउंडेशनही स्वच्छतेबाबत उपक्रम राबवण्यात आले. दरम्यान आता स्वच्छता ही सेवा अभियान राबवण्यात येणार आहे.
पंधरवडा अभियान मध्ये अस्वच्छ ठिकाणांची निवड करून साफसफाई करणे, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, सफाईमित्र सुरक्षा शिबिरे, पर्यावरणपूरक व शून्य कचरा उत्सव, स्वच्छ सुजल गाव संकल्पनेशी निगडित प्रबोधनपर कार्यक्रम राबवण्यात येणार आहेत. तसेच या कालावधीत विशेष ग्रामसभांचे आयोजन करून हागणदारीमुक्त अधिक मॉडेल गाव व स्वच्छ सुजल गाव घोषित करण्याचे नियोजित आहे.
श्रमदान होणार २५ सप्टेंबर रोजी एक दिवस-एक तास-एक सोबत या संकल्पनेतून देशव्यापी श्रमदान मोहिम आयोजित करण्यात येणार आहे.
या दिवशी जास्तीत जास्त नागरिकांनी आपल्या गावात सामूहिक श्रमदान करून स्वच्छता मोहिमेला हातभार लावावा, असे आवाहनही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.
अभियान स्वच्छतेसाठी भकेंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार स्वच्छता ही सेवा अभियान हे आपल्या गावाच्या स्वच्छतेसाठी आणि विकासासाठी महत्वपूर्ण अभियान असून गावातील युवक, नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या मदतीने प्रत्येक गावात हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात यावे.
**-अनिता मेश्राम , मुख्य कार्यका.**

# जो जिंकतो, तोच जगण्याची प्रवृत्ती कायम ठेवतो : डॉ. संजय उपाध्ये

## तुषार भारतीय मित्र परिवारातर्फे आयोजित अमृत मंथन व्याख्यानमालेचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १६ :



परंपरांमध्ये जगताना काळानुसार वर्तमानातील बदल आचरणात आणायला हवेत. स्वत:च्या उणिवांवर सतत चर्चा केल्याने आत्मविश्वास कमी होतो. आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन प्रतिसादाचा, सकारात्मक ठेवावा, नकारात्मक गोष्टींबाबत विचारही करायचा नाही.
यातूनच यश मिळवण्याची सवय जडते. म्हणजेच नकारात्मकता, वाईट विचार बाजुला सारून जो जिंकतो तोच जगण्याची प्रवृत्ती कायम ठेवतो, असे प्रतिपादन व्याख्याते डॉ. संजय उपाध्ये यांनी केले. वैचारिक प्रबोधनातून समाज प्रगल्भ होतो, असा समाज विश्वाचे नेतृत्व करू शकतो.
याची जाणीव ठेवत तुषार भारतीय व मित्र परिवाराने मागील १३ वर्षांपासून अमृत मंथन व्याख्यानमालेचा ज्ञानयज्ञ धगधगत ठेवला आहे. यंदा तेरावे वर्ष असून, साईनगर परिसरातील बडनेरा मार्गावरील महेश भवन येथे आयोजित अमृत मंथन व्याख्यानमालेचे समारोपीय पुष्प रविवारी गुंफण्यात आले. मुख्य वक्ते डॉ. संजय उपाध्ये यांनी जिंकलो असे म्हणा या विषयावर श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी अध्यक्ष म्हणून संत अच्युत महाराज, हार्ट हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर तर प्रमुख पाहुणे म्हणून तुषार भारतीय, माजी महापौर चेतन गावंडे उपस्थित होते.
समारोपीय सत्रामध्ये डॉ. उपाध्ये म्हणाले, जन्मासह मृत्यू असतो. आपल्या हातात फक्त जगणे असते.
त्यामुळे हसतखेळत, सहज जगता आले पाहिजे. तेव्हाच जीवन सुसह्य होते.'जीवन जगत असताना सतत जिंकण्याचा विचार मनात आणा. जो जिंकतो तोच जगण्याची प्रवृत्ती कायम ठेवतो.
शारीरिक व्याधी कोणालाही चुकल्या नाहीत; पण दृष्टिकोन बदलला तर व्याधीदेखील सुसह्य होतात. ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यांचा समन्वय साधून उत्तम आयुष्य जगता येते.
नका नका आठवू पुन्हा त्या गतकाळातील खुणा, आजवरी जे जगलो ते मी जिंकलो ऐसे म्हणा, या कवितेने त्यांनी निरुपणाचा समारोप केला.
या कार्यक्रमाला श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सभागृहाबाहेर सुद्धा उभे राहून व्याख्यानमालेचा आनंद घेतला. व्याख्यानमालेचा प्रारंभ दीप प्रज्वलन व महाराष्ट्र गीताने करण्यात आला.
प्रास्ताविक मुख्य आयोजक तुषार भारतीय यांनी केले तर सूत्रसंचलन ज्योती चांदुरे आणि आभार प्रदर्शन मंदार नानोटी यांनी मानले. प्रदीप पात्रीकर, राजू भगत, अनुप येवतीकर, विजय देशपांडे, राजेश जगताप, गोपाल दलाल, ज्ञानेश्वर टाले, यांनी अथक परिश्रम घेतले.
वर्तमानात जगणे म्हणजे जीवन जगणे : उपाध्ये भूतकाळ बदलता येत नाही, भविष्यकाळ माहिती नाही; त्यामुळे वर्तमानात जगा. वर्तमानात जगणे म्हणजे जीवन जगणे होय.
प्रत्येक नवीन चुक, हे प्रगतीचे लक्षण आहे. कारण, जो पुढे वाटचाल करण्यासाठी कर्म करतो, त्याच्याच हातून चुका होतात. या चुकांमधूनच तो शिकतो. हा अनुभव त्याच्यासाठी मार्गदर्शक ठरतो.
कारण, जो वर्तमानाचा योग्यप्रकारे वापर करून क्रियाशीलपणे एखादे काम हाती घेतो, तोच जीवनात यशस्वी ठरतो, असे प्रबोधन डॉ. संजय उपाध्ये यांनी केले.

# कापूस पट्ट्यातील 'निळकंठ'ला शासनाचा 'सहकार', पुनरुज्जीवनासाठी मंत्रिमंडळात



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १६ :

विदर्भाच्या कापूस पट्ट्यातील दि निळकंट सहकारी सूतगिरणीचे पुनरुज्जीवन होणार आहे. राज्य मंत्रिमंडळाने खास बाब म्हणून सूतगिरणीला अर्थसहाय्य देण्यास मंगळवारी मंजुरी दिली.
पश्चिम विदर्भातील कापूस उत्पादक पट्ट्यामध्ये प्रक्रिया उद्योगासह रोजगार निर्मिती होण्यासाठी माजी राज्यमंत्री स्व. नीळकंठ उपाख्य नानासाहेब सपकाळ यांनी दि निळकंठ सहकारी सूतगिरणीची स्थापना केली. सन १९७० पासून या सूतगिरीमध्ये प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात झाली. या सूतगिरीणीतून ३८ वर्षे दर्जेदार सूत निर्मिती करण्यात आली. या सूतगिरणीत शेतकऱ्यांच्या कापसाला बाजारभावपेक्षा अधिक दर मिळत होते. सुमारे दीड दशकांपासून जुनी यंत्रसामुग्री व काही तांत्रिक कारणाने सूतगिरणीचे उत्पादन बंद झाले. त्यामुळे अनेकांचा रोजगार बुडाला. कापूस उत्पादक शेतकऱ्यांपुढे देखील उत्पादित मालाच्या दराचा प्रश्न निर्माण झाला. प्रामुख्याने पश्चिम वऱ्हाडामध्ये कापूस प्रक्रिया उद्योगाची कमतरता जाणवू लागली. शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून अकोल्याची ओळख आहे. रोजगार निर्मितीसह कापूस प्रक्रिया उद्योग सुरू होण्याच्या दृष्टीने २०१४ मध्ये सूतगिरणीच्या पुनरुज्जीवनाची मागणी माजी केंद्रीय राज्यमंत्री संजय धोत्रे यांचे मार्गदर्शनात आमदार रणधीर सावरकर यांनी राज्य शासनाकडे केली.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, तत्कालीन वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील, तत्कालीन सहकार मंत्री सुभाष देशमुख यांच्याकडे सूतगिरणीच्या पुनरुज्जीवनासाठी प्रस्ताव पाठवणे व त्याच्या मंजुरीसाठी त्यांनी नियमित पत्रव्यवहार केले. सूतगिरणीचे अध्यक्ष डॉ. रणजित सपकाळ, अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष शिरीष धोत्रे यांनी सुद्धा सूतगिरणीच्या पुनरुज्जीवनाची मागणी लावून धरली. अखेर राज्य शासनाच्या मंत्रिमंडळाने मंगळवारी निळळंठ सूतगिरणीला विशेष बाब म्हणून अर्थसहाय्य मंजूर केले. भागधारक, शासन मदत व बँक कर्जातून निधी उभारत निळकंठ सूतगिरणीचे पुनरुज्जीवन होणार आहे. अकोल्यात पुन्हा एकदा सूत निर्मितीला सुरुवात होईल.

नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १६७ * ✲ नागपूर ✲ बुधवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## ट्रम्प यांचा युद्धबंदीचा दावा फेटाळला

■ **वृत्तसंस्था, कराची, दि. १६ :**
पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक दार यांनी भारत-पाकिस्तान युद्ध थांबवण्याचा डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा फेटाळून लावला.
मंगळवारी कतारमध्ये अल जझीराशी बोलताना त्यांनी पहिल्यांदाच कबूल केले की भारताने दोन्ही देशांमधील कोणत्याही तिसऱ्या पक्षाची मध्यस्थी कधीही स्वीकारलेली नाही. तिसऱ्या पक्षाच्या सहभागासाठी ते तयार आहेत का असे विचारले असता, इशाक दार म्हणाले की आम्हाला कोणताही आक्षेप नाही, परंतु भारताने स्पष्टपणे म्हटले आहे की हा द्विपक्षीय मुद्दा आहे. इशाक दार म्हणाले की, आम्ही कोणाशीही बोलण्यास तयार आहोत. संवाद हाच पुढे जाण्याचा मार्ग आहे असे मानतो, परंतु यासाठी दोन्ही पक्षांचा सहभाग आवश्यक आहे.

अग्राग्रलेख

# खरीखरी...

## नव्या नेत्यांची कथा आणि व्यथा

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 31 जानेवारी 2026 पूर्वी घ्याव्यात, असा आदेश देऊन निवडणूक आयोगाच्या आळशी कारभारावर बोट ठेवलेले आहे. महाराष्ट्रात गेल्या चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे स्थानिक समस्यांच्या निपटा?याची आणि जनतेच्या समाधानाची हमी असे विधान पुस्तकात तरी लिहिलेले आहे. ही हमी आपले निवडून येणारे लोकप्रतिनिधी पूर्णपणे पाळत नसले तरी शहरावर आणि विशेषता प्रभाग किंवा वार्डावर पाळत ठेवण्यासाठी तरी निवडून येणारे लोकप्रतिनिधी हवे असतात. हे आता सर्वोच्च न्यायालयानेही मान्य केलेले आहे पूर्वीच्या आदेशाप्रमाणे आयोगाने निवडणूक घेणे गरजेचे होते पण आयोगाने त्यामध्ये हलगर्जीपणा केला आहे. असे सर्वोच्च न्यायालयाचे मत आहे. काहीतरी खुस्पटे काढून लोकप्रतिनिधींच्या ऐवजी सरकारच्या प्रशासकीय अधिका?यांच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभार मन मानेल तसा सुरू आहे. आता मुख्यतः ओबीसी आरक्षणासह इतर अनेक सोयीस्कर कारणे देऊन सरकारची गैरसोय होणार नाही यामुळे की काय निवडणुकांचा पसारा न करण्याची भूमिका शासनाने घेतलेली दिसते. सर्वोच्च न्यायालयाच्या या आजच्या निर्णयामुळे सरकारला दिलासा मिळाला असला तरी जनतेचा दिलासा मात्र गुहेत लपून बसलेला आहे. सरकार नसले तरी सरकारी काम अडत नाही हे खरे आहे. मग उद्या विधानसभा आणि लोकसभा यांच्याही निवडणुका घेतल्या नाहीत तर देशाचा कारभार चालणारच आहे यात शंका नाही. आपल्या देशाचा शेजारी नेपाळ आहे याच नेपाळमध्ये निवडून आलेल्या सरकारला म्हणजेच पंतप्रधानांसह सगळ्या मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागला. याचा अर्थ असा नाही की, निवडून आलेले सर्वच नालायक आहेत परंतु गव्हासोबत खडेही दळले जातात आणि किडेही रगडले जातात. त्या न्यायाने तेथील चांगल्या चांगल्या लोकांचीही गच्छंती झालेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच नगरपालिका असो, पंचायत समिती असो किंवा जिल्हा परिषद असो आपला नगरसेवक किंवा आपला प्रतिनिधी असला की आपली कामे त्याच्याकडून हक्काने करून घेता येतात. यातील अनेक कामे फारच साधारण असतात पण ती कामे किरकोळ वाटत असली तरी स्थानिक जनतेसाठी महत्त्वाची असतात. अशा कामांमध्ये रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे, अनधिकृत रित्या केलेली अतिक्रमणे, बाजारातील घाण, गटारे आणि सांडपाणी, त्यासह पिण्याच्या पाण्याच्या समस्या, फेरीवाल्यांच्या समस्या यासारखे विषय सरकारी अधिका?यांच्या खिसगणतीतही नसतात. आता सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यामुळे यापुढे निवडणूक आयोग कुचराई करणार नाही असे आपण समजले पाहिजे आणि आयोगाला निवडणुकीचे प्रयोग करण्यासाठीच नेमलेले आहे. हे निवडणूक आयोगानेही नीट समजून घेतले पाहिजे कारण आपण सगळे तसेच समजतो. मात्र हा आयोग सध्या तरी अजगरासारखा स्वस्थ राहून मस्तपणे पहुडलेला आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. लोकशाहीमध्ये जन हितकार्य, जन समस्या आणि जनता महत्त्वाची असते. पण त्यांना कपाटात बंद करून ठेवल्यामुळे अनेक इच्छुक चार वर्षापासून एखाद्या त्रिशंकू प्रमाणे आकाश आणि पृथ्वी यांच्यामध्ये लोंबकळत पडलेले आहेत. आता तरी भविष्यात निवडणूक आयोग सर्वोच्च न्यायालयासमोर निवडणूक न घेण्यासाठी एखादा कर्मणी प्रयोग करणार नाही असे आपण समजावे. निवडून येणा?या किंवा निवडणूक लढवणा?या अनेकांना निवडणूक आयोगाच्या 'आऽस्ते चलोऽ' धोरणामुळे मनस्ताप सहन करावा लागत आहे. लागलेला आहे आणि जोपर्यंत निवडणुका होत नाहीत तोपर्यंत लागणार आहे. जे खरोखरच चळवळी उभारणारे तळमळीचे कार्यकर्ते आहेत. त्यांना पुढा?यांच्या खुर्च्या उचलण्याशिवाय दुसरे काही करता येत नाही, ही त्यांची खंत आहे. अनेक माजी सदस्यांना म्हणजेच जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा नगरपालिका यामधील सदस्यांची अलीकडे गमती गमती मध्ये टर उडवली जाते, "काय मेंबर, कधी होणार निवडणुका" असे त्यांना विचारले जाते परंतु हे नगरसेवक किंवा सदस्य म्हणजेच मेंबर साहेब तेव्हा शांत असतात. ज्याप्रमाणे भांडाळू म्हणजेच भांडखोर बायको नव?याला जसे घालून पाडून बोलते आणि बिचारा नवरा गप्प राहतो. तसे हे निवडणुकीसाठी इच्छुक असणारे नवरे मूग गिळून गप्प बसण्याशिवाय काहीही करू शकत नाहीत. आता एकच प्रार्थना आहे ती म्हणजे, निवडणूक आयोगाने जागृत व्हावे आणि जनतेला स्थानिक नेते निवडण्यासाठी प्रेरित करावे. एकूणच जुन्यांची व्यथा आहे नव्यांची नवीन कथा आहे. आपण मात्र आशावादी राहू या आणि नव्या वर्षात, नवे नवे नेते पाहूया...!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### महाराष्ट्रात ३१ जानेवारीपर्यंत

# मनपा निवडणुका घ्या!

## सर्वोच्च न्यायालयाचा आदेश : विलंबाबद्दल राज्य निवडणूक आयोगाला फटकार

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :**
सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी महाराष्ट्र निवडणूक आयोगाला (एसईसी) पालिका निवडणुका ३ वर्षांनी पुढे ढकलल्याबद्दल फटकारले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे निर्देश दिले.



खरं तर, ओबीसी आरक्षणाच्या वादामुळे २०२२ पासून महाराष्ट्रात जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपालिकांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. यापूर्वी ६ मे रोजीही याच प्रकरणात न्यायालयाने आयोगाला ४ आठवड्यांच्या आत निवडणुकांबाबत अधिसूचना जारी करण्यास सांगितले होते.

न्यायालयाने म्हटले की, लोकशाहीसाठी हा एक गंभीर मुद्दा आहे आणि आता कोणत्याही परिस्थितीत निवडणुका पुढे ढकलता येणार नाहीत. ही सूट फक्त यावेळीच देण्यात आली आहे, आतापासून कोणतेही निमित्त स्वीकारले जाणार नाही. लोकशाहीची मुळे मजबूत करण्यासाठी वेळेवर निवडणुका घेणे खूप महत्वाचे आहे.

खंडपीठाने म्हटले आहे की, प्रभागांचे सीमांकन ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावे. निवडणुका घेण्यासाठी आवश्यक असलेल्या मशीन्स आणि कर्मचाऱ्यांची संख्या राज्याच्या मुख्य सचिवांना तात्काळ कळवावी.

निवडणूक आयोगाने न्यायालयात युक्तिवाद केला होता की पुरेशा ईव्हीएम, शाळेच्या इमारती आणि परीक्षांमुळे कर्मचाऱ्यांचा अभाव यामुळे विलंब झाला. यावर न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आणि म्हटले की मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या बोर्ड परीक्षा निवडणुका पुढे ढकलण्याचे कारण असू शकत नाही.

न्यायालयाने म्हटले की, निवडणुकांशी संबंधित सीमांकन किंवा आरक्षणाबाबत उच्च न्यायालयात अनेक याचिका प्रलंबित आहेत. आयोग मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना त्यांना एकत्र करण्याची विनंती करू शकतो.

६ मे २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी चार आठवड्यांच्या आत अधिसूचना जारी करावी. महाराष्ट्र निवडणूक आयोगाने चार महिन्यांत पालिका निवडणुका घेण्याचा प्रयत्न करावा, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने आपल्या आदेशात म्हटले की, आमच्या मते, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियतकालिक निवडणुकांद्वारे लोकशाहीच्या संवैधानिक आदेशाचा आदर केला पाहिजे.

२०२१ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला होता की स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींसाठी आरक्षणाला परवानगी दिली जाणार नाही जोपर्यंत सरकार सर्वोच्च न्यायालयाच्या २०१० च्या आदेशात नमूद केलेल्या तिहेरी चाचणीची पूर्तता करत नाही.

तिहेरी चाचणी निकष पूर्ण होईपर्यंत ओबीसी जागांना सामान्य श्रेणीतील जागा म्हणून पुन्हा अधिसूचित केले जाईल असा आदेश न्यायालयाने दिला होता.

**शिवसेनेने (अविभाजित) ८४ जागा जिंकल्या होत्या**

२०१७ च्या बीएमसी निवडणुकीत, (अविभाजित) शिवसेनेने ८४ जागा जिंकल्या तर भाजपने ८२ जागा जिंकल्या. जून २०२२ मध्ये अविभाजित शिवसेनेच्या आमदार आणि खासदारांचा एक मोठा गट उद्धव ठाकरेंविरुद्ध बंड करून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटात सामील झाला. नंतर निवडणूक आयोगाने त्यांच्या पक्षाला खरी शिवसेना म्हणून मान्यता दिली.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आता महाराष्ट्रात मनपा निवडणुकीची लगबग सुरू होणार आहे.

### नवीन गेमिंग धोरणाला

# राज्यात मंजुरी

## राज्य मंत्रिमंडळ बैठकीत ८ महत्त्वाचे निर्णय



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आज आठ महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

यामध्ये राज्यासाठी नवीन ॲनिमेशन आणि गेमिंग धोरण मंजूर करण्यात आले असून, मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या भत्त्यात मोठी वाढ करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. विद्यार्थीनींसाठीच्या स्वच्छता प्रसाधन भत्त्यात सुमारे दुपटीने वाढ करण्याचा निर्णयही झाला असून, यामुळे हजारो विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

**वस्त्रोद्योग विभाग** : अकोला येथील दि निळकंठ सहकारी सूतगिरणीला खास बाब म्हणून शासन अर्थसहाय मिळणार. अर्थसहाय्याच्या ५:४५:५० या गुणोत्तरानुसार निवड

**सहकार व पणन विभाग** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेस पुढील दोन वर्षांसाठी मुदतवाढ. राज्यभरात ११६ बाजार समित्यांमध्ये नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी, व अस्तित्वातील भवनांच्या दुरूस्तीसाठी असा एकूण १३२ कोटी ४८ लाखांचा खर्च. विविध ठिकाणी ७९ नवीन शेतकरी भवन उभारण्याचे प्रस्ताव.

**सहकार व पणन विभाग** : आधुनिक संत्रा केंद्र उभारण्याच्या योजनेस २ वर्षे मुदतवाढ. नागपूर, काटोल, कळमेश्वर, (जि.नागपूर), मोर्शी (जि.अमरावती ) व संग्रामपूर, (जि.बुलढाणा) येथे आधुनिक संत्रा केंद्र उभारण्यात येत आहेत. मुदतवाढीसह योजनेच्या स्वरुपात अनुषंगिक बदल करण्यास मान्यता

**सार्वजनिक बांधकाम विभाग** : भंडारा ते गडचिरोली दरम्यान ९४ किलोमीटरचा द्रुतगती महामार्ग. प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्ग प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात येणार. प्रकल्पाच्या आखणीस व भूसंपादनास मान्यता.

## महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांचा राजीनामा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :**
राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी त्यांच्या पदाचा अचानक राजीनामा दिला आहे. त्यांनी वैयक्तिक कारणांमुळे हा निर्णय घेतल्याची माहिती समोर येत आहे.



मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली. बिरेंद्र सराफ यांच्यावर उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांमध्ये सरकारची बाजू मांडण्याची आणि महत्त्वाचा कायदेशीर सल्ला देण्याची जबाबदारी होती.

अचानक राजीनामा दिल्यानंतर सध्या तरी त्यांनी जानेवारीपर्यंत आपले काम सुरू ठेवण्याची विनंती राज्य सरकारने केली, आणि त्यांनी ती मान्यही केली आहे. त्यामुळे नव्या महाधिवक्त्याची नियुक्ती होईपर्यंत ते जानेवारीपर्यंत आपले काम सुरू ठेवतील.

बिरेंद्र सराफ हे एक प्रसिद्ध कायदेशीर तज्ज्ञ आणि मुंबई उच्च न्यायालयातील वरिष्ठ वकील आहेत. त्यांनी मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयातून कायद्याची पदवी घेतली असून, पदवीच्या तिन्ही वर्षांत ते मुंबई विद्यापीठात पहिले आले होते. सुरुवातीला त्यांनी भारताचे माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यासोबत कनिष्ठ वकील म्हणून काम केले.
2020 मध्ये त्यांना ज्येष्ठ वकील म्हणून नियुक्त करण्यात आले. बॉम्बे बार असोसिएशनचे सचिव आणि उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळाने त्यांची राज्याच्या महाधिवक्तापदी नियुक्ती केली होती. 2024 मध्ये महायुती सरकार सत्तेत आल्यानंतरही ते या पदावर कायम होते.

### भाजपने मुंबई महापालिकेचे

# रणशिंग फुंकले!

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :**
आगामी स्थानिक निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी सुरुवात केली आहे. त्यात सर्वात महत्त्वाची म्हणजे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. याच पार्श्वभूमीवर आता भाजपने विजय संकल्प मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला आहे.



फडणवीस म्हणाले, मागच्या महापालिकेच्या निवडणुकीच्या वेळी आपला महापौर येऊ शकला असता, पण मैत्रीच्या नात्यात आपण त्याचा त्याग केला. परंतु, नंतरच्या विधानसभा निवडणुकीत मला गाणे म्हणायची वेळ आली की अच्छा सीला दिया तूने.. असे म्हणत त्यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला.

आता 2022 साली आम्ही गनिमी कावा दाखवला आणि 2024 मध्ये पूर्ण बहुमताचे सरकार आणून दाखवले.

फडणवीस म्हणाले, काहीही झाले तरी मुंबई महापालिकेवर महायुतीचा भगवा फडकवू. साधी बेस्टची निवडणूक होती, त्यात आमचा ब्रँड म्हणत निवडणूक लढवली आणि आम्ही त्या ब्रँडचा बॅन्ड वाजवला.

नुसते नाव लावल्याने कोणी ब्रँड बनत नाही. बाळासाहेब ठाकरे हे खरे ब्रँड आहेत, तुम्ही नाही. हा भाजप कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. आमच्याकडे चहा विकणारा जागतिक ब्रँड बनू शकतो, आम्हाला कोणी ब्रँड सांगू नये, अशा शब्दात त्यांनी उबाठावर हल्ला चढवला.

## धर्मांतर कायद्यांवर आठ राज्यांना नोटीस

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :**
सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी धर्मांतराशी संबंधित कायद्यांबाबत ८ राज्यांना नोटीस बजावली आणि त्यांना ४ आठवड्यांच्या आत त्यांचे उत्तर दाखल करण्यास सांगितले. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, हिमाचल, उत्तराखंड, छत्तीसगड, गुजरात, हरियाणा, झारखंड आणि कर्नाटकच्या कायद्यांना आव्हान देणाऱ्या याचिकांवर न्यायालय सुनावणी करत होते.
याचिकाकर्त्यांनी मुख्य न्यायाधीश बीआर गवई आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाला सांगितले की, जरी या कायद्यांना धर्म स्वातंत्र्य कायदे म्हटले जात असले तरी ते अल्पसंख्याकांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणतात आणि आंतरधर्मीय विवाह आणि धार्मिक रीतिरिवाजांना लक्ष्य करतात.
न्यायालयाने वरिष्ठ वकील इंदिरा जयसिंग, संजय हेगडे, एम.आर. शमशाद, संजय पारीख आणि इतर पक्षांचे युक्तिवाद ऐकले आणि सांगितले की या प्रकरणाची पुढील सुनावणी सहा आठवड्यांनी होईल.

**CENTRAL INSTITUTE OF EDUCATION GONDIA**
**ADMISION NOTICE 2025-26**
(PB BSC NURSING)
Application are inviting from eligible candidate for the admission to **PB BSc Nursing** course for the 2025-26 academic. Application form is available from Principal office from 16.09.2025 in working Hours Till 25.09.2025 upto 01.00 PM Last date of admission 27.09.2025.
**Note: NO SOFT COPY. Intrested candidate can contact on below Numbers and to the Principal office directly.**
Contact with Originals at :
Sukhdeve Ward, Adasi, Gondia
Email: hrsanstha@gmail.com, 9370556848, 9325416850.



# मोदींचे परराष्ट्र धोरण तारक नव्हे तर मारक : उद्धव ठाकरे



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र धोरण भारतासाठी तारक नव्हे तर मारक असल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी भारत-पाक क्रिकेट सामन्यावर केंद्र सरकारवर निशाणा साधताना केली. या सरकारने अमित शहांचा मुलगा जय शहा याच्या हट्टापायी पाकसोबत क्रिकेट खेळून देशाची प्रतिमा व देशभक्तीचा चुराडा केला, असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत आज धाराशिव जिल्ह्यातील काही कार्यकर्त्यांचा ठाकरे गटात प्रवेश झाला. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे म्हणाले, या सरकारचा कारभार हा कर्ज काढून दिवाळी साजरी करण्याचा आहे. त्यांना आपल्या राज्याचे दिवाळे वाजले तरी चालेल. सध्या राज्यावर ९ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. ९ वर कितीे शून्य हे मोजायलाही फार अवघड आहे. जेव्हा राज्यावर कर्ज येते, याचा अर्थ राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावर हे कर्ज येते.

# 'जेम्स अँड ज्वेलरी' क्षेत्रातील कुशल मनुष्यबळासाठी अभ्यासक्रम सुरू करणार : मुख्यमंत्री

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १६ :**

'जेम्स अँड ज्वेलरी' क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी आहेत. या क्षेत्रात विश्व स्तरावर नेतृत्व करण्याची भारताकडे क्षमता आहे. यासाठी राज्य शासन कौशल्य (स्किल) विद्यापीठ अंतर्गत 'जेम्स अँड ज्वेलरी' क्षेत्रात कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करेल. ज्यामुळे निश्चितच या क्षेत्राच्या प्रगतीत सातत्य कायम राहील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिओ वर्ल्ड कन्वेंशन सेंटर येथे आयोजित जेम्स अँड ज्वेलरी प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केला.

जेम्स अँड ज्वेलरी प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रदर्शनाच्या विविध दालनांनाही मुख्यमंत्र्यांनी भेट दिली. कार्यक्रमप्रसंगी व्यासपीठावर गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार चित्रा वाघ,





जेम्स अँड ज्वेलरी असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश रोकडे, उपाध्यक्ष अविनाश गुप्ता आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवी मुंबईतील महापे येथे देशातील अत्याधुनिक 'जेम्स अँड ज्वेलरी' पार्क उभारण्यात येत आहे. या पार्कच्या माध्यमातून 'जेम्स अँड ज्वेलरी' क्षेत्रातील व्यावसायिकांना, निर्यातदारांना सुविधा देऊन अधिकाधिक निर्यात वाढविण्यासाठी शासन काम करेल. तसेच हे क्षेत्र रोजगाराभिमुख बनविण्यासाठी 'जेम्स अँड ज्वेलरी' संघटनेसोबत सहकार्याची शासनाची भूमिका आहे. भारतीय आभूषणे, दागिन्यांना मोठा इतिहास आहे. जगात बऱ्याच देशांमध्ये भारतीय दागिने निर्यात होतात. जागतिक स्तरावर या क्षेत्रात भारत आघाडीवर असून ही आघाडी टिकविण्यासाठी शासनाची धोरणे त्या पद्धतीने सुसंगत करण्यात येतील.

राज्य शासन 'इज ऑफ डूइंग बिजनेस'साठी नवीन उद्योगांना परवाना पद्धत, जागा खरेदी प्रक्रिया, सध्याच्या उद्योगांचे बळकटीकरण प्रक्रिया सोपी आणि कमी कालावधीची करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सुधारणा करीत आहे. त्यासाठी मंत्रालयात 'इज ऑफ डूइंग बिजनेस' वॉर रूमही तयार करण्यात आली आहे. या माध्यमातून सुधारणा प्रक्रिया कुठल्या टप्प्यावर आहे, कशा पद्धतीने करायची याबाबत नियमित आढावा घेण्यात येत असून राज्यात उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. या प्रदर्शनाच्या आयोजनामधून भारतीय दागिन्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळण्यासाठी निश्चितच मदत होणार आहे. तसेच या क्षेत्रात नवीन संशोधन होणे गरजेचे आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाप्रसंगी गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार चित्रा वाघ, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश रोकडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला 'जेम्स अँड ज्वेलरी' क्षेत्रातील व्यावसायिक, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबईतून बेपत्ता झालेला जवान मृतावस्थेत आढळला

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १६ :**


मुंबई येथून एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कुलाबा येथील डॉक यार्ड येथे कार्यरत असलेला नौदल जवान सुरजसिंह चौहान अचानक गायब झाले होते. 7 सप्टेंबरपासून ते बेपत्ता होते. पोलिस पथक सुरजसिंह चौहान यांचा शोध घेत असताना त्यांना एक मृतदेह आढळून आला असून हा मृतदेह सुरजसिंह चौहान यांचाच असल्याचे निदर्शनास आले आहे.

याबद्दल अधिकची माहिती अशी की, 29 मे रोजी कुलाबा येथील डॉकयार्ड येथे नेमणूक झालेले सुरजसिंह चौहान 7 सप्टेंबरपासून रहस्यमयरित्या बेपत्ता झाले होते. ते त्या दिवशी पहाटे पाच वाजता घरातून बाहेर पडले होते, मात्र काही वेळाने त्यांचा फोन बंद झाल्याने नौदलाच्या अधिकाऱ्यांनी कफ परेड पोलिस ठाण्यात त्यांच्या बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती.



तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी सुरजसिंह चौहान यांचा शोध सुरू केला. सुरजसिंह चौहान यांच्या मोबाईलचे शेवटचे लोकेशन शोधण्यात आले असता त्यांचे शेवटचे लोकेशन हे रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील भिवपुरी स्टेशन रोड परिसरात होते. त्यानुसार पोलिसांचे पथक सुरजसिंह चौहान यांचा शोध घेण्यासाठी तिथे पोहोचले व संपूर्ण परिसर पिंजून काढला. त्यानुसार काही पुरावे देखील पोलिसांना मिळत गेले.

# ओबीसी आरक्षणाचा बॅकलॉग भरा : छगन भुजबळ



**मुंबई :** मराठा समाजासाठी राज्य सरकारने उपसमिती गठीत केली, त्याचप्रमाणे आता ओबीसी समाजासाठी देखील उपसमिती गठीत केली आहे. या उपसमितीची आज बैठक पार पडली. बैठकीला चंद्रशेखर बावनकुळे, छगन भुजबळ, पंकजा मुंडे यांसह इतर नेते उपस्थित होते. या बैठकीनंतर मंत्री छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषद घेत आपली प्रतिक्रिया दिली आहे. छगन भुजबळ म्हणाले, मागासवर्गीय आणि महाज्योती यांना स्टाफच पूर्ण दिलेला नाही. तो स्टाफ ताबडतोब द्या. सरकारी सेवांमधील ओबीसींचा जो वाटा आहे तो 27 टक्के आहे. परंतु, शासनाच्या निर्णयाप्रमाणे आतापर्यंत फक्त ९ टक्के ओबीसींना या सरकारी कार्यालयांमध्ये जागा मिळाली आहे. म्हणजेच बॅकलॉग आहे. त्याचा मागोवा घ्या. आरक्षण जेव्हा आपण मागतो, नोकरीमध्ये वगैरे त्यात बॅकलॉग आहे हा भरा, अशी मागणी भुजबळ यांनी केली आहे. यात महाराष्ट्र राज्य नाभीक महासंघ आहे, अखिल अहिर समाज सुवर्णकाळ संस्था आहे त्यांच्या नावाने एक अॅफेडेव्हीट गेले आहे.

# जालना शहरास पावसाने झोडपले

■ **महासागर प्रतिनिधी**
**जालना, दि. १६ :**

जालना शहरात सोमवारी रात्रभर झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे जालना शहरातील अनेक भागांत घरे आणि दुकानांमध्ये पाणी शिरल्याने नुकसान झाले. शहरातील अनेक वस्त्यांना तलावाचे स्वरूप आले तर रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले. रात्रभरात जालना शहरात ८१.५ मि. मी तर जालना तालुक्याच्या ग्रामीण भागात ८९ मि.मी. पावसाची नोंद झाली.

शहरातील लालबाग भागात पावसामुळे अडकलेल्या १२ व्यक्तींची तर टांगा स्टॅण्ड भागात घरात अडकलेल्या एका महिलेची अग्निशमन विभागाच्या पथकाने सुखरूप सुटका केली. नीलम चित्रपटगृहाच्या बाजूने जाणाऱ्या नाल्याचे पाणी अनेक घरांत घुसले. रेल्वेस्थानक रस्त्यावरील अनेक दुकाने आणि उपहारगृह जलमय झाले. सुखशांतीनगर, त्रिमूर्तीनगर, सिंदखेड राजा वळण रस्ता, साठेनगर भागातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले.

अनेक झोपड्यांतील संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले. मंठा रस्त्यावरील चौधरी नगर परिसर त्याचप्रमाणे भाग्यनगर भागातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर पाणी



साचले. स्थानिक आमदार अर्जुन खोतकर यांनी सकाळीच जालना शहरातील लालबाग, लक्कडकोट यासह अन्य भागांची पाहणी करून महानगरपालिका प्रशासनाला सूचना केल्या. शहरातील सीना आणि कुंडलिका नद्यांनाही मोठे पाणी आले होते.

मंगळवारी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत जिल्ह्यात सरासरी ४८.८ मि. मी. पाऊस झाला. जालना शहर, जालना ग्रामीण, सेवली, रामनगर, पाचन वडगाव, वरूड, परतूर, अंबड, गोंदी, वडिगोद्री, सुखापुरी, तीर्थपुरी, अंतरवाली, कुंभार पिंपळगाव, जांबसमर्थ या पंधरा महसूल मंडलांत अतिवृष्टी झाली.

जोरदार पावसामुळे जिल्ह्यातील जीवरेखा, उर्ध्व दूधना आणि गल्हाटी हे मध्यम सिंचन प्रकल्प भरून वाहात आहेत. ५८ पैकी ३१ लघुसिंचन प्रकल्प भरून वाहात आहेत.

बीज पडल्याने बरंजळा साबळे (तालुका भोकरदन) गावातील समाधान बाबूराव साबळे यांचा मृत्यू झाला. तर घनसावंगी तालुक्यातील श्रीकृष्णनगर येथील बाबु तुळशीराम चव्हाण वीज पडून जखमी झाला. जालना तालुक्यातील खणेपुरी येथे वीज पडून एक बैल ठार झाला. तर घनसावंगी तालुक्यातील दैठणा खुर्द आणि उक्कडगाव येथे वीज पडल्याने दोन म्हशी मृत्युमुखी पडल्या. पावसामुळे जिल्ह्याच्या अनेक भागातील पिके पाण्याखाली गेली आहेत.

# श्री तुळजाभवानी देवी शारदीय नवरात्र महोत्सवाला महाराष्ट्राच्या प्रमुख महोत्सवाचा दर्जा : शंभूराज देसाई

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १६ :**

श्री तुळजाभवानी देवी शारदीय नवरात्र महोत्सवाला राज्यातील प्रमुख महोत्सवाचा प्रतिष्ठित दर्जा प्रदान केला असून हा भव्य महोत्सव २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत, घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत, धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील तुळजापूर येथे साजरा होईल. या महोत्सवा दरम्यान स्थानिक लोककला, गोंधळी गीत, भारुड, जाखडी नृत्य यांसारख्या पारंपरिक कलांचे सादरीकरण होईल. गोंधळ, भजन आणि कीर्तन यांसारख्या धार्मिक-सांस्कृतिक स्पर्धा आयोजित केल्या जातील, अशी



माहिती पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

मंत्री देसाई म्हणाले की, महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या श्री तुळजाभवानी माता अंबाबाईच्या प्राचीन मंदिरासाठी तुळजापूर हे पवित्र तीर्थक्षेत्र देशभर प्रसिद्ध आहे. या दहा दिवसीय महोत्सवात महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि देशाच्या विविध भागांतून सुमारे ५० लाख भाविक श्री तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापुरात दाखल होतात.

या कालावधीत तुळजापूर शहर धार्मिक उत्साह, सांस्कृतिक वैभव आणि सामाजिक एकतेच्या रंगांनी उजळून निघते. या महोत्सवा दरम्यान स्थानिक लोककलासह राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावरील ख्यातनाम कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम या उत्सवाला विशेष रंगत आणतील. नवरात्र थीमवर आधारित ३०० ड्रोनद्वारे साकारलेला भव्य लाईट शो या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरेल.

# लाडकी बहिण योजना निवडणुकांपुरती : विजय वडेट्टीवार



**मुंबई :** शेतकऱ्यांप्रती इतके उदासीन सरकार आजपर्यंत महाराष्ट्रात कधीच झाले नाही. शेतकऱ्यांचे शत्रू असे उपमा या सरकारला द्यावी लागेल, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. सरकारने कर्जमाफी दिली नाही, सोयाबीनला भाव नाही, कापसाला भाव नाही आणि आता हे आलेले अस्मानी संकट आणि किडीचे संकट यामुळे शेतकरी त्रस्त आहे, यामुळे शेतकऱ्यांना मदत करण्याची गरज असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले की, शेतकऱ्यांना आता मदत मिळाली नाही तर शेतकरी आत्महत्या पुन्हा वाढतील. मागच्या वेळी सोयाबीनला भाव मिळाला नाही, यावेळी सोयाबीनवर पडलेल्या रोगामुळे पीक नष्ट झाले आहे सरकारने पंचनामे करत मदत केली पाहिजे. तर जिल्हा परिषद निवडणुकीनंतर हे सर्व काही बंद होणार आहे, मग तुम्ही कोण ना आम्ही कोण. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या रे झाल्या की लाडकी बहिण योजना गेली.

# इमारतीमधील लिफ्ट अचानक कोसळली सहा रहिवाशी थोडक्यात बचावले

**पुणे :** पुणे शहरातील वाघोली परिसरात एका इमारतीत लिफ्ट कोसळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या लिफ्टमध्ये तीन महिला, दोन पुरुष आणि एक लहान मूल असे सहा जण होते. सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नसून, सर्वजण सुरक्षित आहेत. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली. यासंबंधीच्या वृत्तानुसार, पुण्यातील वाघोली परिसरात ही दुर्घटना घडली. एका इमारतीतील लिफ्टमधून सहा जण खाली येत होते. मात्र, अचानक लिफ्टचा वेग वाढून ती अचानक खाली कोसळली. लिफ्ट अचानक वेगाने खाली येऊन थेट जमिनीवर आदळल्याची संपूर्ण दृश्ये इमारतीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहेत. फुटेजमध्ये लिफ्ट अचानक वेग पकडून क्षणात कोसळल्याचे दिसत असून, लिफ्टमधील प्रवासी घाबरलेले दिसत आहेत. त्यामुळे या घटनेत चमत्कारिकरीत्या जीवितहानी टळलेली असल्याचे मानले जात आहे. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे काही काळ प्रवासी आणि परिसरातील रहिवासी मोठ्या भीतीत सापडले. सुलासह सहा रहिवाशांचे प्राण थोडक्यात वाचल्याने सुखद वाटले असले, तरी या घटनेनंतर इमारतीतील लिफ्टच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार बीडमध्ये हेलिकॉप्टरने रेस्क्यू



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १६ :**

हवामान खात्याने पुढील तीन तास मुंबईत पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. या काळात ४० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्यासह मुसळधार पाऊस पडू शकतो. पुढील ३ दिवस ईशान्येकडील राज्ये आणि महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

मुंबई आणि उपनगर परिसरात काल रात्रीपासूनच तुफान पावसाने जोर धरला असून आज पहाटेपासून त्याचा तीव्रतेने जोर वाढला आहे. मुसळधार पावसामुळे रस्त्यांवरील वाहतुकीला अडथळे निर्माण झाले असून वाहनचालकांसाठी दृश्यमानता कमी झाली आहे. अनेक सखल भागांमध्ये पाणी साचल्यामुळे सकाळच्या गर्दीच्या वेळी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चाकरमान्यांसाठी घराबाहेर पडणे अवघड झाले असून कामावर जायचे की नाही या संभ्रमात अनेकजण अडकले आहेत.

# पुण्यात होणार एक हजार ड्रोन लाईट शो

■ **महासागर प्रतिनिधी**
**पुणे, दि. १६ :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आयोजित केलेला ड्रोन लाईट शो पावसाच्या शक्यतेने एक दिवस पुढे ढकलण्यात आला असून मोदी यांच्या वाढदिवस दिनी म्हणजे १७ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता हा ड्रोन लाईट शो स.प. महाविद्यालयाच्या मैदानात होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या औचित्याने केंद्रीयमंत्री मोहोळ यांच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पैकी महाराष्ट्रात प्रथमच होणारा ड्रोन लाईट शो आणि अवधूत गुप्ते यांची लाईव्ह इन कॉन्सर्ट ही १६ सप्टेंबर रोजी नियोजित होती. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त अवधूत गुप्ते यांची लाईव्ह कॉन्सर्ट सायंकाळी सहा ते रात्री आठ या वेळेत तर ड्रोन लाईट शो हा रात्री आठ ते नऊ या वेळेत होत आहे. अयोध्या आणि वाराणसीनंतर महाराष्ट्रात हा प्रथमच भव्य-दिव्य ड्रोन शो होणार आहे.

# १५ पाणंद रस्त्यांसाठी ग्रामस्थांनी स्वखुशीने दिल्या जमिनी



■ **महासागर प्रतिनिधी**
**पुणे, दि. १६ :**

जमिनीच्या वादावरून गावकी मधली भांडण सर्वश्रुत आहे. मात्र, गावकी ने एकत्र येऊन आपापल्या जागा पानंद रस्त्यांसाठी सोडल्याचे आदर्श उदाहरण पुणे जिल्ह्यातील आडाचीवाडी या गावाने घालून दिले आहे. एकीकडे राज्य सरकारने पाणंदरस्त्यांना प्राधान्य दिलेल्या असताना जमिनीच्या खाजगी मालकीमुळे त्यात अडचणी येत आहेत. मात्र, आडाचीवाडी ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन स्वतःच्या जमिनी रस्त्यांसाठी देण्याबरोबरच श्रमदान करून रस्ते उभारणीमध्ये मोठा हातभार लावला असल्याची माहिती आडाचीवाडी गावाचे माजी उपसरपंच सूर्यकांत अनंतराव पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी आडाचीवाडी, वाल्हे गावाचे माजी सरपंच दत्तात्रय यशवंत पवार, तंटामुक्त अध्यक्ष हनुमंत यशवंत पवार, सामाजिक कार्यकर्ते नामदेव भरत पवार, अनिल गुलाब पवार, सचिन पोपट पवार, अरविंद लक्ष्मण पवार, दिलीप दुन्यानदेव पवार, अभिजीत बजरंग पवार आदी उपस्थित होते.

सर्व प्रथम आम्ही गावकऱ्यांनी एकत्र बसून पाणंद रस्ते खुले करण्याबाबत एक बैठक घेतली. त्यामध्ये प्रत्येक शेतकऱ्याची अडचण जाणून घेऊन, आपापसातील वाद दूर करून सर्वांनी एक मताने १५ पाणंद रस्ते खुले करण्याचे ठरवले.

सदर सर्व रस्ते ज्या सर्व्हे नंबरमधून सदर रस्त्यांना महापुरुषांची नावे देण्यात आली, सदर महापुरुषांची नावे व सांकेतिक क्रमांक नमूद असलेली प्रशस्त कमान रस्त्याच्या सुरवातीस उभारण्यात येत आहे. रस्त्याच्या दुतर्फा रस्त्यापासून ३ फुट अंतरावर ३ मीटर अंतराने नारळ व जांभळाच्या एक हजार झाडांची लागवड करण्यात आली आहे. यामुळे रस्त्याच्या सौंदर्यात भर पडते.

## अंजली दमानियांच्या पतीची सरकारी 'थिंक टँक'मध्ये नियुक्ती

■ **महासागर प्रतिनिधी**
**पुणे, दि. १६ :**

राज्यातील भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारावर आवाज उठवणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांचे पती अनिश दमानिया यांची राज्य सरकारच्या महत्त्वाच्या 'थिंक टँक'मध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन' (मित्रा) या संस्थेच्या मानद सल्लागारपदी त्यांची वर्णी लागली आहे. 'मित्रा' ही संस्था राज्याच्या शाश्वत विकासासाठी धोरण ठरवण्याचे काम करते. ही नियुक्ती जाहीर झाल्यानंतर अंजली दमानिया यांच्यावर टीका सुरू झाली होती. या टीकेला अंजली दमानिया यांनी सडेतोड उत्तर देत, पतीच्या निवडीमागील संपूर्ण घटनाक्रम सांगितला आहे.

भ्रष्टाचाराविरोधात नेहमी आक्रमक भूमिका घेणाऱ्या अंजली दमानिया सरकारमधील विविध गैरव्यवहार उघड करत आल्या आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणी देखील ठाम भूमिका घेतली होती. आता त्यांच्या पतींचीच राज्य सरकारच्या समितीत नियुक्ती झाल्यामुळे काहींनी त्यांच्यावर टीका सुरू केली आहे. या टीकेला उत्तर देण्यासाठी अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. पत्रकार परिषदेत बोलताना अंजली दमानिया म्हणाल्या, मी देशासाठी व महाराष्ट्रासाठी काम करते. आता माझे पती देखील देशासाठी व महाराष्ट्रासाठी काम करणार आहेत.

# पालघर एसटी आगाराची भाविकांना देवी दर्शनाची अनोखी भेट

■ **महासागर प्रतिनिधी**
**पालघर, दि. १६ :**

नवरात्रोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असून, भाविकांना महाराष्ट्रातील प्रमुख देवींच्या मंदिरांचे दर्शन घेता यावे यासाठी पालघर आगराने एक विशेष उपक्रम हाती घेतला आहे. एसटी महामंडळाने प्रथमच पालघरमधून थेट देवींच्या दर्शनासाठी विशेष बस सेवा सुरू केली आहे. यामुळे भाविकांचा प्रवास सुकर होणार असून एसटीच्या उत्पन्नातही वाढ होण्यास मदत होणार आहे.

२२ सप्टेंबरपासून या विशेष बस सेवा सुरू होणार आहेत. या बस सेवा वणी (सप्तशृंगी गड), चांदवड (रेणुकामाता), कोल्हापूर (महालक्ष्मी मंदिर), तुळजापूर





(तुळजाभवानी) आणि माहूरगड (रेणुकामाता) या प्रमुख मंदिरांकडे जाणार आहेत. या सेवेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना घटस्थापनेपूर्वी आगाऊ बुकिंग करण्याचे आवाहन पालघर आगार प्रमुख सुजित घोरपडे यांनी केले आहे.

पालघर एसटी प्रशासनाने या बस सेवेसाठी समूह बुकिंगवर भर दिला आहे. पालघर तालुक्यातील केळवा, माहीम, सातपाटी, शिरगाव, खारेकुरण आणि इतर गावांतून देखील ग्रुप बुकिंग उपलब्ध आहे. ज्या गावातून मागणी येईल, त्या गावातून थेट बस सोडण्यात येणार आहेत. त्यामुळे गावातील ग्रामस्थांनी एकत्रितपणे आगार व्यवस्थापकाशी संपर्क साधून बुकिंग करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे प्रवासादरम्यान होणारी गर्दी टाळता येईल आणि प्रवाशांना थेट त्यांच्या गावापासून देवींच्या दर्शनासाठी जाता येईल.

या विशेष बस सेवेसाठी राज्य परिवहन मंडळाच्या सर्व सवलती लागू असतील. यामध्ये महिला सन्मान योजनेअंतर्गत महिलांना तिकिटावर ५० टक्के सवलत, ७५ वर्षांवरील प्रवाशांना मोफत प्रवास आणि ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना तिकिटावर सवलत मिळेल. परतीच्या प्रवासासाठीही ग्रुप बुकिंग सुरू असून, भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे घोरपडे यांनी सांगितले.

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये एसटी महामंडळाला पॅकेज टूरमधून चांगला महसूल मिळाला आहे. याच धर्तीवर पालघर विभागाने कमी गर्दीच्या हंगामात आणि सणासुदीच्या काळात उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी अशा विशेष टूरच्या आयोजनावर भर दिला आहे. यापूर्वी, आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर यात्रेला आणि श्रावण महिन्यात अष्टविनायक दर्शनासाठी विशेष गाड्यांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसोबतच एसटीचे उत्पन्न वाढण्यासही मदत झाली आहे.

# राज्यात इलेक्ट्रिक दुचाकी टॅक्सींसाठी भाडेदर निश्चित

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १६ :**

महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, 2025' अंतर्गत राज्यात इलेक्ट्रिक दुचाकी टॅक्सींसाठी भाडेदर निश्चित केले आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली असून, मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम 73 आणि 96 नुसार शासनाला मिळालेल्या अधिकारांचा वापर करून हा निर्णय घेण्यात आला आहे. हे नवीन दर तातडीने लागू होणार आहेत. परिवहन मंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयानुसार, इलेक्ट्रिक दुचाकी टॅक्सीसाठी प्रति किलोमीटर 10.27 रुपये भाडे आकारले जाईल. यात पहिला 1.5 किलोमीटरचा टप्पा अनिवार्य असून, त्यासाठी किमान भाडे 15 रुपये असेल. त्यामुळे, प्रवास कितीही कमी असला तरी प्रवाशांना किमान 15 रुपये द्यावे लागतील. त्यानंतर प्रत्येक किलोमीटरसाठी 10.27 रुपये दर लागू होईल, अशी माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

राज्य परिवहन प्राधिकरणाने तीन मोठ्या कंपन्यांना, म्हणजेच मे. उबेर इंडिया सिस्टिम्स प्रा. लि., मे. रॅपिडो ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा. लि. आणि मे. अॅनी टेक्नॉलॉजीज प्रा. लि., 'मुंबई महानगर क्षेत्रासाठी तात्पुरता परवाना' मंजूर केला आहे. या परवान्याची मुदत 30 दिवसांची असून, त्यानंतर त्यांना अंतिम परवान्यासाठी अर्ज करणे बंधनकारक असेल. तात्पुरत्या परवान्यातील सर्व अटी व शर्ती मान्य केल्यानंतरच या कंपन्यांना पुढील परवाना दिला जाईल.

या निर्णयामुळे प्रवाशांना स्वस्त, सोयीस्कर व पर्यावरणपूरक प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. इलेक्ट्रिक दुचाकी टॅक्सींच्या माध्यमातून वाहतुकीवरील ताण कमी होऊन, प्रदूषणाला आळा बसण्यास मदत होईल, असा विश्वास प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे.

राज्यात इलेक्ट्रिक दुचाकी टॅक्सींसाठी किमान भाडे हे 15 रुपये असणार आहे. त्यानंतर प्रति किलोमीटर 10.27 रुपये शुल्क लागेल. सध्या उबेर, रॅपिडो आणि अॅनी टेक्नॉलॉजीज या तीन कंपन्यांना मुंबई महानगर क्षेत्रात प्रायोगिक तत्वावर सेवा सुरू करण्यासाठी तात्पुरता परवाना देण्यात आला आहे. या कंपन्यांना 'महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५' अंतर्गत इलेक्ट्रिक बाईक टॅक्सी सेवा चालवण्यास परवानगी मिळाली आहे.

# भोई समाज सेवा सहाय्य संस्थेचा मदतीचा हात

## बखारी गावातील स्व. विशाल सहारे यांच्या परिवाराला २० हजारांची आर्थिक मदत



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

भोई समाज सेवा सहाय्य (मदत) संस्था (रजि.) महाराष्ट्र तर्फे समाजातील गरजू परिवारांना मदतीचा हात पुढे करण्याचा उपक्रम सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून बखारी ,ता. पारशिवनी येथील स्व. विशाल सुर्यकांत सहारे (वय ४२) यांच्या परिवाराला आर्थिक मदत देण्यात आली.

स्व. सहारे यांचे १९ एप्रिल २०२५ रोजी कॅन्सरने निधन झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुले असा परिवार असून अचानक झालेल्या दुःखद प्रसंगामुळे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट झाली होती. परिस्थितीचे प्रत्यक्ष निरीक्षण करून संस्थेच्या नागपूर जिल्हा समन्वयकांनी मदत करण्याचा निर्णय घेतला. याअंतर्गत दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी रविवार, बखारी येथे स्व. सहारे यांच्या परिवारास २० हजार रुपये मदत रक्कम पोहोचवण्यात आली.

या वेळी समन्वयक प्रवीण कोल्हे (नागपूर), प्रमोद बावणे (नागपूर), किशोर बावणे (बुट्टीबोरी), मनोहर भोयर (गादा, कामठी), अमोल चांदवलुके (बोरी), शालिकराम बोंद्रे (कोराडी), सुरेश गोंडळे (बखारी), खुशाल साहारे (बखारी), विकास सुरजुसे (सुरजुसे), ज्ञानेश्वर खंडाळे (बखारी), बंडू सहारे (बखारी), आशिष सुरजुसे (सावनेर), मनीष गिरगुसे (सावनेर), सुमनबाई सहारे (बखारी), समिता विशाल सहारे (बखारी) यांची उपस्थिती होती. या प्रसंगी बखारी गावातील भोई समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. राज्यभरातील समाज बांधव वेळोवेळी मदत संस्थेला सहकार्य करीत असून त्यांच्या योगदानामुळेच अशा कार्याना बळ मिळत असल्याचे समन्वयकांनी सांगितले. संस्था व गावकऱ्यांनी सर्व सहकार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# नरकस नागपूर (कार्यालय-२) यांना नरकस सन्मान पुरस्कार प्रदान



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या सहकार्याने चालणाऱ्या नगर अधिकृत भाषा अंमलबजावणी समिती, नागपूर (कार्यालय-२) ला गुजरातमधील गांधीनगर येथील महात्मा गांधी कन्व्हेन्शन अँड एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित हिंदी दिवस सोहळा आणि पाचव्या अखिल भारतीय अधिकृत भाषा परिषदेत सन्मानित करण्यात आले.

नरकस, नागपूर कार्यालय-२ चे अध्यक्ष आणि वेस्टर्न कोलफिल्ड्स लि. अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक जयप्रकाश द्विवेदी आणि सचिव आणि महाव्य. मानव संसाधन विभाग प्रमुख अधिकृत भाषा, नरकस, नागपूर (कार्यालय-२) पी.नरेंद्र कुमार यांना नरकस सन्मान प्रदान करण्यात आला.

यामधे उल्लेखनीय असे आहे की हिंदी दिवस-२०२५ आणि पाचव्या अखिल भारतीय अधिकृत भाषा परिषदेच्या दुसऱ्या दिवशी, १५ सप्टेंबर २०२५ रोजी, देशातील निवडक नगर अधिकृत भाषा अंमलबजावणी समित्यांना २०२४-२५ या वर्षासाठी 'नरकस सन्मान' देण्यात आला आहे.

# तिडके महाविद्यालयात हिंदी दिवस उत्साहात साजरा



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १६ :

रामटेक येथील श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता निर्धारित कक्ष व भाषा विभागांतर्गत हिंदी दिवस उत्साहात व अभिमानाने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. दिलीप कुमार जेना यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात हिंदी दिनाचे महत्त्व सांगून ज्यांना जास्तीत जास्त भाषा बोलता येईल तेवढा तो विद्यार्थी प्रतिभा संपन्न असेल, असे बहुभाषिक असण्याचे महत्त्व पटवून दिले सोबतच वर्तमान काळात विद्यार्थ्यांनी भाषेचं न्यूनगंड न बाळगता बोलीभाषेत ही व्यक्त व्हावे असे प्रतिपादन केले.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. मनोज तेलरांधे यांनी हिंदी आपल्या राष्ट्राची राजभाषा असून, ती आपली ओळख आणि संस्कृती जपणारी भाषा आहे. नव्या पिढीने तिचे महत्त्व ओळखून तिच्या संवर्धनासाठी पुढाकार घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले.यावेळी निखिल तिवारी व कांचन छोरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संतोष जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ स्वप्नील मनघे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.सुनील कठाणे, प्रा.अमरीश ठाकरे, प्रा.कल्याणी बिटकुरे, प्रा.अश्विनी डाखोरे आणि आकाश मोहबिया आदींनी सहकार्य केले. याप्रसंगी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देव अवतार क्रांती घडवतो तर संत अवतार शांती निर्माण करतो काचनुरात श्री संत गणपती महाराजांचा १४० वा जन्मोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

धार्मिक परंपरेत अवतारांचे दोन प्रकार सांगितले जातात. देव अवतार आणि संत अवतार जेव्हा अधर्म, अन्याय व अत्याचार जगभर पसरतो, तेव्हा देव अवतार प्रकट होतो. अशा वेळी तो क्रांती घडवून समाजात सत्य, न्याय व धर्माची स्थापना करतो. दुसरीकडे, संत अवताराचा मार्ग वेगळा असतो. तो समाजात प्रेम, भक्ती, करुणा व एकता जागवतो. संत गणपती महाराज, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, गाडगेबाबा यांसारख्या संतांनी जनतेच्या अंतःकरणात



शांततेचा व अध्यात्मिकतेचा दीप प्रज्वलित केला. संत गणपती महाराजांनी विचार आणि साधना यांद्वारे समाजसुधारणा केली. असे मार्मीक विचार अन्नकाल्याच्या किर्तनातुन ह.भ.प. किसनराव महाराज शेंडे यांनी प्रकट केले. काचनुर येथे संत गणपती महाराज यांचा १४० वा जन्मोत्सव रविवार १४ सप्टेंबर रोजी पार पडला. यावेळी बालगोपाल श्रीहरी भजनी मंडळ, काचनुर,जयभोले भजन मंडळ व महिला भजन मंडळ, काचनुर, जगन्नाथ भजनी मंडळ केळकरवाडी वर्धा, हरिल्याचे भजन, हरिपाठ, किर्तन, हरिगीता वाचन आदी धार्मीक कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी परिसरातुन टाळ मृदंगाच्या गजरात मेळवारी काढण्यात आली. यावेळी मृदंग वादक अरुण भातकुले, संवादीनीवर वसंतराव कराळे , विणा वादक नरेश निमकर, गायन जितेंद्र निमकर यांनी साथ संगत केली. सर्वप्रथम जितेंद्र निमकर यांच्या मार्गदर्शनात सामुहीक हरिगीताचे वाचन केले. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.यावेळी आमदार दादाराव केचे, आमदार सुमित वानखेडे , संस्थेचे अध्यक्ष विनायक कराळे, उपाध्यक्ष माधुरी निमकर ,मंदाताई योगीराज किचक, भुबूतकर , अनंत महाराज साठवने, गणेश भुबूतकर , प्रविण किचक, सुनिल किचक, अनिल किचक,प्रविण पुसतकर,योगीनी तळणकर, हरगे, नितीन अरबट, दिनेश वाकेकर, आशिष गाडेकर, प्रशांत घंटेवार, विलास पुसतकर, दिलीप ढाकुलकर, ज्ञानेश्वर जिचकर राजु पुसतकर,अरूण कराळे , प्रकाश कराळे आदीसह शेकडो हरिभक्त उपस्थित होते.

# आरटीओकडून स्कूल बस, व्हॅनची झाडाझडती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

मानकापुरातील अपघातानंतर प्रादेशिक परिवहन विभागाने शहरात विशेष मोहीम सुरू केली आहे. याअंतर्गत सोमवारी शहरात ठिकठीकाणी स्कूल बस, व्हॅनची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून १ लाख ४२ हजारांचे तडजोड शुल्क वसूल केले. यावेळी आरटीओ अधिकारी, कर्मचाऱ्यांनी चालकांचे समूपदेशनही केले. वाहन चालविताना वेगमयार्देचे पालन करा, मोबाईलचा वापर करू नका, वाहतूक नियमांचे पालन करा, आदी बाबत सविस्तर माहिती दिली. तसेच मोटार वाहन कायद्यातील दंडात्मक तरतुदी व विविध गुन्ह्यांकरिता आकारण्यात येणारा दंड याबाबत वाहनचालकांना सांगितले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण बीडकर यांच्या मार्गदर्शनात नागपूर (शहर) कार्यालय व नागपूर (पूर्व) कार्यालयाच्या ३ पथकांनी २२१ स्कूल बसेसची तपासणी केली. त्यात दोषी आढळून आलेल्या ४६ बसेसना इ-चालन जारी करण्यात आले. नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांकडे १ लाख ४२ हजारांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. यामध्ये ७ बसेसच्या चालकांकडे वैध योग्यता प्रमाणपत्र नव्हते. तर वैध परवाना, विमा, पीयूसी, प्रथमोपचार पेटी, अग्निशमन यंत्रणा नसणाऱ्या ३९ बसेस आढळल्या. यातील ४ बसेस विविध पोलिस ठाण्यात जमा करण्यात आल्या आहेत. शनिवारी झालेल्या तपासणीत एकूण २३५ स्कूल बसेस, स्कूल व्हॅनची झाडाझडती घेण्यात आली होती. नियमांचे उल्लंघण करणाऱ्या चालकांकडून ८४ हजार ७०० रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आला. ही कारवाई मोटार वाहन निरीक्षक सतीश नवघरे, पवन बानबाकडे, अर्चना घाणेगावकर, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक राहुल बंजारी, समिपा चिकाटे व आकाश वालदे यांच्या पथकांनी केली.

# १८-१९ सप्टेंबरला अ.भा. ग्राहक पंचायत परिषद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची राष्ट्रीय कार्यकारी परिषद १८ व १९ सप्टेंबर रोजी रेशीमबाग येथे होणार आहे. देशभरातील३८ प्रांतांतील पदाधिकारी या परिषदेत सहभागी होणार असून ग्राहक हक्क संरक्षण, संघटनात्मक विकास आणि धोरणात्मक निर्णयांवर चर्चा होणार आहे. उद्घाटन समारंभ१८ सप्टेंबर रोजी सकाळी९:३० वाजता दत्तोपंत ठेंगडी सभागृहात होणार आहे. राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. नारायणभाई शहा, राष्ट्रीय सचिव जयंत कथेरीया, संघटनमंत्री दिनकर सबनीस, विदर्भ प्रांत सहसंघचालक श्रीधर गाडगे आणि महापौर दयाशंकर तिवारी यांची उपस्थिती राहील.परिषदेच्या यशासाठी प्रांताध्यक्ष डॉ. नारायण मेहरे, सचिव डॉ. चारुदत्त चौधरी व कार्यकर्त्यांनी तयारी केली आहे. ही परिषद ग्राहक चळवळीला नवी दिशा देईल, असा आयोजकांचा विश्वास आहे.

# राजस्व विभागाचा २ ऑक्टोबर पर्यंत महसूल पंधरवाडा

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १६ :

छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानांतर्गत सर्वसामान्य नागरिकांसाठी महसूल विभागाच्या सेवा अधिक सोप्या, जलद आणि पारदर्शक बनविण्यासाठी १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर या कालावधीत "महसूल पंधरवाडा" आयोजित करण्यात आला आहे. हा पंधरवाडा प्रमुख तीन टप्यात राबविण्यात येणार असून यात पांधन रस्ते, सर्वांसाठी घरे व नाविण्यपूर्ण लोकाभिमुक उपक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी हिंगणा तालुक्यात शिवारफेरी घेण्यात आलेली आहे. सर्व नागरिकांनी यात सहभागी होण्याचे आवाहन तहसीलदार सचिन कुमावत यांनी केले आहे.

# पद्मश्री प्रहलाद रामाराव यांचे १८ सप्टेंबर रोजी व्याख्यान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

100 पेक्षा अधिक संस्थांमधील 1,800 हून अधिक इंजिनिअर्सचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इंजिनिअर्स फोरम, नागपूरतर्फे 27 वा अभियंता दिन गुरुवार, 18 सप्टेंबर 2025 रोजी वनामती हॉल, व्हीआयपी रोड, धरमपेठ येथे सायं. 6.30 वाजता आयोजित करण्यात आला आहे.

संरक्षण क्षेत्र सशक्त करण्यात इंजिनिअर्सची भूमिका ही या वर्षीच्या अभियंता दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. प्रसिद्ध एरोनॉटिकल इंजिनिअर व आकाश क्षेपणास्त्राचे शिल्पकार पद्मश्री प्रहलाद रामाराव यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

रामाराव यांना डिफेन्स मिसाइल सिस्टीम क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी या कार्यक्रमात जीवनगौरव पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. त्यांचे याच विषयावर यावेळी प्रमुख व्याख्यान होईल.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कमांडर व्ही. के. जेटली, पूर्व कमीशंड क्रू, आयएनएस विराट हे असतील. नागपूर आणि परिसरातील सर्व इंजिनिअर्सना या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन इंजिनिअर्स फोरमचे अध्यक्ष पी. के. कुळकर्णी यांनी केले आहे.


**PUBLIC NOTICE**

A notice is hereby given to Public at large that Kotak Mahindra Bank Ltd is desirous to take on Leave and License basis commercial premises being Ground Floor adm. 802 Sq. Ft. at building bearing House No. 201 constructed on Plot No. 3 out of Khasra no. 60/2 and 61/2 Bansi Nagar, Hingna Road, Gram Panchayat Digdoh, Taluka Hingna, District Nagpur – 440 016 from Mr. Dwarkaprasad Mulchand Sharma and all the concerned/ anybody whether private individuals, or other entities or government/ semi-government institutions / bodies / authorities, have any claim, right, title, interest, or share in properties herein mentioned or anybody who has objection for the aforesaid transaction are herewith publicly informed to raise their objection/s in writing with copies of all the supportive documents to the undersigned within 7 days from publication of this public notice. If the objections are not received by the undersigned in writing along with copies of all supportive documents within 7 (Seven) days from publication of this public notice, then it will be construed that the title to the said properties are clear and that all such concerned have waived their rights and all such concerned shall be estopped from raising any objections thereafter and that we shall proceed thereafter further in the execution of the Leave and License Agreement or such agreements and all such persons shall be estopped from raising any objections to such transaction thereinafter.

**Legal Department**
**Kotak Mahindra Bank Ltd.**
Kotak Infinity, 5th Floor, Building No. 21, Infinity Park, off Western Express Highway, general A.K. Vaidya Marg, Malad East, Mumbai 400097
**Ph:** +91 22 66055568/5570/55573


# ब.रु. कर्मचारी पतसंस्थेची आमसभा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. १६ :

बनारसीदास रुईया माध्यमिक विद्यालय कर्मचारी सहकारी प्रत्यय संस्था मर्यादित काटोलची 48 वी आमसभा नुकतीच पार पडली. यावेळी सेवानिवृत्त शिक्षकांसह गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

बनारसीदास रुईया हायस्कूलच्या हॉलमध्ये संपन्न झालेल्या सत्कार समारंभात शाळेचे सेवानिवृत्त पर्यवेक्षक प्रशांत सगणे, सेवानिवृत्त शिक्षिका आशा बारई, सेवानिवृत्त पर्यवेक्षिका नेहा कानडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजय राठी सेवानिवृत्त शिक्षिका शोभा लाड यांचा शाल श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच कुमार वसुले, निवेदिता घोरसे, मृण्मयी ढोक, सेरेना ढोले या गुणवंत विद्यार्थ्यांचाही सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला.

सत्कार समारंभ नंतर संस्थेच्या सचिवांनी अध्यक्षांच्या परवानगीने अहवाल वाचन केले.




उपविधीमध्ये झालेल्या दुरुस्त्या सचिवांनी यावेळी नमूद केल्या. तीन लाखापर्यंतची वैयक्तिक कर्जाची मयार्दा पाच लाखापर्यंत वाढविण्यात आली. तसेच रुपये वीस हजार पर्यंतची आकस्मिक कर्ज योजना वाढवून पन्नास हजार रुपयांपर्यंत करण्यात आली. भाग भांडवल धारकांना लाभांश 9% दराने देण्याचे ठरविण्यात आले.

आमसभेला कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष धीरज ढोले, उपाध्यक्ष भोजराजन चंदन, मानद सचिव नारायण कावडकर, खजिनदार श्रीकृष्ण रानोटकर, हिशोबनीस प्रशांत चढोकर, संचालक विजय चौधरी, हेमंत घोरसे, सागर ढोके, हर्षाली थोटे, नयना दुधकवरे यांची मंचावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संचालन हर्षाली थोटे यांनी केले तर आभार नयना दुधकवरे यांनी मानले. आमसभेच्या यशस्वीतेकरिता विठ्ठल ढगे, श्रीधर शेळके, गोपाल तांबूसकर, लता वानखडे यांनी प्रयत्न केले.

## डॉ.झाकीर हुसेन आधुनिकीकरण योजनेसाठी प्रस्ताव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

अल्पसंख्यांक विकास विभागाकडून डॉ. झाकीर हुसेन आधुनिकीकरण योजना २०२५-२६ अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील अल्पसंख्यांक बहुल शासनमान्य खाजगी शाळा, अपंग शाळा, नगरपरिषद शाळा व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहे. पायाभूत सुविधा लाभ पुरविण्याकरीता अनुदान मंजूर करणे या योजनेंतर्गत विहित नमुन्यात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करावेत, मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाही, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी संजय कडू यांनी केले.

# मोकाट श्वानांच्या नियंत्रणासाठी मनपातर्फे विशेष मोहिम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूर महानगरपालिका द्वारा मोकाट कुत्र्यांची नसबंदी व रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत राबविण्यात येत असलेल्या मिशन रेबीज या उपक्रमांतर्गत दोन आठवड्यात 5 हजार 133 श्वानांचे लसीकरण करण्यात आले आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शन अतिरिक्त आयुक्तवसुमना पंत यांच्या देखरेखीत शहरातील मोकाट कुत्र्यांची नसबंदी आणि रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरणासाठी मिशन रेबीज उपक्रम राबविण्यात येत आहे. येत्या २८ सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या उपक्रमांद्वारे शहरातोल मोकाट श्वानांच्या संख्येवर नियंत्रण



ठेवण्यासाठी मदत मिळणार आहे.

वर्ल्ड वाईड व्हेटरनरी सर्व्हिसेस होप, मिशन रेबिज, निर्मिती पिपल्स ॲन्ड ॲनिमल वेलफेअर सोसायटी, नागपूरद्वारा सामूहिक श्वान रेबिज प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिम राबविली जात आहे. या मोहिमेकरिता वर्ल्ड वाईड व्हेटर्नरी सर्व्हिस (डब्ल्यू व्हीएस) तर्फे लसीसह डॉक्टर आणि सहायक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. महानगरपालिकेतर्फे वाहन आणि श्वानांच्या लसीकरणासाठी लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

शहरातील मोकाट प्राण्यांना हाताळणे व त्यांच्यावर नियंत्रणाच्या दृष्टीने नागपूर शहरामध्ये याकरीता भांडेवाडी, गोरेवाडा, आणि महाराजबाग प्राणी जन्म नियंत्रण केंद्र तयार करण्यात आले. येथे मोकाट कुत्र्यांना औषधोउपचारानंतर पश्चात सोडण्यात येत. आतापर्यंत या तिन्ही केंद्रात तीन वर्षात 56 हजार 997 कुत्र्यांचे लसीकरण करण्यात आले आहे.

मनपाद्वारे भांडेवाडी परिसरात आधुनिक श्वान निवारा केंद्र व प्राणी निर्बीजीकरण केंद्र सुद्धा उभारण्यात आले आहे. याशिवाय आजारी, अपघातग्रस्त, पिसाळलेली, चावा घेणारी भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी नागपूर महानगरपालिकेच्या दहाही झोन निहाय वाहन व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे लसीकरण मोहिमेला अधिक गती मिळाली आहे, अशी माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त राजेश भग, व मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांनी दिली. प्राणी प्रेमींनी या अँटी रेबीज लसीकरण मोहिमेत सहभागी होण्यासाठी मनपाद्वारे आवाहन करण्यात आले आहे. या गुगल फॉर्म भरून द्यावयाची आहे. त्यात आपले आपले नाव, पूर्ण पत्ता, झोनचे नाव, फोन नंबर, ईमेल आयडी, श्वानांना अन्न देण्याचे ठिकाण, त्या ठिकाणी असलेल्या श्वानांची संख्या, रेबीज लसीकरणाची स्थिती, आदी माहिती द्यावी भरावी लागणार आहे. त्यानंतर त्या ठिकाणी महानगरपालिकेचे कर्मचारी व स्वयंसेवी संस्थेचे डॉक्टर पोहचून कुत्र्याचे लसीकरण करणार आहेत.


महानिर्मिती

## भु. औ. वि. कें.

ई-निविदा सूचना क्र. ११/२०२५-२६

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राकडून खालील पुरवठा / कामांसाठी ऑनलाईन निविदा मागविल्या जात आहेत.


| अनु. क्र. | निविदा क्र. / विभाग | निविदा तपशील | निविदेची अंदाजित किंमत / बयाना रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | ३००००६०८११<br>कोळसा हाताळणी विभाग २x५०० मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र येथील कोळसा हाताळणी विभाग २x५०० मेगावॅट मध्ये इम्पॅक्ट क्रशर क्रमांक १०१ आणि १०२ च्या व्यापक देखभालीसाठी द्विवार्षिक करार. | रु. ४,३६,४८,७९६/-<br>रु.४,४०,०००/- |
| २ | ३०००००६१७४३<br>राख हाताळणी विभाग २१० मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथील मुख्य प्लांट बीटीपीएस ते वेल्हाळा राख बंधाऱ्यापर्यंत २१० मेगावॅट क्षमतेच्या तळाशी राख, फ्लाय ॲश स्लरी पाइपलाइन आणि सील वॉटर ट्रान्सफर पाइपलाइनच्या गळतीवर लक्ष ठेवण्याच्या कामासाठी द्विवार्षिक करार. | रु.२,९८,८१,१९०/-<br>रु.३,०२,३००/- |
| ३ | ३००००६१५०१<br>सुरक्षा विभाग २x५०० मे. वॅ | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे सुरक्षा विभाग ६६० मेगावॅट क्षमतेच्या युनिट ६ साठी सुरक्षा उपायांची तपासणी आणि दुरुस्तीचे काम. | रु.२,१८ ,७०,०००/-<br>रु.२,२२,२००/- |
| ४ | ३००००६१७१९<br>कोळसा हाताळणी विभाग २x५०० मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे कोळसा हाताळणी विभाग २x५०० मे. वॅ रेल्वे साइडिंगसाठी सिग्नलिंग आणि दूरसंचार देखभालीसाठी द्विवार्षिक करार. | रु.७०,४३,७६८/-<br>रु.७३,९००/- |
| ५ | ३००००६१७१७<br>आग्निशमण विभाग २x५००मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथील २x५०० मेगावॅट क्षमतेच्या EST-३ डिटेक्शन सिस्टीमच्या फायर डिटेक्शन आणि अलार्म सिस्टीमच्या विविध सुटे भागांची खरेदी. | रु ५४,१४,४१३/-<br>रु. ५७,६००/- |
| ६ | ३००००६१५०२<br>सुरक्षा विभाग | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथील सुरक्षा विभाग ५०० मेगावॅट क्षमतेच्या एचटी/एलटी बोर्ड/पॅनल्ससमोर 'इन्सुलेशन इपॉक्सी कोटिंग' पुरवण्याचे आणि लावण्याचे काम. | रु. ४८,०४ ,१५०/-<br>रु. ५१ ,५००/- |
| ७ | ३००००६१५६१<br>कोळसा हाताळणी विभाग ६६० मे. वॅ | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथील कोळसा हाताळणी विभाग ६६० मे. वॅ मध्ये राख स्लरी सबमर्सिबल पंपची खरेदी करण्याचा करार . | रु.२९,२०,०००/-<br>रु.३२,७००/- |

निविदा खर्च १ ,१८०/ - (जीएसटी सहित) आहे. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या.
https://eprocurement.mahagenco.in/.

मुख्य अभियंता (सं.आणि सु.),
भु. औ. वि. कें., दीपनगर.


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

राष्ट्रनामा




सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com


# पंचाहत्तरीचे मोदी, भाजपाचे पॉवर हाऊस

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच भारतीय जनता पक्षाला नवा चेहरा दिला. मोदी नावाच्या जादुने भाजपाला सलग तीन वेळा केंद्रात सत्ता मिळवून दिली. स्वतः मोदींनी पंतप्रधानपदाची हॅटट्रीक संपादन केली. दोन कोटी सदस्य संख्या असलेला भाजपा हा जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असल्याचा दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी केला असला तरी त्यामागे नरेंद्र मोदींच्या लोकप्रियतेचे वलय व पाठोपाठ निवडणुका जिंकण्याचे कौशल्य आहे. वयाची पंचाहत्तरी झाली म्हणून पक्षातील लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी आदी दिग्गजांना सत्तेच्या पदावरून दूर ठेवले गेले व त्यांची मार्गदर्शक मंडळात रवानगी करण्यात आली. पण नरेंद्र मोदी यांनी वयाच्या पंचाहत्तरीत पदार्पण केले असले तरी पक्षातील कोणीही त्यांना आता निवृत्त व्हा, असे सांगत नाही. याचे एकच कारण म्हणजे भाजपाला केंद्रात व राज्याराज्यांत सत्ता मिळवून देण्याचा मंत्र त्यांच्याकडे आहे.

मोदी यांचा पक्षात व सरकारमधे कमालीचा दरारा व धाक आहे. त्यांना कोणी प्रश्न विचारू शकत नाही आणि त्यांना प्रश्न विचारलेले आवडतही नाहीत. आपले सरकार जे काम करीत आहे ते लोकांपर्यंत पोचवा एवढेच त्यांचे पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते यांना सांगणे असते. सरकारमधील मंत्र्यांनाही कामाचे मुक्त स्वातंत्र्य नाही, पंतप्रधानांना जे अभिप्रेत आहे, तेच काम मंत्र्यांना करावे लागते. सतरा सप्टेंबर हा मोदींचा वाढदिवस. मोदी वयाची पंचाहत्तरी झाल्यावर निवृत्त होणार का? याची चर्चा गेले काही महिने माध्यमातून होत राहिली. पण मोदी देशाच्या सर्वोच्च पदावरून हटणार नाहीत व त्यांची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील कोणीही त्यांना निवृत्त व्हा किंवा यापुढे मार्गदर्शक मंडळात जा असे सांगितलेले नाही.

निवडणुकीच्या राजकारणात मोदी नावाची जादू आजही बऱ्यापैकी चालते. सलग अकरा वर्षे पंतप्रधानपदावर राहिलेल्या नरेंद्र मोदी यांना सध्या पंचाहत्तरीत देश पातळीवर पर्याय उभा राहिलेला नाही. संघ स्वयंसेवक ते पंतप्रधान असा मोदींचा प्रवास थक्क करणारा आहे. त्यांनी कधी ग्रामपंचायतीची निवडणूक कधी लढवली नसताना ते २००१ मधे गुजरातचे मुख्यमंत्री झाले. चार वेळा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. ते कधीही खासदार किंवा केंद्रात मंत्री झाले नसताना २०१४ मधे त्यांनी थेट पंतप्रधानपदाची शपथ घेतली.

मोदी हे सातत्याने आपल्या भाषणातून काँग्रेसला टार्गेट करीत असतात. काँग्रेसपासून देशाला धोका आहे, काँग्रेस पक्ष पाकिस्तान धार्जिणा आहे, काँग्रेसच्या काळात दहशतवाद व भ्रष्टाचार वाढला वगैरे वगैरे ते सतत सांगत असतात. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी असे एका परिवाराने देशाला तीन पंतप्रधान दिले. सोनिया गांधी व राहुल गांधी आणि प्रियंका वड्रा या तिघांची नावे देशात घराघरात ठाऊक आहेत. काँग्रेस हा एकच राष्ट्रीय पक्ष असून तोच भाजपाला देश पातळीवर आव्हान देऊ शकतो यांची जाणीव मोदींना असल्याने ते काँग्रेस व गांधी परिवारावर नेहमीच नेम धरत असतात.

पक्षाच्या कार्यकर्त्यांना सतत कार्यक्रम देणे, वेगवेगळे उपक्रम व मोहिमा राबविणे, केवळ भाजपाच तुमच्यासाठी काम करीत असतो असे जनतेच्या मनात बिंबवणे, पक्षाचे बॅनर्स- होर्डिंग मोदी- शहांच्या तसेच मुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्षांच्या फोटोसह मोक्याच्या जागी बारा महिने झळकत ठेवणे या बाबतीत कोणताही पक्ष भाजपाशी बरोबर करू शकणार नाही. देशात एकच पक्ष व एकच नेता आहे हे ठसविण्याचा भाजपाचा सतत प्रयत्न असतो. मोदी हे सर्वसामान्य जनतेला आकर्षित करणारे नेतृत्व आहे तर संघटना बांधणी व कामाचे नियोजन याची सर्व जबाबदारी अमितभाई शहांवर आहे. मोदी व शहा हे दोघे गुजरातचे आहेत. जनतेला आकर्षित करायचे व विरोधकांना पराभूत करायचे या दोन्ही गोष्टी ही जोडी एकाच वेळी करीत असते.

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव मोदींनी देशभर एक मोठा



उत्सव म्हणून साजरा करून दाखवला, या उत्सवात घर घर तिरंगा ही घोषणा दिली व जनतेने त्याला उदंड प्रतिसाद दिला. कोविड काळातही त्यांनी मेणबत्या लावा, घंटा वाजवा, थाळ्या वाजवा असे आवाहन केले त्यालाही जनतेने भरघोस प्रतिसाद दिला. त्यांच्या घंटा व थाळ्या वाजवा याची टिंगल टवाळी बरीच झाली. पण आपले विरोधक काय म्हणतात, याकडे मोदी कधीच लक्ष देत नाहीत, त्यांना जे पाहिजे तेच ते करीत असतात. बिहारमधील काँग्रेसच्या सभेत तिथल्या मंचावरून कोणी तरी मोदींच्या आईबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले, त्यावेळी कोणाही मंचावर जबाबदार नेता हजर नव्हता. पण काँग्रेसने पंतप्रधानांच्या आईचा अपमान केला, म्हणजे हा भारत मातेचा अपमान केला, असे सांगत भाजपाने बिहार बंद पुकारला. यापूर्वी मोदींनी त्यांच्या भाषणात सोनिया गांधीबाबत काय भाषा वापरली होती, याचा पाढा नंतर काँग्रेसने वाचायला सुरूवात केली. पण आपल्या आईचा अपमान केला म्हणून राहुल किंवा प्रियंका यांना देशात कुठे बंद पुकारावा असे सुचले सुध्दा नव्हते.

यापूर्वी अटल बिहारी वाजपेयी तीन वेळा पंतप्रधान झाले. लालकृष्ण अडवाणी हे उपपंतप्रधान झाले. पण त्यांना जे जमले नाही ते मोदींनी करून दाखवले. अयोध्येत राम मंदिर उभारून दाखवले, जम्मू-काश्मीरला विशेषाधिकार देणारे ३७० वे कलम रद्द केले, तिहेरी तलाक पध्दत रद्द केली, लोकसभा व विधानसभा निवडणुकीत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा कायदा केला. समान नागरी कायदा आणि एक देश एक निवडणूक यासाठी वाटचाल चालू आहे. नवीन संसद भवन उभारले. देशभर एकच कर प्रणाली असलेला जीएसटी लागू झाला, उज्वला गॅस योजनेचा लाभ ११ कोटी घरात मिळाला, ८१ कोटी गरीबांना दरमहा ५ किलो धान्य मिळू लागले, स्वच्छ भारत, आयुष्मान भारत, मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, कोविड काळात सर्व देशवासियांना मोफत लस, लखपती दीदी, वंदे भारत ट्रेन, झानेश्वकेडील राज्यात व काश्मीरच्या खोऱ्यात रेल्वेचा विस्तार, तेवीस शहरांत मेट्रोचे जाळे, ८ नवीन आयआयएम, ४९० नवीन विद्यापीठे रस्ते व महामार्गांची वेगवान बांधणी अशा कल्याणकारी व पायाभूत सुविधा निर्माण करणाऱ्या अनेक योजी मोदींच्या कारकिर्दीत कार्यान्वित झाल्या आहेत. डिजिटल क्रांतीने तर देशाच्या अर्थव्यवस्थेला विलक्षण गती मिळाली आहे.

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नंतर सर्वाधिक काळ पंतप्रधानपदावर राहण्याचा मान मोदींनी मिळवला आहे. २६ मे २०१४ रोजी त्यांनी पहिल्यांदा पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. ४८०० दिवसांपेक्षा जास्त दिवस ते या पदावर आहेत. पंडित नेहरू हे १९४७ ते १९६४ या काळात ६१२६ दिवस पंतप्रधान होते. इंदिरा गांधी १९६६ ते १९७७ या काळात ४०७७ दिवस पंतप्रधान होत्या. डॉ. मनमोहन सिंग हे २००४ ते २०१४ या काळात ३६५६ दिवस पंतप्रधान होते. अटल बिहारी वाजपेयी पहिल्यांदा तेरा दिवस, नंतर तेरा महिने व नंतर पाच वर्षे पंतप्रधान होते, राजीव गांधी १८५७ दिवस पंतप्रधानपदावर होते.

मोदी भाजपाचे राष्ट्रीय सचिव व प्रवक्ते असताना पत्रकारांना नेहमी भेटत असत. गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यावरही ते पत्रकारांशी चर्चा करीत. पंतप्रधान झाल्यापासून त्यांनी अकरा वर्षात एकदाही पत्रकार परिषद घेतली नाही, याचे कारण तेच सांगू शकतील. ते कधी तरी माध्यमांना मुलाखती देतात मग पत्रकार परिषद घेणे का टाळतात ? देशात त्यांना विश्वगुरू म्हटले जाते पण पहलगाम हल्याकांडानंतर भारताने पाकिस्तानात घुसून दहशतवादी तळ नष्ट केले तेव्हा भारताची बाजु जगातील एकाही देशाने उचलून घेतली नाही, याचे कारण काय ? ऑपरेशन सिंदूर संपलेले नाही असे सांगायचे, सिंधु नदीचे पाकिस्तानला वाहून जाणारे पाणी बंद केल्यावर रक्त व पाणी एकाच वेळी वाह शकत नाही म्हणायचे, मग पाकिस्तानबरोबर भारतीय क्रिकेट संघाला टी टुवेंटी खेळायला पाठवायचे हा विरोधाभास कसा ? मणिपूरमधे असंतोष खदखदत असताना देशात व विदेशात अनेक ठिकाणी दौरे करणारे मोदी तब्बल दोन वर्षानंतर त्या राज्यात गेले, हा विलंब कशासाठी ? जगातील सर्वात मोठी संसदीय लोकशाही असलेल्या भारतावर रशिया व चीन या दोन हुकुमशाही देशांबरोबर सलगी करण्याची वेळ आली व अब की बार ट्रम्प सरकार अशी घोषणा देणारे मोदी आता त्यांना टाळू लागले आहेत. २०१४ मधे केंद्रात भाजपा सरकार आल्यानंतर काँग्रेसमुक्त भारत अशी घोषणा दिली गेली, मोदींच्या वलयापुढे काँग्रेसला पाठोपाठ पराभव पत्करावे लागले. पण आज लोकसभेत काँग्रेसचे शंभर खासदार आहेत व लोकसभा व राज्यसभेत विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसकडे आहे, याकडे दुर्लक्ष कसे करता येईल ? सर्व स्तरावर भ्रष्टाचार कमालीचा वाढला आहे पण त्याविषयी सत्ताधारी कोणीच बोलत नाही. आज देशातील बहुसंख्य मिडिया मोदींचे गुणगान करतो, असा प्रमुख आक्षेप घेतला जातो. याचे कारण माध्यमांच्या समुहाचे मालक हे मोदींवादी आहेत व देशात विरोधी पक्ष तुल्यबळ नाही आणि प्रबळही नाही. ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत (पंचायत ते पार्लमेंट) सर्वस्तरावर सत्ता भाजपाची असली पाहिजे, हा भाजपाचा अजेंडा आहे. जिथे भाजपा कमी आहे तिथे मित्र पक्षांची मदत घेतो व भाजपा ताकदवान झाल्यावर नंतर त्याच मित्र पक्षांची कशी फरफट होते हे देशभर बघायला मिळते. मोदींचा करिष्मा हा भाजपाचा हुकमी एक्का आहे. वाजपेयी-अडवाणीपेक्षा मोदी-शहांचा भाजपा वेगळा आहे. २०२९ ची लोकसभा निवडणूक मोदींच्या डोळ्यापुढे आहे. सत्तेच्या दिशेने नेणारे मोदी हेच भाजपाचे पॉवर हाऊस आहे.

# कोणतीच अपेक्षा न ठेवता निस्वार्थ समाजकार्य करा...

आजकाल समाजकार्य करण्याची स्पर्धा सर्वत्र जोमाने सुरू आहे. प्रत्येकजण समाजकार्य करण्यासाठी निस्वार्थ भावनेतून व कोणतीच अपेक्षा न ठेवता समाजकार्य करत असल्याचे मला तर काही दिसत नाही. समाजकार्य करण्यामागे प्रत्येकाचा एक स्वार्थी अजेंडा लपलेला आहे, असेच म्हणावे लागेल. कारण आजकाल प्रत्येकजण सामाजिक जाणीवेतून गोरगरीब, तळागाळातील माणसांच्या उन्नतीसाठी व भल्यासाठी तळमळीने समाजकार्य करताना दिसत नाही. फक्त स्वतःचा स्वार्थी डाव साधण्यासाठी किंवा स्वतःचे नाव समाजसेवक व जनसेवक म्हणून मिरवण्यासाठी अथवा भविष्यात एखादे इलेक्शन लढवण्यासाठी, नाहीतर सामाजिक कार्याबद्दल विविध पुरस्कार मिळावे म्हणून आजकालच्या लोकांची सामाजिक कार्य करण्याची धडपड वेगाने चालू असताना दिसत आहे. प्रत्येक जण स्वार्थापायी समाजसेवा करत असल्याचे चित्र आपल्याला दिसत आहे. मान्य आहे की, तुम्ही समाजकार्य करत आहात, गोरगरीब जनतेच्या भल्यासाठी लढत आहात, गावच्या विकासासाठी झटत आहात परंतु हे समाजकार्य करण्यामागे तुमचा उद्देश निस्वार्थ व प्रामाणिक असला पाहिजे. तरच तुमच्याबद्दल जनतेच्या मनात कायम आदराचे स्थान असेल. तुमचा उद्देश केवळ आणि केवळ सामाजिक सेवा आणि गोरगरिबांचे कल्याण आणि अडीअडचणीत सापडलेल्या लोकांना मदत करणे हाच असला पाहिजे. स्वतःचे नाव मोठे व्हावे म्हणून अथवा लोकांनी समाजसेवक व जनसेवक म्हणावे म्हणून, भविष्यात एखाद्या इलेक्शनला उभे करावे म्हणून किंवा गावकऱ्यांनी आपल्याला मानसन्मान द्यावा म्हणून सामाजिक कार्य करणे हे आजकालच्या लोकांचे स्वार्थी धोरण बनले आहे. मित्रांनो तुम्ही कोणतीच स्वार्थी अपेक्षा न ठेवता निरपेक्षपणे जर समाजकार्य करू लागलात तर खरोखर तुम्हाला गावकरी मोठं करतील आणि तुम्ही जर केवळ स्वार्थासाठी समाजकार्य आणि समाजसेवा करत असाल तर लोक तुम्हाला कधीच मानपान देणार नाहीत, तुम्ही जरी भविष्यात एखाद्या इलेक्शनला उभे टाकलात तर तुम्हाला गावकरी कधीच निवडून देणार नाहीत किंवा तुमच्या समाजसेवेला म्हणावे तेवढे प्राधान्य देणार नाहीत. कारण त्यांना माहित असते की, तुम्ही जी समाजसेवा व समाजकार्य करत आहात म्हणजेच संकटात व अडीअडचणीत सापडलेल्या लोकांना मदत करत आहात, गावच्या विकासासाठी विविध योजना आणत आहात, म्हणून तुम्हाला लोक निवडून देतील किंवा तुमच्या नावाचा उदो उदो करतील असे मला तर वाटत नाही. गावकरी व समाज बांधव खूप हुशार असतात. त्यांना तुम्ही करत असलेल्या कामाबद्दल तुमचा खरा उद्देश आणि तुमचे टार्गेट काय आहे? तेव्हाच कळून चुकते. तुम्ही समाजासाठी कार्य करत नसून आपल्या स्वतःचे नाव मोठे व्हावे आणि आपण भविष्यातील एखादे इलेक्शन जिंकावे म्हणून समाज कार्य करत आहात हे लोकांना माहीत असतेच. म्हणून आपण इलेक्शनला जरी थांबलात, तरी लोक तुम्हाला निवडून देतील याची शाश्वती मी तर देत नाही. कारण लोकांना माहीत असते की, हा व्यक्ती केवळ स्वार्थी आहे. हा केवळ स्वार्थासाठी व पुढील स्वार्थी अजेंडा डोळ्यासमोर ठेवून समाजाची कामे करण्याचा प्रयत्न करत आहे. याला आपण निवडून दिल्यावर हा माणूस गावातील विकास कामे काहीच करणार नाही, तो केवळ स्वतःचे घर भरेल आणि समाजाला वाऱ्यावर सोडेल. कारण त्याचा मुख्य उद्देश व अजेंडा हा स्वतःसाठी पैसा कमावणे आणि स्वतःचे नाव मोठे करणे हा असतो. म्हणून त्यांना सुजान गावकरी इलेक्शनमध्ये दणदणीत पराभूत करतात. आणि जो व्यक्ती कोणतीच अपेक्षा न ठेवता व कोणताच स्वार्थ न बाळगता खरोखर तन-मन-धनातून तळमळीने समाजकार्य व समाजसेवा करत राहतो. त्याच्या अंगी जन्मजात समाजसेवा व समाजकार्य भिनलेले आहे, म्हणून तो केवळ समाजाच्या भल्यासाठी निरपेक्षपणे समाज कार्य करत राहतो, त्याला समाज सुद्धा सलाम करतो. आणि त्याच्या पाठीमागे राहून त्याला गावचा प्रतिनिधी म्हणून सरपंचकीला किंवा पंचायत समितीला भरघोस मतांनी निवडून देतो. आणि तो सुद्धा निवडून आल्यावर गावचा विकास व गावची विकास कामे पोटतिडकिने करतो. परंतु अशी माणसे सध्या समाजात फार कमी आहेत. बॅनर बाजी, पेपर बाजी आणि टीव्हीवर बातम्या देऊन प्रसिद्धी करायची आणि स्वतःचे नाव मोठे करायचे हा हेतू आत्ताच्या राजकीय लोकांचा झाला आहे. जो व्यक्ती निरपेक्षपणे व निस्वार्थपणे समाजसेवा करत राहतो अशा व्यक्तीच्या मागे गावकरी सुद्धा एकमताने व एक दिलाने उभे राहतात. आणि त्यांना कोणत्याही निवडणुकीत प्रचंड मतांनी विजयी करतात. आपल्या देशात अनेक महामानव होऊन गेले. त्यांनी कोणतीच अपेक्षा न ठेवता किंवा कोणताच स्वार्थ न बाळगता केवळ समाजासाठी व देशासाठी स्वतःचे जीवन वाहून नेले. अनेक समाजकंटकांचा विरोध सहन करीत ते आपले कार्य निरपेक्षपणे व निस्वार्थपणे जोमाने करतच राहिले. म्हणूनच त्यांना समाजाने, देशाने, नव्हे तर जगाने महापुरुष, महामानव, समाजसेवक व निस्वार्थ राजकारणी ही उपाधी दिली आहे. त्यांना या जगातून जाऊन कित्येक वर्ष होत आहेत तरीसुद्धा अजूनही त्यांच्या कार्याचा व सामाजिक योगदानाचा उदो उदो केला जात आहे. शांतीचे व अहिंसेचे प्रतीक तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, भारत भूषण व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे या महापुरुषांनी कोणताच स्वार्थ न पाहता, स्वतःच्या घरादाराचा विचार न करता आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवून देशासाठी, समाजासाठी आणि दिनदलित, कष्टकरी, शोषित, पीडित आणि वंचितांच्या भल्यासाठी शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपले आयुष्य खर्ची घातले. म्हणूनच या महापुरुषांचा इतिहासात खरे समाज सुधारक व समाजसेवक म्हणून गौरव केला आहे. हेच खरे समाजसुधारक व समाजसेवक म्हणून ओळखले जातात. या महापुरुषांची प्रेरणा घेऊन आत्ताच्या नवयुवकांनी समाजसेवेचे कंगन हाताशी बांधून निस्वार्थपणे व कोणतीच आशा अपेक्षा न बाळगता मोठ्या मनाने व तळमळीने समाज कार्य करावे. प्रसिद्धीपासून चार हात लांब राहावे. आपण स्वतःच समाजसेवक व सामाजिक कार्यकर्ता म्हणून मिरवण्यापेक्षा लोकांनी आपल्याला समाजसेवक म्हणावे आणि आपल्या कार्याचा सन्मान करावा एवढेच मला वाटते...


**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**


# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन



आज १७ सप्टेंबर, आजचा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र मराठवाडा प्रांत हा पारतंत्र्यातच होता. पूर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थानात विलीन होता. हैदराबाद संस्थानावर निजाम उर उस्मान अली खान निजाम उल मुल्क आसफजाह याचे राज्य होते. निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास स्पष्ट नकार दिला होता. मात्र हैदराबाद संस्थानातील जनता भारतात सामील होण्याच्या बाजूने होते. निजामाच्या संस्थानातून मुक्त होऊन भारतीय संघ राज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम आंदोलन सुरू झाले. हैदराबाद संस्थानाची लोकसंख्या त्यावेळी दीड कोटीच्या वर होती. या संस्थानात तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग होता. मुक्ती संग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रिझवी याने जनतेवर खूप अत्याचार केले. दुसऱ्या बाजूला स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संग्राम वेगात सुरू होता. मराठवाडा मुक्ती संग्राम मराठवाड्यातील गावागावात लढला जात होता. यात हजारो स्वातंत्र्य सैनिक पुढे आले. स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ लढ्यानंतरही निजाम शरण येत नाही उलट जनतेवरील अन्याय अत्याचार वाढतच आहे हे पाहून १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद संस्थानात पोलीस कारवाई सुरू केली. सरदार वल्लभभाई पटेल हे त्यावेळी भारताचे गृहमंत्री होते. ते खूप धाडसी होते त्यांच्या धाडसी आणि अचूक निर्णयाने जनतेस न्याय मिळाला. मुख्य फौजा सोलापूरकडून घुसल्या. पहाटे चार वाजता कारवाई सुरू झाल्यावर २ तासात नळदुर्ग व सायंकाळ पर्यंत तुळजापूर, परभणी ते मणीगड, कनेरगाव भारतीय फौजांनी सर केले. चाळीसगावहुन निघालेल्या फौजेने कन्नड, दौलताबाद काबीज केले. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद सर करून भारतीय फौजा पुढे निघाल्या. भारतीय फौजांपुढे निजामाच्या फौजेचे काही चालले नाही. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाचा सेनाप्रमुख जनरल अल इद्रीस याने शरणागती पत्करली. सेनाप्रमुखच शरण गेल्याने निजामही शरण आला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या गुलामीतून मुक्त झाले. हैदराबाद मुक्ती संग्राम यशस्वी झाला. हैदराबाद संस्थानावर तिरंगा फडकला. हैदराबाद संस्थानातील निजामाच्या अन्यायी राजवटी विरुद्धचा लढा मराठवाड्यातील जनतेने यशस्वी केला. तेंव्हापासून आजचा दिवस म्हणजे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम म्हणून साजरा केला जातो. मराठवाडा मुक्ती संग्रामात ज्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या स्वातंत्र्य सैनिकांना मानाचा मुजरा. सर्व मराठवाडा वासीयांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!




**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**


## छत्रपतींच्या स्वराज्यात धर्माधारित वसाहत होणे योग्य की अयोग्य

मुंबई पासून ७० किलोमीटर अंतर असलेल्या कर्जत शहरात सुकून एम्पायर नावाची केवळ मुसलमानांसाठीची एक वसाहत बांधण्यात येत आहे. येथे हलाल जीवनशैली विकसित केली जाणार आहे. विशेष म्हणजे याला रेरा म्हणजेच रियल इस्टेट रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट कायद्याच्या अंतर्गत प्रशासनाने संमती दिली आहे. हलाल जीवन शैली म्हणजे इस्लामच्या नियमानुसार अनुमती असणारी गोष्ट. धर्माधिरित वसाहती बांधणे हे संविधानाच्या तत्वांची पायमल्ली करण्यासारखेच आहे सरकार जर याला अनुमती देत असेल तर ही अत्यंत चिंतेची बाब आहे.कर्जत शहरात ८०% हिंदू आहेत व १३% मुसलमान आहे. सुकून एम्पायर सारख्या वसाहती निर्माण झाल्या आणि त्यातून मुसलमानांचे किंवा घुसखोरांचे संघटन झाले तर हे प्रमाण उलट होण्यास वेळ लागणार नाही. हलाल प्रमाणित वसाहती म्हणजे मुसलमानांसाठी एक प्रकारे पायघड्या घालण्यासारखे आहे. राज्यात अनेक असे भाग आहेत जिथे कधीकाळी हिंदू बहुल वस्ती होती पण आता तिथे मुसलमान बहुल वस्त्या झाल्या आहे.आम्हाला हिंदू त्यांच्या वसाहती घर देत नाही, आमच्या समाजासमोर असंख्य प्रश्न अडचणी, संकटे असतात आम्हाला अनेक तडजोडी कराव्या लागतात इकडे आम्हाला सुरक्षित जीवन जगता येईल म्हणून असे निर्णय घ्यावे लागतात मग हिंदूंना संघर्ष नसतो का उलट अनेकदा मुसलमानांकडून अन्याय, अत्याचार, विकृती हे सहन करायचे वासनांद नजरांची शिकार व्हायचे त्यांचा उद्दमपणा निमूट सहन करायचा हे केवळ आणि केवळ हिंदूच करत असतो. सुकून एम्पायरला आता हलाल जीवनशैलीचे जोड मिळाल्यावर याहून वेगळे काय होणार? धर्मनिरपेक्ष भारतात धर्माधारित आरक्षण दिले, धर्माधारित सुविधा दिल्या, धर्माधारित कायदे दिले म्हणूनच मुसलमानांनी धर्माधारित अर्थव्यवस्था हलाल चालू केली आणि आता धर्माधारित वसाहत सुकून एम्पायर. भारत सरकारच्या राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने एक पोस्ट प्रसारित केली आहे आणि त्यात ते म्हणतात धर्मा धर्मात भेद करणारे हे बांधकाम म्हणजे एक प्रकारे विष आहे. हे राष्ट्रअंतर्गत मोठे षडयंत्र असून याप्रकरणी सरकारला नोटीस बजावली आहे. मानव अधिकार आयोगाने याची तातडीने नोंद घेतली हे निश्चितच स्तुत्य आहे पण केवळ नोटीस बजावून न थांबता सरकारकडून या प्रकरणात कारवाई होईपर्यंत हे प्रकरण आयोगाने धरून लावायला हवे. या वसाहतीचा ताबा एप्रिल २०३० मध्ये मिळेल असे विज्ञापनात दिले आहे तोपर्यंत न थांबता अपेक्षित कारवाई व्हायलाच हवी. ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमकांशी लढून हिंदवी स्वराज्य स्थापन केले आणि रायगडाला ज्याची राजधानी बनविले त्या राजधानीत सुकुन एम्पायर उभे राहणे हे धोकादायक आणि लाजिरवाणे आहे. देशात मिनी पाकिस्तान निर्माण करण्यासारखेच आहे. १९४७ साली धर्माच्या आधारावर देशाची फाळणी झाली. अश्याप्रकाराच्या वसाहती निर्माण करून देशाची परत फाळणी करण्याचा घाट घातला जात आहे का?


**लीना मकरंद गाडगीळ**
**पनवेल.**


# इतिहास, भूगोल आणि प्रेरणादायी वारसा : किल्ले शिवनेरी

सह्याद्रीच्या हिरव्यागार कुशीत वसलेला शिवनेरी किल्ला केवळ एक किल्ला नाही, तर महाराष्ट्राच्या इतिहासातील अद्वितीय स्मृतीचिन्ह आहे. जुन्नर शहराच्या उत्तरेला उभा असलेला हा गड जणू त्या भूमीचा रक्षक बनून शतकानुशतके उभा आहे. इथे प्रत्येक दगड, प्रत्येक कडा, प्रत्येक तट इतिहासाची गाथा सांगतो.

इ.स. सहाव्या शतकापासून अस्तित्वात असलेला शिवनेरी किल्ला महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वाचा साक्षीदार आहे. सुरुवातीला हा किल्ला एक महत्त्वाचा लष्करी ठाणे म्हणून उभारण्यात आला होता. अनेक राजवटींनी या किल्ल्यावर आपले वर्चस्व गाजवले. मात्र, भोसले घराण्याच्या काळात याला खऱ्या अर्थाने ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.

१५९५ मध्ये मालोजीराजे भोसले यांच्या ताब्यात हा गड आला. याच ठिकाणी, १९ फेब्रुवारी १६३० रोजी, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला. या किल्ल्याच्या साक्षीने त्यांचे बालपण घडले. ज्या किल्ल्यावर एका युगपुरुषाने पहिला श्वास घेतला, तो किल्ला स्वाभाविकच असामान्य तेज आणि पावित्र्य लाभलेला ठरतो.बालवयातच त्यांनी राज्यकारभार, युद्धकला आणि मुत्सद्देगिरीचे धडे येथेच गिरवले.

शिवनेरीचा निसर्गसंपन्न परिसर, मजबूत तटबंदी आणि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून केलेली रचना पाहिल्यास शहाजी राजांनी हा किल्ला निवडण्यामागचे महत्त्व लक्षात येते. शिवनेरीवर झालेल्या संस्कारांमुळेच शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा मिळाली.

शिवनेरीचे महत्त्व केवळ त्याच्या संरक्षणात्मक रचनेत नाही तर त्याच्या सामरिक स्थानातही दडलेले आहे. नाणेघाट आणि माळशेज घाट या प्राचीन व्यापारी मार्गांवर नजर ठेवणाऱ्या या किल्ल्यामुळे येथील सत्ताधाऱ्यांना व्यापारावर नियंत्रण ठेवणे सहज शक्य होत असे. सातवाहनांच्या काळापासून या घाटखिंडी पश्चिम किनाऱ्यावरील समृद्ध बंदरांना देशाच्या आतील प्रदेशाशी जोडत होत्या. त्यामुळे या परिसरावर नियंत्रण म्हणजे व्यापार, सत्ता आणि सामरिक बळ या तिन्ही गोष्टींवर पकड मिळविणे होय. म्हणूनच, पुढे कुठलाही राजवंश आला तरी शिवनेरीवर नियंत्रण मिळवणे हे त्यांच्यासाठी अनिवार्यच होते.

शिवनेरीची रचना ही युद्धकौशल्याचे अद्वितीय उदाहरण आहे. डोंगरकड्यांचे नैसर्गिक बळ आणि त्याला जोडलेली भक्कम चिरेबंदी, तटबंदी यामुळे हा किल्ला जवळपास अभेद्यच मानला जात असे. साधारणपणे साडेतीन हजार फूट उंचीवर वसलेल्या या किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी सात दरवाज्यांतून जावे लागते. हे दरवाजे वळणदार व गुंतागुंतीच्या पद्धतीने बांधलेले असल्यामुळे शत्रू गोंधळून जाई, त्याचा वेग मंदावला जाई आणि मग गडावरून हल्ला चढविणे सोपे होई.

किल्ल्याच्या माथ्यावर पोहोचल्यानंतर एक विस्तीर्ण पठार दिसते. त्यात निवासासाठी घरे, धान्यसाठ्याची कोठारे, तसेच प्रस्तरात खोदलेली पाण्याची मोठी टाकी आहेत. उन्हाळ्यातील उष्णतेत किंवा शत्रूच्या दीर्घकाळ चालणाऱ्या वेढ्यातही या पाणीसाठ्यामुळे गडाची स्वायत्तता टिकून राहायची. किल्ल्याच्या उत्तरेला कडेलोट नावाचा उग्र कडा आहे, जिथून शत्रूंना खाली फेकले जात असे.

किल्ल्याच्या आत शिवाई देवीचे मंदिर आहे. शिवनेरी हा केवळ सैन्यदृष्ट्या महत्त्वाचा गड नाही, तर धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही पूज्य मानला जातो.

आजही शिवनेरी महाराष्ट्राच्या लोकमानसात अपार आदराचे स्थान राखतो. दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती येथे मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. हजारो शिवभक्त, शाळकरी मुले, इतिहासप्रेमी व पर्यटक या दिवशी गडावर एकत्र येतात. शिवनेरीचा गगनभेदी निनाद त्यांना धैर्य, शौर्य आणि स्वराज्याच्या विचारांनी प्रेरित करतो.

शिवनेरी किल्ल्याचा प्रवास केवळ ऐतिहासिक सफर नसून, त्याच्या आसपासच्या परिसरात अनेक अद्भुत ठिकाणे आहेत. इथे इतिहास, अध्यात्म आणि निसर्गसौंदर्य यांचा अनोखा संगम पाहायला मिळतो. किल्ल्यापासून अवघ्या पाच किलोमीटरवर लेण्याद्री लेण्या आहेत. या प्राचीन बौद्ध लेण्या उत्कृष्ट शिल्पकलेचे दर्शन घडवतात. याच गुंफांमध्ये असलेले गिरीजात्मज मंदिर अष्टविनायकांपैकी एक असून, गणेशभक्तांसाठी हे पवित्र स्थळ आहे. गुंफांपर्यंतच्या चढाई दरम्यान दिसणारे विस्तीर्ण निसर्गदृश्य मन मोहून टाकते.

शिवनेरीपासून दहा किलोमीटरवर असलेली ओझर आणि गिरीजात्मज गणपती मंदिरे भक्तांसाठी विशेष आकर्षण आहेत. विघ्नहर गणेशाला समर्पित असलेले ओझर मंदिर देखण्या वास्तू कलेसाठी प्रसिद्ध आहे. इथली शांत आणि भक्तिमय वातावरण प्रार्थनेसाठी पोषक आहे. निसर्ग प्रेमींसाठी माळशेज घाट हे रमणीय स्थळ शिवनेरीपासून तीस किलोमीटरवर आहे. धुक्याने वेढलेले डोंगर, वाहणारे धबधबे आणि जैव विविधतेने नटलेला परिसर इथे पाहायला मिळतो. पावसाळ्यात तर हा संपूर्ण प्रदेश हिरव्यागार शालूत नटतो. साहस प्रेमींनी नाणेघाटाला भेट द्यायलाच हवी. हा प्राचीन व्यापारी मार्ग आणि ट्रेकिंगचे प्रसिद्ध ठिकाण पस्तीस किलोमीटरवर आहे. इथल्या कोरीव शिला लेखांमधून शतकांपूर्वीच्या व्यापाऱ्यांच्या आठवणी जपल्या गेल्या आहेत. नाणेघाटातून सह्याद्री पर्वतरांगांचे विस्मयकारक दृश्य दिसते. केवळ सहा किलोमीटरवर जुन्नर लेण्या आहेत. दोन हजार वर्षांपूर्वी कोरलेल्या या बौद्ध लेण्यांमध्ये चैत्यगृह आणि विहारांचा समावेश आहे. कोरीव नक्षीकाम, प्राचीन काळातील भिक्षूंचे वास्तव्य आणि शिल्पकला यामुळे हे ठिकाण विशेष आहे. इतिहास, अध्यात्म आणि निसर्ग यांचा सुंदर मिलाफ असलेल्या शिवनेरी आणि त्याच्या आजूबाजूच्या ठिकाणांना भेट देण्याचा अनुभव अविस्मरणीय ठरतो.

युनेस्कोच्या जागतिक वारसा मानांकन यादीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा समावेश करण्यात आला असून, शिवनेरीलाही त्या सन्माननीय श्रेणीमध्ये स्थान मिळाले आहे. त्यामुळे शिवनेरीला जागतिक स्तरावरही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा म्हणून विशेष ओळख प्राप्त झाली आहे.

खरे तर, शिवनेरी हा केवळ दगड आणि मातीचा किल्ला नाही तर तो आहे धैर्याचा स्रोत, चारित्र्याचा आधार आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक. शिवनेरी किल्ला हा केवळ ऐतिहासिक वारसा नसून महाराष्ट्राच्या अभिमान, शौर्य आणि परंपरेचे प्रतीक आहे. इतिहासप्रेमी, ट्रेकिंगसाठी उत्सुक किंवा संस्कृतीचा अभ्यास करणारे पर्यटक इथे एक अद्वितीय अनुभव घेऊ शकतात. किल्ल्याच्या भव्यतेचा अनुभव घेत असताना, त्या महान युगाचा साक्षीदार होण्याची संधी लाभते, ज्या काळाने भारताच्या भवितव्याला आकार दिला. इथल्या सुळक्यांवर उभे राहून सह्याद्रीच्या विस्तीर्ण रांगांचे सौंदर्य डोळ्यांत साठवता येते. शिवनेरीचा प्रत्येक दगड, प्रत्येक तटबंदी आणि प्रत्येक वाट इतिहासाचे सोनेरी पान उलगडते.


**संजय डी.ओरके**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई**


(गुरु वचन)

## भगवद्गीतेत जीवनाचा प्रवाह : स्वामी देवेंद्रानंदगिरी

भगवद्गीतेत जीवनाचे सत्य दडले असून जीवनात येणाऱ्या अडचणींचे कारण व निवारण दोन्ही गोष्टी सविस्तरपणे सांगण्यात आल्या आहेत म्हणून गीतेचा उपदेश जगभरात प्रसिद्ध आहे व प्रत्येक वर्गास प्रभावित करतो. गीता डॉक्टरप्रमाणे आहे. फरक इतकाच आहे की, डॉक्टर शारीरिक रोगांवर उपचार करतो व गीता मनातील रोग दुर करण्याचा मार्ग दाखवते. ज्याप्रकारे डॉक्टर रोगीचे रोग निवारण करण्यासह त्याचे कारण सांगतो, त्याप्रकारे जर गीतेचा सखोल अध्ययन केले तर मनातील रोगांचे कारण व निवारण दोन्ही समजतात. गीता मनाचे रोग दुर करण्याचे सशक्त माध्यम आहे. गीता ज्ञानामुळे मानवी जीवनातून मोह सहज दुर केला जाऊ शकतो. जीवनात दुःखाचे सर्वात मोठे कारण मोहच आहे. जर जीवनाला यशस्वी बनवायचे असेल व मोहातून मुक्त व्हायचे असेल तर गीतेच्या शरणात जावे लागेल. गीतेतून ज्ञान मिळवून मानव मोक्ष मिळवू शकतो. गीतेने ज्ञान मानवाला प्राप्त झाले तर आम्ही होण्याच्या विषयात बोध करून आपले कर्तव्य कर्म पूर्ण निष्ठेने करण्यास प्रेरित करतो. ईश्वराने मानवी देह फक्त भोगासाठी प्रदान केला नसून याचा उपयोग मोक्ष प्राप्तीसाठी केला पाहिजे. यासाठी आपण भजन, सत्संग, समाजसेवा व लोककल्याणाचे कार्य केले पाहिजे.

साधु व नदी कधीच एका ठिकाणी थांबत नाही व सतत पुढे जात विविध ठिकाणी लोकांच्या हृदयात आपले ज्ञान व भक्तीच्या प्रभावाने त्यांना आनंदित करतो. प्रत्येक मानवास पुर्ण श्रद्धा व निष्ठेने उपकाराशी त्याचा राहिले पाहिजे. आपल्या ज्ञानाने जग प्रकाशित करण्याचा प्रयत्न करत राहिले पाहिजे, वास्तवात हाच मानव धर्म आहे.

## उपदेशकथा

भारतीय संगीत क्षेत्रातील एक थोर संशोधक, संगीतशास्त्रकार व संगीतप्रसारक पं. विष्णु नारायण भातखंडे हे दुर्मिळ रागरागिण्या नि चिजा गोळा करता करता रामपूर रियासतीत पोचले. तेथील नबाब संगीताचे मोठे जाणकार नि गुणीजनांचे पोशिंदे. नबाबांचे एक दरबारी छम्मनसाहब भातखंड्यांचे चाहते. त्यांनी पंडितजींचे 'मिशन' नबाबांना समजावून सांगितले. नबाब राजी झाले पण अट घातली की, दुर्मिळ बंदिशी पाहिजे असतील तर आमच्या उस्तादांचा गंडा बांधला पाहिजे. पंडितजीपुढे संकट उभे राहिले. छम्मनसाहेब म्हणाले, 'अहो, तुम्ही तर वकीलही आहात ना? स्वतःच मामला पेश करा.' मग दरबार भरल्यावर पंडितजींनी कान पकडले नि गंडा बांधण्यास नकार दिला. नबाबांनी कारण विचारले. त्यांनी उत्तर दिले, 'आपले उस्ताद तर काबिलच आहेत; पण मी त्यांचा मुरीद (चेला) झालो तर हुजुरांचा गुरुभाई ठरेन. मेरी क्या मजाल की ऐसा ढीठपन करूँ? गुस्ताखी माफ हो तो हुजुरसे ही गंडा पाने की अर्ज कर सकता हूँ।' यावर नबाबांनी कळी खुलली. त्यांनी मनभर मिठाई आणवली. गंडा बांधला नि पंडितजींना शंभरावर अनवट रागांची नोटेशन्स दिली.

कथा उपदेश : युक्तीप्रयुक्तीने आपले काम साधता आले पाहिजे.

# ओप्पो इंडियाने एफ३१ ५जी मालिका लॉंच केली



**नागपूर, १६ सप्टेंबर :** ओप्पो इंडियाने एफ३१ ५जी मालिका लॉन्च केली आहे, जी तिच्या लोकप्रिय एफ लाइन-अपमधील नवीनतम आहे, जी भारतातील टिकाऊपणा आणि सुरळीत कामगिरीची मागणी पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेली आहे. नवीन मालिका तीन मॉडेल्स ऑफर करते एफ३१ प्रो+, एफ३१ प्रो, आणि एफ३१ जे की मजबूत बिल्ड, दीर्घकाळ टिकणाऱ्या बॅटरी, सुधारित उष्णता व्यवस्थापन आणि प्रगत कनेक्टिव्हिटी सह तयार केले गेले आहे. या सुधारणांसह, एफ३१ ५जी मालिका भारतातील ३५,००० च्या अंतर्गत सर्वात स्मूथ आणि टिकाऊ स्मार्टफोन श्रेणी म्हणून स्थानबद्ध आहे.

अलीकडील काउंटरपॉइंट संशोधन सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की ७९% खरेदीदारांनी टिकाऊपणाला त्यांचा टॉप खरेदी घटक मानला आहे, अर्ध्याहून अधिक लोकांनी त्यांचे फोन वारंवार पाडल्याचे मान्य केले आहे. एफ३१ ५जी मालिका ही अडचण थेट संबोधित करते. या मालिकेत ३६०ओ आर्मर बॉडी आहे ज्यामध्ये मल्टी-लेयर एअरबॅग रचना आहे जी अंतर्गत घटकांना प्रभावापासून दूर ठेवते. एरोस्पेस-ग्रेड एएम०४ अॅल्युमिनियम मिश्र धातुची फ्रेम त्याच्या पूर्ववर्तीपेक्षा १०% मजबूत आहे आणि एजीसी डीटी-स्टार डी+ ग्लास प्रबलित स्क्रीन संरक्षण देते. उपकरणे तिहेरी-प्रमाणित आयपी, आयपी, आणि आयपी६९ आहेत, ज्यामुळे ते धूळ, पाण्यात बुडवण्यास आणि ८०ओ पर्यंत तापमानात उच्च-दाब वॉटर जेट्सला प्रतिरोधक बनवतात.

वास्तविक वापरात, याचा अर्थ असा आहे की पावसाळ्यात पकडलेला डिलिव्हरी रायडर, तेलकट बोटांनी फोन वापरणारा दुकानदार किंवा गर्दीच्या बाजारपेठेतून पिळून निघालेला व्यापारी फोन काम करत राहील अशी अपेक्षा करू शकतो. एफ३१ चहा, कॉफी, दूध आणि डिटर्जंट पाण्यासह १८ दैनंदिन द्रवपदार्थांना देखील प्रतिकार करते, जे भारतीय वातावरणासाठी त्याची रचना प्रतिबिंबित करते.

# कॅनन इंडियाच्या रिटेल उत्सव या राष्ट्रव्यापी रिटेल एंगेजमेंट मोहिमेचा शुभारंभ



**मुंबई, १६ सप्टेंबर :** आपले रिटेल पार्टनर नेटवर्क प्रबळ करण्यासाठी उचललेले एक गतीशील पाऊल म्हणून तसेच आगामी सणासुदीच्या मोसमासाठी मंच सिद्ध करण्यासाठी कॅनन इंडियाने, ४५ हून अधिक शहरांतल्या ४००० हून अधिक रिटेलर्सना सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने आखलेल्या रिटेल उत्सव या अत्यंत प्रभावी, व्यापक स्तरावर राबविता येण्याजोग्या पार्टनर आउटरीच कार्यक्रमाची सुरुवात केली आहे. दिल्ली, मुंबई, बेंगळुरू आणि कोलकाता या चार प्रमुख महानगरांमध्ये सुरू करण्यात आलेला व नागपुर येथे नुकतीच सांगता झालेला हा कार्यक्रम आता भारतातील आणखी शहरांमध्ये विस्तारण्यास सज्ज आहे. उत्साह निर्माण करण्यासाठी, समुदाय-आधारित प्रोत्साहनास खतपाणी देण्यासाठी व उपलब्ध प्रमुख उत्पादने, चालू कार्यक्रम व त्यांचे फायदे यांची माहिती एका उत्सवी व संवादात्मक स्वरूपामध्ये पोहोचविण्याच्या दृष्टीने या उपक्रमाची रचना करण्यात आली आहे.

या उपक्रमाविषयी बोलताना कॅनन इंडियाच्या प्रोडक्ट अँड कम्युनिकेशन सेंटरचे सीनियर डायरेक्टर श्री. सी. सुकुमारन म्हणाले, रिटेल उत्सव म्हणजे कॅननच्या विकासाच्या वाटचालीमध्ये आमच्या रिटेल पार्टनर्सनी दिलेल्या खंबीर योगदानाला दर्शवतो. त्यांना प्रत्यक्ष उपक्रमस्थळी भेटण्याची, त्यांचे विचार ऐकण्याची, त्यांना यशस्वी होण्यासाठीच्या साधनांनी सुसज्ज करण्याची आणि कॅननच्या नवनव्या उत्पादनांना भारतभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यातील त्यांच्या अनमोल भूमिकेचा सोहळा साजरा करण्याची ही एक सुसंधी आहे. आमच्या मेगाटॅन्ट प्रिंटर्सच्या दशकपूर्तीच्या वर्षी आयोजित केला गेलेला रिटेल उत्सव सणासुदींचा उल्हास व अर्थपूर्ण व्यावसायिक संधी यांना एकत्र आणतो व येत्या उत्सवी मोसमामध्ये असलेल्या प्रचंड शक्यतांचा लाभ घेण्यासाठी सज्ज असलेली अधिक भक्कम, अधिक चांगल्या प्रकारे जोडली गेलेली रिटेल परिसंस्था उभारण्याप्रती आमची बांधिलकी पुन:प्रस्थापित करतो.

रिटेल उत्सवच्या माध्यमातून कॅनन केवळ माहितीच पुरवित नाही तर ज्ञानाची देवाणघेवाण, संवादात्मक भेटीगाठी आणि बक्षिसे यांना एकत्र आणत रिटेल पार्टनर्सना प्रेरणाही पुरवितो व सणासुदीच्या काळात मागणीमध्ये उसळी आली असताना परस्परांच्या वाढीसाठी एक भक्कम पाया निर्माण करतो. भारतभरातील ४५ शहरांमध्ये गुवाहाटी, भोपाळ, नागपुर, सुरत, कोचीन, कोइम्बतूर, उदयपूर, चंदिगढ आणि आगरतला अशा काही शहरांचा समावेश करण्यात आला आहे- जेणेकरून स्थानिक पातळीवर अधिक खोलवर संपर्क साधला जावा व पार्टनर्सना व्यापक स्तरावर सहभागी करून घेता यावे.

# मिडास हॉस्पिटलमधील टीमने एंडोस्कोपिक शस्त्रक्रिया करून रुग्णाच्या अन्ननलिकेत अडकलेला रेझर ब्लेड बाहेर काढला

**नागपूर, १६ सप्टेंबर :** मिडास हॉस्पिटलमधील सिनियर गॅस्ट्रोएंटेरोलॉजिस्ट डॉ. सौरभ मुकेवार आणि त्यांच्या टीमने मिळून, एका रुग्णावर गुंतागुंतीची एंडोस्कोपिक शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केली. या शस्त्रक्रियेद्वारे रुग्णाच्या अन्ननलिकेत (इसोफॅगस) अडकलेला रेझर ब्लेड काढण्यात आला. रुग्णाकडून हा रेजर ब्लेड उपचारासाठी येण्याच्या सुमारे दोन आठवडे आधी गिळण्यात आला होता.



४० वर्षांचा पुरुष रुग्ण, ज्याला १५ वर्षांपासून स्किझोफ्रेनिया आहे, जवळजवळ एका आठवड्यापासून अन्न गिळताना त्रास होत असल्याच्या तक्रारीसह मिडास हॉस्पिटलमध्ये दाखल झाला. तपासणीनंतर एंडोस्कोपीमध्ये रुग्णाच्या अन्ननलिकेत (इसोफॅगस) पूर्ण-थराचे छिद्र (फुल-थिकनेस पर्फोरेशन) असल्याचे आढळले.

डॉ. मुकेवार आणि एंडोस्कोपी टीमने ८ मार्चला एक नाजूक शस्त्रक्रिया केली. या शस्त्रक्रियेदरम्यान त्यांनी एंडोस्कोप अन्ननलिकेत टाकून रुग्णाच्या शरीरात दोन आठवड्यांहून अधिक काळ अडकलेला रेजर ब्लेड काळजीपूर्वक बाहेर काढला. ब्लेड पूर्णपणे अन्ननलिकेतून बाहेर काढण्यात आला आणि अन्ननलिकेतील छिद्र मेटल स्टेंट बसवून बंद करण्यात आले.

रुग्णाच्या मानसिक आरोग्याच्या स्थितीचा विचार करता हॉस्पिटलने बहुविविध उपचार पद्धती अवलंबली, ज्यात मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला घेतला गेला. मानसिक आरोग्य तपासणीत रुग्णाला चुकीचे भास, छळ होत असल्याची भावना, आवाज ऐकू येणे (ऑडिटरी हॅलुसिनेशन्स) आणि सायकोटिक डिप्रेशन असल्याचे आढळले. डॉक्टरांच्या मते रुग्णाने रेजर ब्लेड गिळणे हे आत्महत्येच्या हेतूने नसून त्याला येणाऱ्या आवाजाच्या भासामुळे झाले.

डॉ. सौरभ मुकेवार म्हणाले, या केसमध्ये अनेक गुंतागुंतीच्या अडचणी आल्या, ज्यामध्ये रेजर ब्लेडमुळे झालेल्या शारीरिक दुखापतीचे उपचार आणि रुग्णाला योग्य मानसोपचार देणे हे दोन्ही समाविष्ट होते. आमच्या टीमच्या एकत्रित प्रयत्नांमुळे आम्ही रेजर ब्लेड यशस्वीरित्या अन्ननलिकेतून बाहेर काढू शकलो आणि रुग्णाच्या एकूण आरोग्याची काळजी घेऊ शकलो.

रुग्णाने उपचारांना चांगला प्रतिसाद दिला आहे आणि आता तो तोंडावाटे अन्न घेऊ शकतो. त्याला स्थिर प्रकृतीत हॉस्पिटलमधून डिस्चार्ज देण्यात आला असून पुढेही त्याचे योग्य वैद्यकीय उपचार सुरू राहतील.

# क्रेड इंडसइंड बँक रुपे क्रेडिट कार्ड: सर्व प्रकारच्या ई-कॉमर्समध्ये बंधनमुक्त, अमर्यादित रिवॉर्ड्स अनुभव

मुंबई, १६ सप्टेंबर : सर्व प्रकारच्या ई-कॉमर्सवर रिवॉर्ड्स आणि फ्लाइट्स, हॉटेल्स, शेकडो व्यापारी आणि हजारो उत्पादनांवर तत्काळ, लवचिक रिडेम्प्शन यांसह क्रेडने एक नवीन क्रेडिट कार्ड प्रोग्राम सुरू केला आहे. या प्रोग्राममधील पहिले सादरीकरण म्हणजे क्रेड इंडसइंड बँक रुपे क्रेडिट कार्ड. क्रेड सदस्य हे अनेक क्रेडिट कार्ड्स असलेले आणि ज्यांची जीवनशैली मोठ्या प्रमाणात ऑनलाइन शॉपिंगवर अवलंबून आहे असे सुसंस्कृत डिजिटल नेटिव्ह आहेत. या सुसंस्कृततेची किंमत म्हणजे तडजोड: काही विशिष्ट व्यापाऱ्यांपुरते मर्यादित रिवॉर्ड्स; ऑप्टिमायझेशनच्या प्रयत्नात रिडेम्प्शनच्या मार्गांनी मर्यादित खरेदी. यावर उपायसुविधा म्हणून प्रथम क्रेडने आपल्या संस्थेला अनुरूप, सुसंगत समग्र सेवा सुरू केली. यामध्ये ऑनलाइन शॉपिंगवर जास्त रिवॉर्ड्स आणि क्रेड इकोसिस्टममध्ये सोपे विनाअडथळा रिडेम्प्शन मिळते.

बहुतांश क्रेडिट कार्डधारक कुठे शॉपिंग करायचे आणि पॉइंट्स कसे वापरायचे यावर प्रभाव टाकणाऱ्या गुंतागुंतीच्या नियमांनुसार वागतात. पण क्रेड इंडसइंड बँक रुपे क्रेडिट कार्डधारक आपल्या पसंतीच्या ठिकाणी खर्च, कमाई आणि रिडेम्प्शन करू शकतात. कार्डधारकांना सर्व ई-कॉमर्सवर केलेल्या खर्चावर ५% इतके पॉइंट्स आणि ऑफलाइन व्यवहारावर १% पॉइंट्स मिळतात. त्यामध्ये क्रेड स्कॅन अँड पे याचाही समावेश आहे. हे पॉइंट्स ते क्रेड इकोसिस्टममध्ये रिडीम करू शकतात. त्यामध्ये खास कार्डधारकांसाठी बनवलेली नवीन फ्लाइट्स आणि हॉटेल्स उत्पादनेही आहेत.

# हिंदी आणि भारतीय भाषा या एकमेकींशी स्पर्धा करणाऱ्या नसून एकमेकींच्या पूरक आहेत: अमित शाह

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर :** केंद्रीय गृह व सहकार मंत्री तसेच भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते अमित शाह यांनी हिंदी दिवस २०२५ च्या निमित्ताने गुजरातची राजधानी गांधीनगर येथे झालेल्या पाचव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनात मुख्य अतिथी म्हणून बोलताना स्पष्ट संदेश दिला की हिंदी आणि इतर भारतीय भाषांमध्ये कोणतीही स्पर्धा नाही, त्या एकमेकींच्या पूरक आहेत.



इतिहास साक्षी आहे की गुजराती असूनही स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल आणि के. एम. मुंशी यांसारख्या विचारवंतांनी हिंदीचा स्वीकार करून तिच्या प्रसारासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

गेल्या काही वर्षांत हिंदी आणि इतर भारतीय भाषांना अभूतपूर्व पाठिंबा मिळाला आहे. शिक्षणापासून प्रशासनापर्यंत प्रत्येक क्षेत्रात मातृभाषेच्या वापराला प्रोत्साहन दिले जात आहे. जेईई, नीट, यूजीसी यांसारख्या स्पर्धा परीक्षा आता १२ भारतीय भाषांमध्ये घेतल्या जात आहेत.

अमित शाह यांनी स्पष्ट केले की हिंदीला फक्त बोलचाल प्रशासनाची भाषा म्हणून मर्यादित ठेवूनये, तर तिला विज्ञान, तंत्रज्ञान, न्याय, पोलीस व्यवस्था आणि आधुनिक क्षेत्रांची भाषा म्हणून विकसित करणे आवश्यक आहे. सर्व कामकाज जर भारतीय भाषांमध्ये केले गेले तर नागरिकांशी संवाद साधणे सोपे होते आणि प्रशासनही अधिक सुलभ होते.

गृह मंत्री झाल्यानंतर अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली गृह मंत्रालयाने सारथी अनुवाद प्रणाली सुरू केली आहे. यामुळे सामान्य नागरिक आता आपल्या भाषेत संवाद साधू शकतात. देशातील कोणत्याही राज्यातून पत्र जर कोणत्याही भाषेत पाठवले गेले, तर त्याचे उत्तर त्या भाषेतच दिले जाते. याबद्दल सामान्य नागरिकांमध्ये उत्साह आहे. लोक सांगत आहेत की पूर्वी सरकारी कार्यालयात भाषेची अडचण यायची, पण आता ते मातृभाषेत संपर्क साधू शकतात आणि उत्तरही त्याच भाषेत मिळते. यामुळे प्रशासन आणि जनतेमधील विश्वास आणि संपर्क दोन्ही वाढले आहेत.

हिंदी दिवस २०२५ निमित्त हे स्पष्ट झाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली भारतातील भाषा या केवळ संवादाचे साधन नसून आत्मनिर्भर, आत्मविश्वासी आणि विकसित भारताची नवी ओळख बनत आहेत.

# केएफसी इंडियाने संपूर्ण नव्या चटपटा चना बर्गरसह प्रोटीनची पातळी वाढवली

**मुंबई, १६ सप्टेंबर :** केएफसी+ चना? या समीकरणाचा अर्थ लावण्याचा जर तुम्ही प्रयत्न करत असाल, तर तुम्हाला नक्की एक सर्प्राइज मिळणार आहे! हा २०२५ च्या कहानीमधला ट्विस्ट आहे, ज्याचा कुणालाही अंदाज आला नव्हता!




सादर करत आहे, केएफसी चा संपूर्ण नवीन प्रोटीन पॅटी बर्गर चटपटा चना. भारताच्या या पहिल्या चना बर्गरची किंमत अवघी ६९ रु. असून त्यात चना पॅटी आहे व भारतीय हर्ब आणि मसाल्यांनी त्याचे सीझनिंग केले आहे.

चटपटा चना बर्गर मेन्यूमध्ये नवीनता आणण्याबाबत केएफसी ची वचनबद्धता दर्शवतो. मात्र नावीन्य आणताना आपल्या ग्राहकांसाठी ते खूप आकर्षक पर्याय सादर करतात आणि हा ब्रँड ज्याबद्दल ओळखला जातो त्या चवदारपणात कोणतीही तडजोड करण्यात येत नाही. आजचा ग्राहक स्वाद आणि पोषण यांचे संतुलन साधणारे पर्याय शोधत असतो. अशावेळी, चटपटा चना बर्गर हा चविष्ट प्रोटीन पॅटी बर्गर केएफसी इंडियाने बदलत्या आवडी-निवडींना दिलेले उत्तर आहे. केएफसी च्या या नवीन ऑफरिंगबाबत उत्साहाने बोलताना केएफसी इंडिया अँड पार्टनर कंट्रीजच्या सीएमओ अपर्णा भवाल म्हणाल्या, आम्ही जे काही करतो, त्याच्या केंद्रस्थानी उपभोक्ता आहे. आजच्या उपभोक्त्याला सगळे काही हवे आहे- असे खाद्यपदार्थ जे चविष्ट, नजरेला आकर्षक दिसणारे आणि पोषण देणारे असतील! आमचा चटपटा चना बर्गर हे सारे काही देतो. हा भारताचा पहिला चना बर्गर आहे, जो ६९/- रुपयांत उपलब्ध आहे. हा असा पदार्थ आहे, ज्याची अपेक्षा केएफसी कडून कोणीच केली नसेल आणि तेही या किंमतीत! चटपटा चना बर्गरमध्ये प्रोटीन पॅटी असून तो अत्यंत स्वादिष्ट, खमंग आणि चिकन प्रेमींना देखील चटक लावेल असा आहे. आम्ही हे जाणतो की केएफसी चे व्हेज हे कानाला काहीसे अनुचित वाटते, पण बोल्ड चटपटा चना बर्गरचा एक घास घेतलात की तुम्हाला उमगेल की तो आमच्या मेन्यूमध्ये का आहे? आम्हाला खात्री आहे की, आमच्या निष्ठावान केएफसी चाहत्यांना हा बर्गर सुखद आणि चविष्ट सर्प्राइज देईल आणि आमच्यासाठी एक नवीन समुदाय तयार करेल ज्यांनी चविष्ट बर्गर खाण्यासाठी केएफसी मध्ये येण्याचा यापूर्वी कधी विचारही केला नसेल!

संपूर्ण नवीन प्रोटीन पॅटी चटपटा चना बर्गर भारतातील सर्व १३००+ केएफसी रेस्टॉरंटमध्ये डाईन-इन आणि टेकअवे स्वरूपात उपलब्ध आहे. तसेच केएफसी ॲप, वेबसाइट (एचटीटीपीएसः//ऑनलाइन.केएफसी.को.इन/) किंवा आघाडीच्या फूड डिलिव्हरी ॲपवर देखील तो उपलब्ध आहे.

केएफसी चे चाहते डाईन-इन दरम्यान लांबलचक रांग टाळण्यासाठी आणि वेळ वाचवण्यासाठी केएफसी ॲपवरून आधीच ऑर्डर करू शकतात आणि भारताचा पहिला चना बर्गर अवघ्या ६९/- रुपयांत मिळवू शकतात.

# डॉ के जी देशपांडे मेमोरियल सेंटरमध्ये ७८ वर्षीय रुग्णावर प्रगत तावी प्रक्रियेने यशस्वी उपचार



**नागपूर, १६ सप्टेंबर:** नागपूर येथील डॉ. के.जी. देशपांडे मेमोरियल सेंटरमध्ये प्रगत नेक्स्ट-जनरेशन व्हॉल्व्ह वापरून ट्रान्सकॅथेटर ऑर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लांटेशन (तावी) प्रक्रियेद्वारे गंभीर ऑर्टिक स्टेनोसिसने ग्रस्त असलेल्या ७८ वर्षीय रुग्णावर यशस्वी उपचार करण्यात आले. ही भारतातील पहिली आणि सार्क देशांमध्येही पहिली हायब्रिड लॅब आहे. रुग्णाला वारंवार चक्कर येणे आणि श्वास घेण्यात त्रास होणे यासारखी लक्षणे होती. न्यूरोलॉजिकल समस्या नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्याला ऑर्टिक स्टेनोसिस असल्याचे निदान झाले. रुग्णाच्या असामान्य कोरोनरी धमन्यांमुळे ओपन-हार्ट सर्जरी करण्याचा धोका जास्त होता, परंतु तावी प्रक्रिया त्याच्यासाठी एक योग्य आणि सुरक्षित पर्याय ठरली.

प्रक्रिये दरम्यान, डॉक्टरांनी कोरोनरी आर्टरी डिसीज देखील ओळखला आणि त्यावर तात्काळ स्टेंट लावून एकाच वेळी संपूर्ण उपचार केले.

प्रक्रिये दरम्यान डॉक्टरांनी रुग्णामध्ये कोरोनरी आर्टरी डिसीज असल्याचेही निदान केले आणि त्यावर लगेचच स्टेंट बसवून उपचार करण्यात आले. यामुळे एकाच वेळी संपूर्ण उपचार शक्य झाले.

इंस्टॉल केलेल्या प्रगत तावी वाल्वचे फायदे:

७ वर्षांपर्यंत ९९.७% वाल्व खराब होणार नाही

सामान्य टिश्यू वाल्वच्या तुलनेत ४०% जास्त टिकाऊ

वाल्वचे आयुष्य वाढवण्यासाठी अँटी-कॅल्सिफिकेशन उपचार

ही प्रक्रिया डॉ. स्वप्नील देशपांडे आणि त्यांच्या हृदय तज्ज्ञांच्या टीमने डॉ. के.जी. देशपांडे मेमोरियल सेंटरमध्ये यशस्वीरित्या पार पाडली. त्यांनी रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी हायब्रिड लॅब आणि शस्त्रक्रियेची पूर्ण तयारी असणे आवश्यक असल्याचे सांगितले.

तावी उपचार आणि प्रगत वाल्व तंत्रज्ञान ऑर्टिक स्टेनोसिसने त्रस्त रुग्णांच्या उपचारामध्ये क्रांतिकारी बदल घडवत आहेत. हे उपचार पारंपरिक ओपन-हार्ट सर्जरीपेक्षा अधिक सुरक्षित, मिनिमली इनवेसिव्ह आणि दीर्घकाळ टिकणारा पर्याय देतात.

# एअरटेलच्या फसवणूकविरोधी लढ्यामुळे त्यांच्या ग्राहकांचे आर्थिक नुकसान सुमारे ७०% ने कमी झाले आहे


**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर :** आज भारती एअरटेलने जाहीर केले की, त्यांच्या फसवणूकविरोधी उपक्रमांमुळे सायबर गुन्ह्यांच्या तक्रारींमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली आहे आणि यास गृह मंत्रालयाच्या अंतर्गत भारतीय सायबर क्राईम कोऑर्डिनेशन सेंटर (आय४सी) कडून प्राप्त ताज्या माहितीद्वारे आणखी पुष्टी मिळाली आहे.

एमएचए-आय४सी नुसार, एअरटेल नेटवर्कवरील आर्थिक नुकसानीच्या मूल्यात तब्बल ६८.७% घट झाली आहे आणि एकूण सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये १४.३% घट झाली आहे. त्यामुळे सायबर गुन्हे रोखण्यासाठी आणि ग्राहकांसाठी सुरक्षित नेटवर्क निर्माण करण्यासाठी एअरटेलच्या फसवणूक आणि स्पॅम शोध उपाययोजनेची प्रभावकारिता सिद्ध झाली आहे. एमएचए-आय४सी ने केलेल्या विश्लेषणात, सप्टेंबर २०२४ (जेव्हा एअरटेलची फसवणूक आणि स्पॅम शोध उपाययोजना सुरू झाली नव्हती) आणि जून २०२५ मधील महत्त्वाचे सायबर गुन्हे दर्शक तुलनात्मक स्वरूपात मांडले आहेत.

या उपक्रमाबद्दल भाष्य करताना भारती एअरटेलचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गोपाल विठ्ठल म्हणाले, आमच्या ग्राहकांसाठी स्पॅम आणि आर्थिक फसवणुकींचे उच्चाटन करणे हे आमचे ध्येय आहे. मागील एका वर्षात, आमच्या एआय-सक्षम नेटवर्क उपाययोजनांनी ४८.३ अब्जांहून अधिक स्पॅम कॉल्स ओळखले आहेत आणि ३.२ लाख फसव्या लिंक ब्लॉक केल्याआहेत. तथापि, आम्ही याकडे एका मोठ्या लढ्यातील छोटा टप्पा म्हणून पाहतो. आमचे नेटवर्क्स डिजिटल स्पॅम आणि स्कॅमपासून पूर्णपणे मुक्त होईपर्यंत आम्ही या क्षेत्रात सातत्याने नवनवीन प्रयोग करत राहू आणि मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करू.

भारतीय सायबर क्राईम कोऑर्डिनेशन सेंटर (आय४सी) - गृह मंत्रालय यांनी सामायिक केलेला परिणाम आम्हाला प्रचंड प्रेरणा देतो आणि या मोहिमेत आमच्या प्रयत्नांना मान्यता देतो. स्पॅम आणि फसवणूकीला आळा घालण्यासाठी केलेल्या उपक्रमांबद्दल मी एमएचए-आय४सी आणि DoT यांचे कौतुक करतो आणि सायबर गुन्हे व फसवणुकीच्या धोक्यांचे उच्चाटन करण्यासाठी आम्ही अधिकाऱ्यांशी सखोल सहकार्य करण्यास उत्सुक आहोत., असे विठ्ठल यांनी पुढे सांगितले.

# शब्दकोडे क्रमांक २२१९



**आडवे शब्द :-**

१) डोळे झाकून भिडू शोधण्याचा मुलांचा एक खेळ
६) स्वत:च्या मर्जीने
१०) संताप
११) दौत
१२) उपस्थित
१३) धोका
१५) हात पुसण्याचे छोटे वस्त्र
१७) दहावी तिथी
१९) परीक्षा घेणारा, तपासनीस
२१) नाजूक
२३) अधिक श्रेष्ठ
२५) सर्व, एकूणएक
२६) निर्णायकी स्थिती
२९) फणसाचा एक प्रकार
३१) सोने
३२) अडचणीत कसातरी चालविलेला संसार
३६) सध्या
३८) संगीतातील ठेका
३९) प्रफुल्लित
४०) जननी
४२) तारण
४३) महामार्ग
४५) अलमारी
४७) गतिमान
४९) ओळ
५०) खाण्यासाठी भाजलेले मांसाचे गोळे
५२) अरण्य
५३) नंतर
५४) आजच्या आधीचा दिवस
५५) धमकी
५७) दाट मैत्री
५८) अंगरखा
५९) उत्सवाचे दिवस
६१) नकला करणारा
६३) वजन
६४) गोव्याची राजधानी
६६) जमीनदार
६८) सिद्ध
६९) रंग
७०) वैरभाव, शत्रुत्व
७१) चांदी

**उभे शब्द: -**

२) देवांचा वैद्य
३) न वापरलेला
४) घोड्याचे बछडे
५) भविष्यकथनाचा एक प्रकार
६) पायापासून डोक्यापर्यंत
७) टपाल
८) रोज, सदोदित
९) तफावत
१३) एखादे जुने दु:ख उकरून काढणे
१४) दानव
१६) फक्त, केवळ
१८) अंगावर येणारा काटा
२०) हात
२१) फार गरम वा थंड नसलेले (पाणी)
२२) आकडा, मांडी
२४) कमळ
२५) चंदनाचे खोड उगाळण्याचे साधन
२६) अवास्तव
२७) उग्र, अत्यंत तिखट
२८) काही काळापुरता, हंगामी
३०) साखरेचा रस
३३) वल्लरी
३४) फुलदाणी
३५) एक गुजराती नृत्यप्रकार
३६) कहाणीतील गाव
३७) संध्याकाळ
३९) कडक
४०) संगीतातील एक राग
४१) युद्ध क्षेत्र
४४) अंगातील मस्ती
४६) पारद
४८) नृत्यकलेचे दैवत
५०) मनाचा ओढा
५१) वाईट कृत्य
५३) चर्चा
५४) निमित्त, सबब
५६) स्वत:ला
५८) मंत्रीमंडळ
६०) उपयोग
६२) छोटी मशाल
६३) स्तुती करणारा
६५) प्राण
६६) शपथ
६७) मातीचा कण

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**




# कार्यालय नगरपंचायत एटापल्ली जिल्हा गडचिरोली

**निविदा २०२५-२०२६/१ (पहिली वेळ)**

मुख्याधिकारी नगरपंचायत एटापल्ली, जिल्हा गडचिरोली यांचे वतीने कामाच्या बि-१ दोन लिफाफा ई-निवीदा पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन निविदा मागविण्यात येत आहे. वरील कामाची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहे. निविदेचा विस्तृत नमुना व कामाचा तपशील तसेच सविस्तर अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या बेवसाईटवर दिनांक १६/०९/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

मुख्याधिकारी
नगरपंचायत एटापल्ली


## राशीभविष्य

**मेष :** राजकारणात गुंतलेल्या लोकांना उच्च पद मिळू शकते. धनलाभ होण्याची शक्यता आहे. आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदाचा असेल. तुम्हाला जास्त मेहनत करावी लागणार नाही. परिस्थिती अनुकूल असेल.

**वृषभ :** आज तुमची काही पूर्वीची प्रलंबित कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. उत्पन्नाचे स्रोत वाढतील. शिक्षण आणि कृषी क्षेत्रात फायदेशीर संधी मिळतील.

**मिथुन :** आज तुमचे धैर्य आणि शौर्य वाढेल. तुम्ही काही धोकादायक काम करण्यात यशस्वी व्हाल. सैन्याशी संबंधित लोकांना महत्त्वाचे यश मिळेल. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील.

**कर्क :** तुमच्या विचारांना सकारात्मक दिशा द्या. कोणाच्याही प्रभावात येऊ नका. तुमच्या शत्रूंपासून सावध रहा. ते तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करू शकतात.

**सिंह :** आज कामाच्या ठिकाणी अडथळे कमी होतील. उत्पन्नाचे स्रोत वाढतील. व्यवसायीकांचा नवीन व्यवसायात रस वाढेल. सामाजिक क्षेत्रात काम करणाजया लोकांना समन्वय निर्माण करावा लागेल.

**कन्या :** आज नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायात तुम्हाला नवीन भागीदार मिळतील. तुमच्या व्यवसायाची परिस्थिती सुधारेल. तुम्ही नवीन व्यवसायात व्यस्त राहाल.

**तुळ :** राजकारणात तुम्हाला महत्त्वाचे पद किंवा जबाबदारी मिळू शकते. तुमच्या मुलांप्रती असलेली तुमची जबाबदारी पार पाडली जाईल. निरुपयोगी गोष्टी टाळा. काम आणि व्यवसायातील ताणतणाव संपतील.

**वृश्चिक :** सरकारी मदतीने कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. सुरक्षा क्षेत्रात कार्यरत लोकांना विशेष यश मिळेल. राजकारणात तुमचे स्थान आणि प्रतिष्ठा वाढेल.

**धनु :** आज जमिनीशी संबंधित कामात गुंतलेल्या लोकांना कठोर परिश्रमानंतर यश मिळेल. नोकरीत स्थान बदलण्याची शक्यता आहे. किंवा तुम्हाला स्थान बदलाशी संबंधित चांगली बातमी मिळेल.

**मकर :** आज तुम्हाला जवळचा मित्र भेटेल. कामाच्या ठिकाणी नोकरदारांचा आनंद वाढेल. कुटुंब आणि मित्रांच्या मदतीने व्यवसायातील अडथळे दूर होतील. वडिलोपार्जित संपत्ती मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.

**कुंभ :** नोकरदार लोकांना त्यांच्या गोड स्वभावामुळे आणि गोड बोलण्यामुळे त्यांच्या कनिष्ठांकडून कौतुक मिळेल. आज तुमच्या मनात सकारात्मक विचार जास्त असतील. कामावर लक्ष केंद्रित करा.

**मीन :** परराष्ट्र सेवेशी संबंधित लोकांना महत्त्वाचे यश मिळेल. सरकार आणि सत्तेशी संबंधित बाबींमध्ये तुम्हाला यश मिळेल. वाहन खरेदी करण्याची इच्छा पूर्ण होईल. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील.

# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. १६ :

वेलतूर पोलीस स्टेशन हद्दीत मौजा अडेगाव जवळ बोलेरो पिकअप गाडीत अवैध गोवंश वाहतूक पकडण्यात वेलतूर पोलिसांना यश आले. त्यात ०९ जनावरांची सुटका करण्यात आली व आरोपी विरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. काल दि.१४ (रवी) ला बोलेरो पिकअपने अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने पेट्रोलींग केली.



पोलीसांनी सतर्क पेट्रोलींग केली असता वेलतूर ते आंभोरा रोड वर मौजा अडेगाव जवळ एक पांढऱ्या रंगाचे बोलेरो पिकअप वाहन येताना दिसले. त्या वाहनावर संशय आल्याने पोलीसांनी वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला. पकडण्याच्या भीतीपोटी वाहन चालकाने वाहन न थांबविता वेलतूर च्या दिशेने पळ काढला. पोलीसांनी वाहनाचा पाठलाग केला. चालकाने पिपरी मुंजे गावात रोडवर वाहन सोडून पळून गेला.

पोलीसांनी बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम.एच. ४० डी.सी ०१३९ या वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली, असता त्यामध्ये लहान मोठे एकुण ०९ गोवंश जनावरे मिळून आले. नमुद गोवंश ज्नावरांना कोणतीही चाराापाण्याची सोय न करता, अंत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम.एच. ४० डी.सी ०१३९ किंमती ५,००,०००/- रुपए. व ०९ गोवंश जनावरे किंमती १,१०,००० /- रुपए असा एकुण किंमती ६,१०,०००/- रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. सुटका केलेल्या गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन गौशाळे येथे दाखल करण्यात आले आहे.

बोलेरो पिकअप वाहन कंमांक एम. एच. ४० डी सी ०५३९ चालक आणि मालक यांच्या विरूद्ध प्राणी छळ अधिनियम सहकलम आणि महा. पशु संरक्षण अधिनियम सहकलम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर कारवाई वेलतूर पोलीस निरीक्षक प्रशांत मिसाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# तरोडीहून कोराडीमार्गे अयोध्येला यात्रा

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १६ :

अयोध्येतील भव्य श्रीराम मंदिरातील मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर देशभरातून भाविक रामलल्यांच्या दर्शनासाठी जात आहेत. त्याच परंपरेत तरोडी (बु.) ग्रामपंचायतीतर्फे आस्था आणि भक्तिभावाने युक्त अशी विशेष यात्रा काढण्यात आली. यात्रेची सुरुवात तरोडीतून झाली. प्रथम कोराडी येथील प्रसिद्ध देवी मंदिरात दर्शन घेऊन पूजा-अर्चा करण्यात आली. या यात्रेला रामरथ यात्रा असे नाव देण्यात आले असून मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले. सर्वांनी माता दुर्गेचे आशीर्वाद घेतल्यानंतर बसद्वारे



अयोध्येकडे प्रवासाला सुरुवात झाली.

आयोजकांच्या मते ही केवळ तीर्थयात्रा नसून नागपूर-अयोध्या यांच्यातील एक सांस्कृतिक व आध्यात्मिक सेतू आहे. यात्रेकरू जय श्रीरामच्या घोषणांनी आणि भक्तिगीतांनी मार्ग भारून टाकत पुढे सरकत आहेत. ही यात्रा रस्तेमार्गे अयोध्येला पोहोचून रामलल्यांचे दर्शन घेणार असून विविध धार्मिक स्थळांचेही दर्शन यात्रेकरू घेतील. ही यात्रा नागपूरकरांच्या अयोध्याप्रती आणि भगवान रामांप्रती असलेल्या भक्तीची साक्ष देणारी ठरत आहे.

यात्रेच्या प्रारंभी ग्रा. पं. सरपंच आरती चिकटे, उपसरपंच रुपेश डेरे, सचिव उमेश धावडे यांच्यासह सदस्य धर्मेंद्र कडू, सुनील चिकटे, शीला चिकटे, प्रतिभा महल्ले, सारिका सनकाडे, ममता बोपचे आदी उपस्थित होते. तरोडी ग्रामपंचायतीला सन्मानामुळे उत्साह दुणावला

तरोडी (बु.) ग्रामपंचायतीला आर. आर. (आबा) पाटील सुंदरगाव पुरस्कार मिळाल्याने गावात आनंदाचे वातावरण आहे. सरपंच आरती चिकटे आणि सचिव उमेश धावडे यांनी गावाची सौंदर्यवृद्धी आणि सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवून यश मिळवले. गावात घराघरात शौचालयांची निर्मिती, सार्वजनिक स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, आरोग्यइशिक्षण सुविधा, बचत गटांची प्रगती, प्लास्टिकबंदी, पथदीप, मागासवर्गीय व बालकल्याण योजना, सौरऊर्जा, वृक्षारोपण, कम्प्युटरीकृत कामकाज, आधारकार्डसह अनेक सोयी उपलब्ध करून दिल्या. या कायाची दखल घेत शासकीय व राजकीय स्तरावरून तरोडी (बु.) ग्रामपंचायतीला सुंदरगाव अभियान २०२४ अंतर्गत तहसीलस्तरीय दहा लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर करण्यात आला. महिला सरपंच आरती चिकटे यांचे कार्य आणि सचिव उमेश धावडे यांचे प्रयत्न उल्लेखनीय ठरल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# हिंदी दिवस उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. १६ :





मेरा भारत मेरा युवा भारत नागपूर हिंदी दिवस दिनांक १४ सप्टेंबर २०२५ ला गजानन समाज मंदिर मैदान या ठिकाणी आयोजित करण्यात आला या कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून वैभव, मनीषा जगताप, प्रशांत जगताप, हरी मोहन सर व संस्थेचे अध्यक्ष होते त्यांच्या उपस्थितीमध्ये वरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमांमध्ये कार्यक्रमात सुरुवातीला दीप प्रज्वलनाने कार्यक्रम करण्यात आले व दीप प्रजनन झाल्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले व कार्यक्रमात कार्यक्रमाची प्रस्तावना आणि प्रफुल साखरे यांनी मांडली त्यांनी आपल्या संस्थेबद्दल येत्या दहा वर्षात त्यांनी कोणकोणते कार्य केले.

त्याबद्दल माहिती दिली आणि त्यांच्या संस्थेच्या अंतर्गत किती लोकांना प्रशिक्षण देण्यात आले त्याबद्दल माहिती देण्यात आली व आपली संस्था कशी उंचावता येईल व संस्थेचे कार्य कसे वाढवता येईल व समाजातील लोकांचे भले करण्याकरिता ते काय काय कार्य करतात त्यांच्याबद्दल माहिती देण्यात आली आणि त्यांनी मेरा युवा भारत याबद्दल देखील खुप उत्कृष्ट माहिती दिली त्याचप्रमाणे कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले वैभव हिंदी दिवस आणि आपल्या देशात हिंदी राष्ट्रभाषा असल्यामुळे हिंदी हा प्रथम भाषा आहे व या भाषेला सर्वात जास्त महत्त्व देण्यात आलेला आहे.

हिंदी पकवाडाला दिवस हिंदी चे महत्व काय व हिंदी ही राष्ट्रभाषा आहे कार्यक्रमात मुख्यतः विद्यार्थी होते व कार्यक्रमाच्या नसतात देऊन कार्यक्रम चे समर्थन करण्यात आले व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करण्याकरिता माननीय वैशाली कांबळे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले व कार्यक्रम संपन्न झाला.

# बालकुमार संवाद साहित्य संमेलनात उमियाशंकर नारायणजी हायस्कूलचे यश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

साहित्य विहार संस्था द्वारे आयोजित बालकुमार संवाद साहित्य संमेलनामध्ये श्री उमियाशंकर नारायणजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी लोकसाहित्य पोवाडा स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.



दि.१३ व १४ सप्टेंबर २०२५ ला सी.पी.अँन्ड बेरार रवी नगर येथे बालकुमार संवाद साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये तीस शाळांनी सहभाग नोंदविला. यामध्ये श्री उमियाशंकर नारायणजी हायस्कूल लकडगंज नागपूर येथील दहावीचे विद्यार्थी नियोग चिंचवडे, श्रवणक मानमोडे, तनिष जैन,सार्थक वानरे, संयम जैन, सार्थक मडकर, उत्कर्ष जैन, अनुष्का उमरेडकर यांनी लोकसाहित्य 'पोवाडा'स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यांना कालिदास संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉक्टर पंकज चांदे, महिला प्रबोधन मंडळाच्या अध्यक्षा विजया पाध्ये तसेच साहित्य विहार संस्थेच्या अध्यक्षा आशा पांडे यांच्या हस्ते मानचिन्ह, सुवर्णपदक व रोख पारितोषिक देण्यात आले. तसेच दहावीचे गुणवंत विद्यार्थी अथर्व खरवडे व साहिल खोत यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

# महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागामध्ये स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान ही मोहीम सक्रियपणे राबविली जात आहे. ही मोहीम आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाची एक उपक्रम आहे ज्याचा उद्देश महिलांना सवलीकरण करणे तसेच जनजागृती, शिक्षण आणि सामाजिक सहभागाच्या माध्यमातून कौटुंबिक मूल्यांना बळकटी देणे हा आहे.

या अनुषंगाने नागपूर विभागाच्या वैद्यकीय विभागामार्फत महिला कर्मचारी व महिला रेल्वे लाभार्थी यांच्यासाठी बहुउद्देशीय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन दिनांक 17 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 10:00 वाजता ते दुपारी 01:30 वाजेपर्यंत विभागीय रेल्वे रुग्णालय, नागपूर येथील डॉरमिटरीत करण्यात येणार आहे. या शिबिरात ईएनटी, नेत्र, दंत, स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र तज्ज्ञांमार्फत तपासणीसह सामान्य आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध राहील. विशेष लक्ष कॅन्सर तपासणी, रक्तदाब, रक्तशर्करा, लसीकरण, गर्भधारणापूर्व तपासणी व क्षयरोग तपासणीवर दिले जाईल. नागपूर विभाग सर्वांना या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करतो. कर्मचारी व लाभार्थी यांचा सक्रीय सहभाग या मोहिमेला यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, ज्यामुळे अधिक आरोग्य-जागरूक आणि सबली समाज निर्माण होईल.

# न्यायालयाच्या धर्तीवर महसूल लोक अदालत मौद्यात

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. १६ :

महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा मानला जातो. ग्रामीण भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांना विविध सरकारी सेवा पुरविणे, जमिनीचे अभिलेख अद्ययावत ठेवणे, सातबारा उतारा सुलभपणे उपलब्ध करून देणे आणि नागरिकांचे प्रलंबित प्रश्न जलदगतीने निकाली काढणे, ही महसूल विभागाची पहिली जबाबदारी आहे.

यामुळेच शेतकरी व नागरिकांना तातडीने न्याय मिळावा आणि प्रलंबित प्रकरणांचा कमी वेळेत निपटारा व्हावा, यासाठी मौदा येथील महसूल विभागाकडून सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. विभागाने आता न्यायालयाच्या धर्तीवर महसूल लोक अदालतीचा उपक्रम हाती घेतला असून विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ चे कलम १९ मधील तरतुदींनुसार महसूल विभागातील प्रलंबित महसुली दावे तडजोडीने निकाली काढणेसाठी महसूल पंधरवाडा कार्यक्रमा अंतर्गत "महसूल लोक अदालत" दिनांक ०१/१०/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता, तहसील कार्यालय, मौदा येथे आयोजित करण्यात आले आहे.

महसूल विभाग हा जनतेच्या दैनंदिन समस्या आणि जिव्हाळ्याच्या विषयांशी अत्यंत जवळून संबंध असलेला विभाग आहे. सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी व महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख होण्यासाठी हा महसूल सेवा पंधरवडा राज्य शासनाच्या आदेशानुसार साजरा करण्यात येत आहे. याचा नागरिकांनी अधिकाधिक लाभ घ्यावा.



दत्तात्रय निंबाळकर
तहसीलदार मौदा

## धनश्री नागरी सह. पत संस्थेची सभा संपन्न

नागपूर : धनश्री महिला नागरी सहकारी पतसंस्थाची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्री सिलेब्रेशन हॉल म्हाळगी नगर येथे संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी अध्यक्षा सविता बडवाईक होत्या. प्रास्ताविक कार्यकारी संचालक जीवन बडवाईक यांनी केले.संस्थेचा वार्षिक अहवाल अध्यक्षा यांनी सभासदांना वाचून दाखवला. संस्थेला सन 2024-25 या वर्षात 178563 नफा झाला तर संस्थेकडे. 2680600.भांडवल आहे. संस्थेचे गुंतवणूक 12310042 आहे. संस्थेचे 1354 सभासद आहेत.

## भिडे हायस्कूलने घेतला कॅन्सर मुक्तीचा वसा

नागपूरः विद्यार्थ्यांच्या आरोग्या विषयीच्या जागरूकतेचा भाग म्हणून, भिडे हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेजने कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबवून समाजासाठी एक आदर्श ठेवला आहे. ९ ते २० वयोगटातील विद्यार्थिनींना कॅन्सर प्रतिबंधक लस देऊन शाळेने कॅन्सरमुक्त समाजाच्या दिशेने एक महत्त्वाचं पाऊल उचललं आहे. या उपक्रमासाठी कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. सिद्धार्थ सावजी आणि स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. पारुल सावजी या समाजाभिमुख दांपत्याने पुढाकार घेतला. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन डॉ. पारुल सावजी गेल्या अनेक वर्षांपासून कॅन्सर प्रतिबंधक डॉ. सावजी दांपत्य आर्थिक दुर्बल घटकांतील महिलांना मोफत लस देण्यासोबतच इतर वैद्यकीय उपचारही सवलतीच्या दरात उपलब्ध करून देतात. त्यांच्या या प्रयत्नांमुळे त्यांनी कॅन्सरमुक्तीचा आणि सामाजिक बांधिलकीचा वसाच घेतला आहे.

## आदिवासींच्या विविध समस्येबाबत बसपाने निवेदन दिले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व आदिवासी विकास मंत्री यांच्या नावाने नागपुर विभागातील आदिवासी विकास विभागाच्या अप्पर आयुक्त आयुषी सिंह मॅडम यांना आज बहुजन समाज पार्टीच्या वतीने एक निवेदन देण्यात आले. निवेदनात सुराबर्डी येथील गोंडवांना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय व प्रशिक्षण केंद्र विना विलंब बांधणे, नागपूरचे संस्थापक गोंडराजे बक्त बुलंदशहा ऊईके यांच्या समाधी स्थळाचा विनाविलंब विकास करणे, नागपूर विभागातील 76 आदिवासी आश्रम शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व पाठ्यपुस्तके लगेच उपलब्ध करून देणे, इंग्रजी माध्यमातील नामांकित शाळेत पात्र असलेल्या 228 आदिवासी बालकांना प्रथम वर्गात विनाविलंब सामावून घेणे, चिमूर तालुक्याच्या जांभुळघाट येथील आदिवासी आश्रम शाळेतील विषबाधा प्रकरणातील आरोपींवर कार्यवाही करणे, नागपुरातील 13 आदिवासी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांची डीबीटी अंतर्गत वाढलेली शिष्यवृत्तीची रक्कम विनाविलंब त्यांच्या खात्यात जमा करणे, आदि मागण्या करण्यात आल्या. शिष्टमंडळात बसपाचे आदिवासी नेते इंजि दादाराव उईके, प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, प्रदेश महासचिव पृथ्वीराज शेंडे, नागोराव जयकर, जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे, जिल्हा प्रभारी राजकुमार बोरकर, विद्यार्थि नेते प्रा नितेश कांबळे, रोहित इलपाची, उमेश मेश्राम, अंकित थूल, सुरेंद्र डोंगरे, राजेश नंदेश्वर, जनार्धन मेंढे, अविनाश गेडाम आदि प्रामुख्याने उपस्थित होते.

आदिवासी समाजाच्या अनेक वर्षाच्या मागणीनंतर 14 ऑक्टोंबर 2024 रोजी आदिवासी समाजासाठी सांस्कृतिक संग्रहालय व प्रशिक्षण केंद्र बांधण्या संदर्भात निर्णय घेण्यात आला त्यासाठी 132 कोटी निधीची मंजुरी मिळाली भक्त बुलंद शहा यांच्या समाधी स्थळाच्या सौंदर्यकरणासंदर्भात अनेकदा घोषणा झाल्या एनएमसी व एनआयटीने अमाऊंटही जाहीर केला परंतु कार्यवाही मात्र शून्य हा प्रश्न मुख्यमंत्र्यांशी संबंधित असल्याचे सांगितले गेले

नागपूर विभागातील 76 आश्रम शाळेतील एकाही विद्यार्थ्याला गणवेश मिळाले नसल्याचे त्यांनी मान्य करून त्याला तांत्रिक कारण जबाबदार असल्याचे सांगितले. उर्वरित विद्यार्थ्यांच्या पुस्तकाबाबत अहवाल मागून ती समस्या सोडवण्याचे वचन दिले.

नामांकित शाळेतील पहिल्या वर्गातील प्रवेशा संदर्भात पालकांच्या आग्रहास्तव पुनर्विचार सुरू असल्याचे सांगितले, जांभूळघाट येथील विषबाधा प्रकरणी लगेच कारवाई होईल असे आश्वासन दिले.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **ASHHAR MADNI**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ASHHAR MADANI SHAIKH ASLAM.**
**ADD :** BADA TAJBAGH, NAGPUR

MY OLD NAME WAS **RAHIL FATEMA**. NOW MY NEW NAME IS **RIZWANA KAUSAR.**
**ADD :** BADA TAJBAGH, NAGPUR

MY OLD NAME WAS **MOHD AHSANULLAH MOHD HAFIZULLA**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD AHSANULLAH MOHAMMAD HAFIZULLA DESHMUKH.**
**ADD :** PUSEGAON HINGOLI - 431513.

MY OLD NAME WAS **NAZMA SEIKH**. NOW MY NEW NAME IS **NAZMA SHEIKH.**
**ADD :** F.NO. 702, C-TOWER, PYRAMID CITY 06, BESA PIPLA ROAD, NAGPUR - 440037.

MY OLD NAME WAS **RIYAZ NASIR SHEIKH**. NOW MY NEW NAME IS **RIYAJ NASIR SHEIKH.**
**ADD :** PLOT NO.43 RAMNATH CITY ROAD BAJRANG NAGAR BOKHARA NAGPUR 441111.

MY OLD NAME WAS **KARAN SINGH SURESH KUMAR PANGHAL**. NOW MY NEW NAME IS **KARAN SURESH KUMAR PANGHAL.**
**ADD :** PLOT NO 84 KALAMNA ROAD NEAR WATER TANK OM NAGAR RANALA KAMPTEE NAGPUR 441002.

MY OLD NAME WAS **GHULAM MOHAMMAD KHAN**. NOW MY NEW NAME IS **GULAM MOHAMMAD KHAN GULAM HUSSAIN KHAN.**
**ADD :** OPP. MAHAVIR COLLECTION,JAGANNATH WARD, HINGANGHAT, WARDHA - 442301.

MY OLD NAME WAS **KEHKASHA ANJUM**. NOW MY NEW NAME IS **KAHKASHA ANJUM.**
**ADD :** PLOT NO 46, JAFAR NAGAR, KATOL ROAD,NAGPUR-440013.


## सेंट जॉन स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

श्रीकृष्ण सांस्कृतिक फाउंडेशन, नागपूर यांच्या वतीने आयोजित ऑल इंडिया डान्स, म्युझिक आणि इंस्ट्रुमेंटल स्पर्धा मध्ये सेंट जॉन्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन करत आपल्या शाळेचे नाव उज्वल केले. फोक डान्स (सोलो) प्रकारात पूर्वी सुमित नागदावने हिने उत्कृष्ट सादरीकरण करत द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळवला. फोक डान्स (डुएट) प्रकारात प्राप्ती खापर्डे व माही बोरकर या जोडीने दमदार परफॉर्मन्स करत द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार पटकावला.या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी प्राचार्य फादर विश्वास, उपप्राचार्य फादर बास्को, व्यवस्थापक फादर थॉमस, पर्यवेक्षक तुलनकर, चारमिस लाझरस तसेच सर्व शिक्षकवृंद आणि पालक यांना दिले.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेत आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन केले.

# सेंटर पॉइंट स्कूल, वर्धमान नगर येथे हिंदी दिवस उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

सेंटर पॉइंट स्कूल, वर्धमान नगर येथे हिंदी दिवस मोठ्या उत्साहात व सांस्कृतिक वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी हिंदी भाषेच्या समृद्ध परंपरेला उजाळा देत तिच्या महत्त्वावर प्रकाश टाकला.





शाळेच्या प्राचार्या कांचन उके यांनी आपल्या भाषणात सांगितले की, हिंदी ही केवळ एक भाषा नसून, ती आपली संस्कृती, आपली ओळख आणि आपल्या भावना व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. ही भाषा संपूर्ण देशाला जोडणारे एक सशक्त साधन आहे.उपविभाग प्रमुख प्रतीभा जांभूळकर यांनी हिंदी दिनाचा इतिहास सांगताना नमूद केले की, १४ सप्टेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान सभेने हिंदीला भारताची राजभाषा म्हणून मान्यता दिली. त्या दिवसाच्या स्मरणार्थ दरवर्षी १४ सप्टेंबर रोजी हिंदी दिवस साजरा केला जातो. कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे भाषिक घटकांनी सजवलेले "शब्दांचे झाड", ज्यावर स्वर, व्यंजन, नाम, सर्वनाम, क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी आणि केवलप्रयोगी शब्द लावले होते.या प्रसंगी उपप्राचार्या दीपा चक्रवर्ती, जयती चक्रवर्ती, सुनीता पाटील, रूबी माथूर, मंजुषा गजभीये, लता पुरोहित, वंदना अलमडोहकर, अर्चना ढोक, ज्योती नाईक, रंजना ढोले, अकिल युसूफ आणि प्रमोद जांभूळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.


**जाहिरनामा / सायटेशन नोटीस**

**कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क- स्तर कामठी यांचे न्यायालय, कामठी, जि. नागपूर**

एम.जे.सी. क्र. ७३/२०२५
पे.ता. २०-०९-२०२५ प्रोसेस क्र. ११४०/२०२५

Applicant : 1) Devkala wd/o Wasudev Meshram, Aged 45 Years, Occu. Houshold, 2) Swapnil S/o. Wasudeo Meshram, Aged 26 Years, Occu. Labour, 3) Luck S/o. Wasudeo Meshram, Aged 19 years, Occu. Student. 4) Sakshi W/o Wasudeo Meshram, Aged about 25 years, Occu. Student, All R/o Gondegaon (Kanhan) Tah. Parseoni, dist. Nagpur.
V/s
Non Applicant: NIL

मयत Late Smt. Kautukabai @ Kautuka w/o Manikrao Meshram, मयत दि. १७/०९/२००४. Late Shri Manik s/o Sadashiv Meshram, मयत दि. ११/०५/१९९१ आणि Late Shri Wasudeo s/o Manik Meshram मयत दि. ०३/१२/२०११ R/o Gondegaon (Kanhan) Tah. Parseoni, Dist. Nagpur.

सदरहु अर्जदारांने वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Smt. Kautukabai @ Kautuka w/o Manikrao Meshram, मयत दि. १७/०९/२००४, Late Shri Manik s/o Sadashiv Meshram, मयत दि. ११/०५/१९९१ आणि Late Shri Wasudeo s/o Manik Meshram, मयत दि. २३/१२/२०११ यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारी कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर कामठी यांनी दि. २९/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार कळवाव्या आणि ह्या लेखवरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य त कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारास Late Shri Wasudeo s/o Manik Meshram मयत दि. ०३/१२/२०११ यांचे वारसान प्रमाणपत्र मजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
आज दि. २६/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशानुसार
सहायक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय कामठी

**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७४
[illegible] दिनांक : [illegible]/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. म . उ . प . सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा . जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. रामबहादुर ब्रिजमोहन यादव, रा. समाधान नगर, एचडीएफसी बँकच्या मागे, पोलीस लाईन टाकळी, नागपूर यांचा अर्ज दिनांक ०४/०८/२०२५

-: जाहिरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार रामबहादुर ब्रिजमोहन यादव, रा. समाधान नगर, एचडीएफसी बँकच्या मागे, पोलीस लाईन टाकळी, नागपूर यांनी त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू रमणी रामबहादुर यादव यांचा जन्म दिनांक २६/०२/२००८ रोजी त्यांच्या राहते घरी पोलीस लाईन टाकळी, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

**जाहिरनामा नोटीस**

**कोर्ट विद्यमान श्री. आर.पी. घाईल, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, नरखेड, जि. नागपूर यांचे न्यायालयात**

एम.जे.सी. क्र. १२१/२०२५ पे.ता. २१-११-२०२५

अर्जदार : १) सुरेंद्र संतोषराव लक्षनकर वय ४७ वर्षे, धंदा – व्यापार, रा. वार्ड क्र. १ विठ्ठल मंदिर जवळ, पिंपळगाव (वाखाजी) पो. नरखेड, जि. नागपूर-४४१२०४, २) सुरेश संतोषराव लक्षनकर वय ५० वर्षे, धंदा – व्यापार, रा. पिंपळगाव (वाखाजी) पो. नरखेड, जि. नागपूर-४४१२०४, सौ. सुनंदा दिलीपराव अनकर, वय ४८ वर्षे, धंदा – गृहिणी, रा. दावसा, तह. नरखेड, जि. नागपूर ४) स्व. प्रकाश संतोष लक्षनकर, मयत तर्फे वारस, ४अ) श्रीमती रंजना प्रकाश लक्षनकर, वय ४५ वर्षे, धंदा – गृहिणी, ४ब) चेतन प्रकाश लक्षनकर वय २८ वर्षे, धंदा – शिक्षण, ४क) भूमिका प्रकाश लक्षनकर वय २५ वर्षे, धंदा – गृहिणी रा. वार्ड नं. १४, हनुमान मंदिरा जवळ, कुंभार पेठ, नरखेड, ता. नरखेड, जि. नागपूर
विरुद्ध
गैरअर्जदार : निरंक
मयतदार : १) स्व. संतोष पांडुरंगजी लक्षनकर (मयत दि. १४/१२/२०२३), २) स्व. निर्मलाबाई संतोष लक्षनकर, (मयत दि. ०७/०९/२००४), रा. नरखेड, ता. नरखेड, जि. नागपूर

सदरहु अर्जदाराने Bombay R'gulation VIII Act. 1827 U/S 8, Clause 2 अन्वये या न्यायालयात वारसान सर्टिफिकेअ मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराने मयतदार : १) स्व. संतोष पांडुरंगजी लक्षनकर, (मयत दि. १४/१२/२०२३) २) स्व. निर्मलाबाई संतोष लक्षनकर, (मयत दि. ०७/०९/२००४), रा. नरखेड, ता. नरखेड, जि. नागपूर रोजी किंवा त्यानुसारास झालेला आहे. वारसान सर्टिफिकेट मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाची सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर नरखेड, जि. नागपूर यांनी दि. २१/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीरनामा नोटीसद्वारे सर्व संबंधितांना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर मयतदाराचे नावे असलेल्या रुपये/संपत्तीबाबत अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जासंबंधी जर कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी करावा. जर अशी कोणतीही हरकत या उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला वारसान सर्टिफिकेट (Legal heir Certificate) मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांक १२/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.
दि. १२/०९/२०२५
नरखेड

आदेशानुसार
(आर.जे. कावलकर)
सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, नरखेड

**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७४
[illegible] दिनांक : १२/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. म . उ . प . सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा . जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. महमुदुल हसन मोहम्मद इस्माईल, रा. कादर साहेब मस्जिद जवळ, मोमीनपुरा, नागपूर यांचा अर्ज दिनांक २८/०७/२०२५

-: जाहिरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार महमुदुल हसन मोहम्मद इस्माईल, मोमीनपुरा, नागपूर यांनी त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू महमुदुल हसन मोहम्मद इस्माईल यांचा जन्म दिनांक ०५/०३/१९६१ रोजी त्यांच्या राहते घरी मोमीनपुरा, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७४
[illegible] दिनांक : ०९/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. म . उ . प . सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा . जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. अब्दुल इरफान सिद्दिकी, रा. १४३, गोरेवाडा, वेलकम सोसायटी, नागपूर यांचा अर्ज दिनांक २२/०७/२०२५

-: जाहिरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार अब्दुल इरफान सिद्दिकी, रा. १४३, गोरेवाडा, वेलकम सोसायटी, नागपूर यांनी त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अब्दुल इरफान सिद्दिकी यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९६८ रोजी रोजी त्यांच्या राहते घरी जाफरनगर, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता




# पित्ताशयाचा कर्करोग बनतोय सायलेंट किलर

पित्ताशयाचा कर्करोग हा एक दुर्मिळ प्रकारचा कर्करोग आहे. तो पित्ताशयामध्ये विकसित होतो. पित्ताशयाचा कर्करोग त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात आढळून येत नाही, म्हणून त्याला सायलेंट किलर म्हटले जाते. म्हणूनच याबाबत जागरूकता, वेळीच निदान आणि उपचार गरजेचे आहे.


पित्ताशय हा यकृताखालील एक लहान अवयव आहे, जो पित्त साठवतो आणि बाहेर सोडतो. बऱ्याचदा त्याची कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत कवा अगदी सौम्य लक्षणे दिसून येतात. निदानास विलंब झाल्यास उपचार पर्यायदेखील मर्यादित होतात. पित्ताशयाचे खडे आणि पित्ताशयाचा कर्करोग ही देशातील आरोग्यविषयक चतेची बाब ठरत आहे. भारतात पित्ताशयाचा कर्करोग आणि पित्ताशयातील खडे ही एक गंभीर समस्या आहे आणि संपूर्ण जगभरातील एकुण प्रकरणांपैकी दहा टक्के प्रकरणे केवळ भारतात आढळून येतात. उत्तर, ईशान्य, मध्य आणि पूर्व भारतात हा आजार मोठ्या प्रमाणात आढळतो. पश्चिमेकडील देशांच्या विपरीत, भारतात पित्ताशयाचा कर्करोग तरुण व्यक्तीना प्रभावित करतो. ५० ते ६० वयोगटातील व्यक्तीमध्ये याचे प्रमाण अधिक आहे.

**जोखीम घटक**

पित्ताशयाच्या कर्करोगाचे नेमके कारण समजलेले नाही; परंतु यासंबंधी अनेक जोखीम घटक आढळतात.

पित्ताशयाचे खडे, पित्ताशयाची सूज, पित्ताशयाचे पॉलीप्स, लठ्ठपणा, वृद्धापकाळ (विशेषतः ६० वर्षांपेक्षा जास्त वय), पित्ताशयाच्या आजाराचा कौटुंबिक इतिहास, संसर्ग कवा पित्त नलिकांच्या विकृती..

या घटकांमुळे पित्ताशयाच्या अस्तरात बदल होऊ शकतात. त्यामुळे कालांतराने कर्करोग होण्याची शक्यता वाढते. त्वरित निदान आणि उपचारांसाठी कर्करोगाची लक्षणे जाणून घेणे गरजेचे आहे. पित्ताशयाचे खडे खूप सामान्य असले, तरी पित्ताशयाचा कर्करोग तुलनेने दुर्मिळ आहे. पित्ताशयाचे खडे कवा पित्ताशयाला सूज असलेल्या सर्वच लोकांना कर्करोग होत नाही. तथापि, पित्ताशयाच्या आजाराचा इतिहास असलेल्या व्यक्तीमध्ये, विशेषतः पित्ताशयाच्या खड्यांचा इतिहास असलेल्या व्यक्तीमध्ये, पित्ताशयाचा कर्करोग होण्याचा धोका हा पित्ताशयाच्या खडे नसलेल्या व्यक्तीच्या तुलनेत पाचपट अधिक आहे.



आरोग्य वार्ता

डॉ.सतीश सोनवणे

**काय आहेत लक्षणे ?**

सुरुवातीच्या टप्प्यात, पित्ताशयाच्या कर्करोगाची स्पष्ट लक्षणे दिसून येत नाहीत. तो जसजसा वाढत जातो तसतसे खालील लक्षणे दिसून येतात:

* ओटीपोटाच्या वरील उजव्या बाजूस सतत वेदना
* मळमळ कवा उलट्या
* कावीळ (त्वचा आणि डोळे पिवळे होणे)
* अचानक वजन कमी होणे
* ताप
* थोडेसे खाल्ल्यावरही पोट भरल्यासारखे वाटणे
* पोटात गाठ

ही लक्षणे इतर सामान्य पचन समस्यांसारखी असल्याने अनेकदा दुर्लक्ष केले जाते कवा चुकीचे निदान केले जाते.

**उपचार काय आहेत?**

कर्करोगाचे निदान कोणत्या टप्प्यावर झाले आहे यावर उपचार अवलंबून असतात. सुरुवातीच्या काळात जवळच्या ऊतींसह पित्ताशयाचे खडे शस्त्रक्रियेने काढून टाकणे बरे होऊ शकते. जर कर्करोग पसरला असेल, तर केमोथेरपी, रेडिएशन थेरपी, टार्गेटेड थेरेपी, पॅलिएटिव्ह केअर यासारखे उपचार पर्यायांचा आधार घ्यावा लागेल.

**वेळीच निदान आवश्यक**

पित्ताशयाचा कर्करोग लवकर बरा होण्यासाठी वेळीच निदान आवश्यक आहे. पित्ताशयाचे खडे, पित्ताशयाच्या दीर्घकालीन समस्या कवा पोटाच्या समस्यांची अस्पष्ट लक्षणे असलेल्या कोणालाही त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता वेळीच मदत घ्यावी.

# पोटफुगीवर करा हे उपाय



अन्न आणि पचनाशी संबंधित समस्या आहे. जेव्हा आपल्या पोटात जास्त गॅस तयार होऊ लागतो, जेव्हा आपण वेगाने जेवतो कवा आपल्याला एखाद्या गोष्टीची लर्जी असते, तेव्हा पोट फुगते. याशिवाय, बद्धकोष्ठता आणि पचनाच्या समस्यांमुळेदेखील फुगणे होऊ शकते.

**पण ते कसे बरे करावे?**

बडीशेपः बडीशेपमध्ये दाहक–विरोधी गुणधर्म असतात. ते पोट फुगण्याची समस्या कमी करण्यास मदत करतात. जर तुम्ही पाण्यात बडीशेप घालून ते उकळून दररोज पिण्यास सुरुवात केली, तर ते पोट निरोगी ठेवण्यास मदत करेल. यासोबतच, बडीशेप चहा तोंडाची दुर्गंधी दूर करण्यासाठीदेखील फायदेशीर आहे.

**जिरे आणि ओवा पाणी**

जिरे आणि ओवा पोटाच्या समस्येसाठी फायदेशीर असतात. पोटफुगीच्या समस्येपासून मुक्त होण्यासाठी, एका ग्लास पाण्यात अर्धा चमचा जिरे आणि सेलेरी घाला आणि ते उकळू द्या. पाणी अर्धे झाल्यावर गॅस बंद करा आणि हे पाणी चहासारखे प्या. यामुळे पोटफुगी कमी होण्यास मदत होईल.

**आले आणि हग पाणी**

जेव्हा जेव्हा एखाद्याला पोटाचा त्रास होतो तेव्हा तो हग खातो कवा आल्याचा तुकडा चघळायला लागतो; पण जर तुम्ही हे दोन्ही पाण्यात उकळून ते पाणी प्यायले, तर पोटफुगीची समस्या दूर होऊ शकते. तसेच, पोटाशी संबंधित इतर समस्या दूर करण्यासाठी हा उपाय फायदेशीर आहे.

आरोग्य चर्चा

या तेलाने करा मालिश

तुम्ही तुमच्या पोटाच्या खालच्या आणि सुजलेल्या भागाला एरंडेल तेलाने मसाज करू शकता. हा उपाय पोटफुगीची समस्या अगदी सहजपणे दूर करू शकतो. थंड तेलाऐवजी कोमट तेल वापरणे चांगले.

**योगासनांचा सराव**

तुम्हाला पोटफुगीची समस्या असेल तर काही योगासनांचा सराव करू शकता. जे पोट फुगी कमी करण्यासाठी तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतात. बालासन आणि पवनमुक्तासन करू शकता.

# लाभदायी कंसा वाटकी

आयुर्वेद आणि विकार



आपले पाय सतत कार्यरत असतात. शरीराचा सगळा भार पायांवरच असतो. म्हणूनच आपल्या पायांना आणि त्यातही पावलांना आराम मिळणं गरजेचं असतं. आयुर्वेदात कंसा वाटकी नावाचा मसाजचा प्रकार आहे. कंसा वाटकी म्हणजे धातूच्या भांड्याने कवा वाटीने केला जाणारा मसाज. हा मसाज खूप लाभदायी असतो. तांबं, झक आणि टिन अशा तीन धातूंपासून ही वाटी तयार केली जाते. हा प्रत्येक धातू खूप उपयुक्त असतो. ही वाटी पायांवर घासली जाते. वाटीने पायांना मसाज केला जात असला तरी त्याचे लाभ संपूर्ण शरीराला मिळतात. या मसाजमुळे आपलं मनही स्थिर होतं. या थेरपीमुळे शरीराचं संतुलन साधलं जातं. पायाच्या नसांना चालना देण्यासाठी कंसा वाटकी हा अत्यंत योग्य असा मसाज आहे. हा मसाज ४५ मिनिटं केला जातो. मसाज केल्यानंतर थकलेल्या पायांना आराम मिळतो. रक्ताभिसरण वेगाने होऊ लागतं. पायाचे स्नायू, टिश्यूंचं कार्य सुधारतं. या मसाजमुळे संपूर्ण शरीरातली विषद्रव्यं बाहेर टाकली जातात.

# जीवनसत्त्वाअभावी झोपेत व्यत्यय




आरोग्यवेध

डॉ. मेघा पठारे

काहींची झोप वारंवार खंडित होते. लोक हा तणाव कवा थकव्याचा परिणाम मानतात; परंतु शरीरात काही जीवनसत्त्वांची कमतरता हे झोपेच्या समस्यांचे एक प्रमुख कारण असू शकते. चांगल्या आणि गाढ झोपेसाठी केवळ आरामदायी पलंगच नाही तर योग्य पोषणदेखील आवश्यक आहे.

डी जीवनसत्त्व आपल्या झोपेच्या चक्रावर नियंत्रण ठेवते. त्याच्या कमतरतेमुळे शरीरात थकवा आणि निद्रानाशाची समस्या वाढते. विशेषतः जे सूर्यप्रकाशापासून दूर राहतात कवा पुरेसा सूर्यप्रकाश मिळत नाही, त्यांना झोपेचा जास्त त्रास होतो.

व्हिटॅमिन बी १२ व्हिटॅमिन बी १२ मेंदू आणि मज्जासंस्था निरोगी ठेवते. त्याच्या कमतरतेमुळे मेलाटोनिन हार्मोनचे संतुलन बिघडू शकते, जे झोप आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. मॅग्नेशियम हे जीवनसत्व नसून एक खनिज आहे; परंतु त्याचा झोपेशी संबंध आहे. मॅग्नेशियम मनाला शांत करते आणि स्नायूंना आराम देते. त्याच्या कमतरतेमुळे झोपेची गुणवत्ता बिघडते.

# घट्ट मोजे घालताय?



बुटांसोबत मोजे घातले जातात. खेळताना तसंच कार्यालयात मोजे घालावे लागतात. अनेकांच्या पायात दिवसभर मोजे असतात. मात्र पायात बराच काळ मोजे घालून ठेवल्यास त्रास होऊ शकतो. म्हणूनच मोज्यांची निवड करताना काळजी घ्यायला हवी.


कुठे चुकतो आपण?

* खूप घट्ट मोज्यांमुळे पायांना सूज येऊ शकते. घट्ट मोज्यांचा रक्ताभिसरणावर परिणाम होतो. तसंच अचानक उकडायला लागतं.
* बराच काळ घट्ट मोजे घालून ठेवल्यामुळे पाय आखडू शकतात. टाच आणि पावलांना मुंग्या येण्याची शक्यता असते.
* बराच काळ मोजे घातल्यामुळे पायांना घाम येतो. या घामाच्या आर्द्रतेमुळे जंतूसंसर्गाचा धोका वाढतो. त्वचेचे विकार होऊ शकतात.
* मोज्यांमुळे पायांना खाज येते. जास्त वेळ खाजवल्यास त्वचा लाल होते.

# 'एआय'च्या रेडिओलॉजीतील वापरामुळे गोपनीयता धोक्यात

प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चा वापर वाढत आहे आणि वैद्यकीय क्षेत्रही यापेक्षा वेगळे नाही. विशेषतः रेडिओलॉजीमध्ये म्हणजेच एक्स–रे, एमआरआय सारख्या चाचण्यांमध्ये 'एआय'चा वापर झपाट्याने वाढत आहे. तथापि, यासोबतच रुग्णांच्या गोपनीयतेबद्दल आणि डेटाच्या सुरक्षिततेबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

'एआय'चा वापर वाढत आहे; परंतु त्याची योग्य तपासणी आणि मूल्यांकन तितक्या वेगाने होत नाही. जर 'रेडिओलॉजी'मध्ये 'एआय'चा योग्य वापर करायचा असेल, तर त्यासाठी टप्प्याटप्प्याने धोरण आखण्याची गरज आहे.



आरोग्यतंत्र

डॉ. विक्रम गरूड

**'एआय' कशी मदत करत आहे?**

रेडिओलॉजीमध्ये 'एआय' आणि मोठ्या भाषेतील मॉडेल्स (एलएलएम) चा वापर अनेक प्रकारे केला जात आहे. हे तंत्रज्ञान डॉक्टरांना अहवाल तयार करण्यास, रुग्णांची तपासणी करण्यास आणि रुग्णालयाचे काम सोपे करण्यास मदत करत आहेत. उदाहरणार्थ, 'एआय'च्या मदतीने एक्स–रे कवा एमआरआय प्रतिमा जलद आणि अचूक समजू शकतात. या तंत्रज्ञानामुळे केवळ वेळच वाचत नाही, तर डॉक्टरांना चांगले निर्णय घेण्यासदेखील मदत होते. तथापि, यामध्ये काही आव्हाने आहेत. सर्वात मोठी चता म्हणजे रुग्णांच्या डेटाची सुरक्षा.

**समस्येचे कारण काय आहे?**

'एआय' मॉडेल्स क्लाउडवर काम करतात, तेव्हा रुग्णांची वैयक्तिक माहिती, जसे की त्यांचा वैद्यकीय इतिहास कवा चाचणी अहवाल देशाच्या सीमेबाहेर जाऊ शकतात. यामुळे गोपनीयता धोक्यात येऊ शकते. भारताचा डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा २०२३ स्पष्टपणे सांगतो, की रुग्णाचा संवेदनशील डेटा त्यांच्या संमतीशिवाय परदेशात पाठवता येत नाही. 'एआय' मॉडेल स्थानिक पातळीवर म्हणजेच रुग्णालयाच्या आत तयार केले पाहिजे आणि चालवले पाहिजे. यामुळे डेटा सुरक्षित राहील आणि कायदेशीर नियमांचेदेखील पालन केले जाईल.

'एआय सिस्टम' योग्य आणि सुरक्षितपणे काम करत आहे, याची खात्री करणे महत्त्वाचे आहे. जेव्हा रुग्णालयात एआय सिस्टमचा वापर सुरू होतो, तेव्हा ते नियंत्रित पद्धतीने अंमलात आणले पाहिजे.

# रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी...

सध्या कोरोना व्हायरसने कहर केला आहे. सगळीकडे याच आजाराची चर्चा आहे. कोरोना व्हायरसची लागण होऊ नये, यासाठी आपण प्रत्येकानेच योग्य ती खबरदारी घ्यायला हवी. मुख्य म्हणजे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवायला हवी. फक्त कोरोना व्हायरसच नाही तर इतर आजारांना रोखण्यासाठीही प्रतिकारशक्ती गरजेची असते. प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी काही घटकांचा समावेश आहारात करायला हवा.



काय खावं?

* अळशी म्हणजे जवस खूप गुणकारी आहे. यात सिलियम आणि ओमेगा ३ फॅटी ॲसिड मुबलक प्रमाणात असतं. दररोज चमचाभर अळशी खाल्ल्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढू शकते. अळशी दुधासोबतही खाता येईल.
* तुळशीच्या गुणांबद्दल आपण जाणतोच. सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी तुळशीची पानं खावीत. तुळशीची पाच पानं आणि मध यांच्या एकत्रित सेवनाने रोगप्रतिकारक क्षमता वाढू शकते.
* सूर्यफुलाच्या बियांमध्ये जवसाप्रमाणे सेलेनियम असतं.

# सायक्लिक वॉमिटिंग सिंड्रोमविषयी...



आरोग्यवेध

उलटी ही तशी सर्वसामान्य बाब मानली जाते. एखाद्या व्यक्तीला उलटी झालीच तर त्याकडे फारसं गांभीर्याने पाहिलं जात नाही. घरगुती औषधांवर निभावून नेलं जातं. पण सलग दोन ते तीन वेळा उलटी झाल्यानंतर आपण त्यामागची कारणं शोधण्याचा प्रयत्न करतो. लहान मुलं कवा प्रौढांना सतत उलटी होत असेल तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. कारण ही साधी उलटी नसून सायक्लिक वॉमिटिंग सिंड्रोम असू शकतो.

सायक्लिक वॉमिटिंग सिंड्रोम हा अत्यंत दुर्मिळ अशा आजार आहे. हा आजार लहान मुलांमध्ये अधिक प्रमाणात आढळून येतो. या आजारात सतत मळमळणं आणि उलट्या असा त्रास होत राहतो. यामुळे मुलांना काही खाताही येत नाही. या आजारामागचं नेमकं कारण सांगता येत नसलं तरी काही खाद्यपदार्थांच्या सेवनामुळे हा त्रास होऊ शकतो. या आजारात पोटातही बऱ्याच वेदना होतात. चार ते आठ या वयोगटातल्या मुलांमध्ये सायक्लिक वॉमिटिंग सिंड्रोम आढळण्याचं प्रमाण बरंच जास्त असतं. अगदी सहा दिवसांच्या बाळापासून आठ वर्षांच्या मुलांपर्यंत हा आजार होताना दिसतो. प्रौढांना सत्तरीनंतर हा त्रास होऊ शकतो.

# वारंवार डोकेदुखीमुळे ब्रेन ट्युमर

ब्रेन ट्यूमर म्हणजे मेंदूमध्ये कवा आजूबाजूच्या पेशींची असामान्य वाढ. या वाढलेल्या पेशी एक प्रकारची गाठ कवा सूज तयार करतात, ज्याला आपण ट्यूमर म्हणतो. ब्रेन ट्यूमर केवळ मेंदूच्या आतच नाही, तर त्याच्या सभोवतालच्या नसा, पिट्यूटरी ग्रंथी, पाइनल ग्रंथी आणि मेंदूला झाकणाऱ्या पडद्या (मेनिन्जेस) मध्ये देखील होऊ शकतो.

मायोक्लिनिकनुसार, ब्रेन ट्यूमरचे दोन मुख्य प्रकार आहेत. एक म्हणजे सौम्य ट्यूमर जो कर्करोगरहित असतो. तो हळूहळू वाढतो; परंतु कालांतराने तो मेंदूच्या ऊतींवर दबावदेखील टाकू शकतो. त्यामुळे लक्षणे उदभवू शकतात. दुसरा म्हणजे घातक ट्यूमर जो प्राणघातक असतो. हा कर्करोगाचा असतो जो वेगाने वाढतो आणि आजूबाजूच्या ऊतींना नुकसान पोहोचवू शकतो. कधी कधी ट्यूमर शरीराच्या इतर भागांमधून फुफ्फुसे कवा स्तनातून मेंदूत पसरतो, ज्याला दुय्यम ब्रेन ट्यूमर म्हणतात.

**ब्रेन ट्यूमर का होतो?**

ब्रेन ट्यूमर होण्यामागे कोणतेही निश्चित कारण नाही; परंतु काही संभाव्य कारणे या समस्येसाठी जबाबदार असू शकतात. पेशींच्या डीएनएमधील बदलांमुळे, पेशी अनियंत्रितपणे वाढू लागतात. काही दुर्मिळ रोगप्रतिकारक विकारांमुळेदेखील ट्युमर होण्याची शक्यता वाढू शकते. बहुतेक प्रकरणांमध्ये ट्युमर का तयार झाला हे माहीत नसते.



व्याधी विचार

डॉ. दिलीप शिरसाट

**कोणती लक्षणे?**

वारंवार होणारी तीव्र डोकेदुखी, उलट्या कवा मळमळ ही लक्षणे आढळतात. डोकेदुखी हेदेखील मायग्रेनचे कारण असू शकते; परंतु सकाळी सतत डोकेदुखी ही मेंदूतील ट्युमरचे लक्षण असू शकते. कधीकधी एखाद्याचे नाव कवा तारीख विसरणे सामान्य आहे; परंतु जर तुम्ही अलीकडील घटना वारंवार विसरण्यास सुरुवात केली असेल, गोष्टी लक्षात ठेवण्यास त्रास होत असेल, तर हे मेंदूच्या कार्यावर परिणाम होण्याचे लक्षण असू शकते. जर तुम्हाला बोलण्यात अडचण येत असेल, शब्द तोंडावर थांबत असतील कवा तुम्ही जे काही बोलत आहात, ते चुकीच्या पद्धतीने बाहेर पडत असेल आणि तुम्ही काय बोलण्याचा प्रयत्न करत आहात आणि लोकांना ते समजत नसेल, तर हे मेंदूच्या त्या भागावर परिणाम होण्याचे लक्षण असू शकते.

नवसंशोधन

## स्मार्टफोनमुळे वाढतो डोकेदुखीचा त्रास!


स्मार्टफोनच्या अतिवापराचे बरेच दुष्परिणाम आहेत. त्यातच आता एक नवी बाब समोर आली आहे. स्मार्टफोनमुळे डोकेदुखीचा त्रास वाढू शकतो, असं 'एम्स'च्या शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. नियमित डोकेदुखी तसंच मायग्रेनची समस्या असणाऱ्या स्मार्टफोन वापरकर्त्यांचा त्रास दुपटीने वाढल्यामुळे ते वेदनाशामक औषधं घेऊ शकतात. यामुळे त्रास कमी होण्याऐवजी वाढू शकतो, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. 'न्यूरोलॉजी : क्लिनिकल प्रॅक्टिस' या जर्नलमध्ये हे संशोधन प्रसिद्ध झालं आहे. या संशोधनात ४०० लोकांचा अभ्यास करण्यात आला.



डोळ्यांचं आरोग्य

## डोळे का होतात लाल?

डोळे लाल होणं ही सर्वसाधारण समस्या मानली जाते. डोळे लाल होण्यामागे काही कारणंही असतात. डोळ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात अश्रूंची निर्मिती झाली नाही तर ते कोरडे पडतात. याला वैद्यकीय भाषेत ड्राय आय असं म्हणतात. ओलाव्याच्या कमतरतेमुळे डोळ्यांमध्ये अस्वस्थता जाणवते. यामुळे डोळे लाल दिसू लागतात. पापण्यांलगत होणाऱ्या दाहामुळेही डोळे लाल होऊ शकतात. स्मार्टफोन, कॉम्प्युटर स्क्रीनमुळे डोळ्यांवर प्रचंड ताण येतो. डोळे थकून जातात आणि लालसर दिसू लागतात.



जपणूक केसांची


## कारणं केस गळण्याची...

केस गळण्याला अनेक गोष्टी कारणीभूत ठरू शकतात. शरीरात लोहाची कमतरता असल्यास केस गळू शकतात. लोहाच्या कमतरतेमुळे ॲनिमिया होऊ शकतो. शरीरात रक्ताची कमतरता निर्माण झाल्यास केस गळू शकतात. वजन कमी करण्यासाठी बरेचजण डाएटग करू लागतात. आहारातून अनेक पोषक घटक वर्ज्य केले जातात. यामुळे शरीरात जीवनसत्त्वं, खनिजं यांची कमतरता निर्माण होऊन केस गळू लागतात. ठराविक वयानंतर महिलांचे केस गळू लागतात. थायरॉइडची समस्याही केस गळण्याला कारणीभूत ठरू शकते.



आजीबाईचा बटवा

## बहुगुणी कापूर



धार्मिक कार्यक्रमांमध्ये कापराचा वापर होतो. मात्र हाच कापूर औषधीही आहे. कापरातल्या जंतूनाशक गुणांमुळे बरेच लाभ होऊ शकतात. कापरामुळे सौंदर्यवृद्धी होऊ शकते. कापरासह त्याचं तेलही खूप गुणकारी असतं. कापराचं तेल चेहऱ्यावर लावल्यामुळे फोड, मुरुमं, पुटकुळ्या बऱ्या होतात. चेहऱ्यावरचे डाग घालवण्याची क्षमताही या तेलात आहे. कापराच्या तेलाने मसाज केल्यास ताण कमी होऊ शकतो. पायांचा जंतूसंसर्गही कापराच्या वापरामुळे दूर होऊ शकतो.

# नागरी सुविधेसह स्वच्छतेला प्राधान्य द्या

## मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी व जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी संयुक्तपणे केली परिसराची पाहणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

येत्या २ ऑक्टोबरला होणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिन मुख्य समारंभ आणि इतर दिवशी देखील दीक्षाभूमीवर दाखल होणाऱ्या बौद्ध अनुयायांसाठी नागरी सुविधा आणि आरोग्याच्या दृष्टीने संपूर्ण दीक्षाभूमी परिसरामध्ये स्वच्छतेसह नागरी सुविधा पुरविण्याला प्राधान्य द्या, असे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.



धम्मचक्र प्रवर्तन दिनासाठी मनपाद्वारे करण्यात येत असलेल्या व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी मंगळवारी (ता.१६) दीक्षाभूमी परिसराला येथे भेट दिली. यावेळी प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे पदाधिकारी यांच्यासमवेत आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण परिसराची पाहणी केली.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी, पोलीस उपायुक्त एच ऋषिकेश रेड्डी, मुख्य अभियंता मनोज तालेवार, उपायुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त राजेश भगत, मनपाचे मुख्य अग्निशमन अधिकारी तुषार बाराहाते, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, लक्ष्मीनगर झोनचे सहायक आयुक्त सतीश चौधरी, कार्यकारी अभियंता सर्वश्री रवींद्र बुंधाडे, श्रीकांत वाईकर, नागपूर सुधार प्रन्यासचे कार्यकारी अभियंता चिमूरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे डॉ. सुधीर फुलझेले, विलास गजघाटे, मनपाचे विभागीय स्वच्छता अधिकारी लोकेश बासनवार, लक्ष्मीनगर झोनचे झोनल अधिकारी ऋषिकेश इंगळे यांच्यासह आदी उपस्थित होते.

नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निर्देशित केल्याप्रमाणे आयुक्त, जिल्हाधिकारी व पोलीस उपायुक्त यांनी दीक्षाभूमी परिसराची पाहणी केली. येत्या २ ऑक्टोबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त लाखो बौद्ध अनुयायी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दीक्षाभूमीवर येणार आहेत. त्यानुसार ३० सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधीमध्ये नागपूर महानगरपालिका द्वारा दीक्षाभूमीवर अनुयायांसाठी आवश्यक त्या सर्व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. लाखोंच्या संख्येत येणाऱ्या बौद्ध अनुयायांना आरोग्यपूर्ण सुविधा मिळाव्यात यासाठी संपूर्ण दीक्षाभूमी परिसरामध्ये स्वच्छतेला विशेष प्राधान्य देण्याबाबत आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी प्रशासनाला निर्देश दिले. तसेच नासुप्रद्वारे दीक्षाभूमी परिसरात सुरू असलेल्या कामाला गती देत लवकरात लवकर मैदान मोकळे करावे, असेही निर्देश आयुक्त यांनी नासुप्रच्या अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी इतर अधिकाऱ्यांसोबत दीक्षाभूमीचा संपूर्ण परिसर, मुख्य समारंभाचे ठिकाण, डॉ. आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च येथील इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या जागेत तात्पुरत्या शौचालयांची व्यवस्था, माता कचेरी परिसर आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय), सामाजिक न्याय भवन परिसरातील पार्किंगच्या जागेवर शौचालयाची व्यवस्था व अन्य नागरी सुविधा या सर्व व्यवस्थेची पाहणी केली. दीक्षाभूमी स्तूप, तसेच सर्व मार्ग आणि शौचालयांच्या ठिकाणी वीज पुरवठा निरंतर सुरू राहील याकडे कटाक्षाने लक्ष देणे तसेच प्रसाधनगृहांमध्ये वीज पुरवठ्यासोबतच निरंतर पाणी पुरवठा देखील ठेवणे आणि सर्व शौचालयांच्या ठिकाणी स्वच्छतेसाठी हँडवॉशची व्यवस्था करण्याचे निर्देश मनपा आयुक्तांनी दिले.

# जन्म दाखला अभियानाचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूरच्या मोमिनपुरा परिसरात एका विशेष जन्म दाखला (जन्म प्रमाणपत्र) अभियानाचे आयोजन केले. ज्या नागरिकांकडे जन्म प्रमाणपत्र नाही किंवा ज्यांना ते मिळवण्यात अडचणी येत आहेत, त्यांच्यासाठी हा विशेष जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

नागरिकांना त्यांचे मूलभूत कायदेशीर हक्क मिळवून देणे आणि त्यांना सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी मदत करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. जन्म दाखल्याच्या अभावी अनेक लोक शिक्षण, आरोग्यसेवा आणि इतर सरकारी सुविधांपासून वंचित राहतात. हा जागरूकता कार्यक्रम मोमिनपुरा येथील मजीदिया गर्ल्स हायस्कूल मध्ये घेण्यात आला, ज्यात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ अधिवक्ता आसिफ कुरेशी यांनी भूषवले आणि त्यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले. नागपूर महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी व जन्म-मृत्यू विभागाचे उपनिबंधक डॉ. अतीकुर रहमान खान यांनी नागरिकांना अर्ज भरण्यासाठी आणि आवश्यक कागदपत्रे जमा करण्यासाठी मदत केली.

यावेळी त्यांनी सर्व कायदेशीर औपचारिकता व्यवस्थित आणि योग्यरित्या पूर्ण होतील, याची खात्री केली. सेवानिवृत्त मुख्याध्यापक वकील नजीब खान यांनीही नागरिकांना जन्म दाखला काढण्यासाठी प्रोत्साहित केले आणि आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिजवान अन्सारी यांनी केले, तर आभार प्रदर्शन अॅड. अतीकुर रहमान यांनी केले.

हे अभियान यशस्वी करण्यासाठी अॅड. खलिक अंसर, शाहिद अन्सारी यूसफी, डॉ. मोहम्मद शाहिद, शोएब अन्सारी, नौशाद अन्सारी, मो. फहीम अन्सारी, वकार हनीफ, शाहिद अमीन, मुस्ताक जहीर, आसिम अन्सारी, शाहबाज शेख, नावेद शेख, परवेज अहमद, फैयाज अन्सारी, अबूबक्र अन्सारी, उमर शेख, फैजुर रहमान, एहतेशाम कुरेशी, मो. सईद अन्सारी, मोहसिन शाही, आदींनी मोलाचे योगदान दिले.

# सहकारी पत संस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. नागपूरची 36 वी वार्षिक सर्व साधारण सभा संस्थेचे कार्यालय परिसर एफडीसीएम भवन, 359-बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर येथे पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. के. एच. चिंचखेडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

वार्षिक सर्वसाधारण सभेला प्रमुख पाहुणे डी. टी.पेठकर, माजी अध्यक्ष व विशेष अतिथी पी. एम. नाईकवाडे, माजी खजीनदार यांना सभेला निमंत्रित करण्यात आले. डी.टी. पेठकर, माजी अध्यक्ष व विशेष अतिथी पी.एम. नाईकवाडे, माजी खजीनदार यांना श्रीफळ शॉल देवून पदाधिकाऱ्यां-यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थेचे संचालक मंडळातील सर्व पदाधिकारी व सचालकांचे सत्कार करण्यात आला. सभेमध्ये निधन झालेल्या सभसदांना प्रमुख पाहुणे, विशेष अतिथी, व्यवस्थापन समिती व माननीय सभासद सभागृहाने श्रध्दांजली अर्पण केली.

वार्षिक सर्व साधारण सभेस 171 सभासद हजर होते. पतसंस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे माध्यमिक व उच्च माध्यमीक शालांत परीक्षेत प्राविण्य प्राप्त सभासद पाल्यांचा बक्षीस, सर्टीफिकेट व झाड देवून सत्कार करण्यात आला. वार्षिक अहवालावर, आर्थिक पत्रकावर चर्चाकरून आर्थिकपत्रके मंजूर करण्यात आले.

# विद्यार्थिनींना बेदम मारहाणीवरून शिक्षिकेच्या निलंबनाचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूर अमरावती महामार्गालगतच्या बाजारगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षिका मनीषा चौधरी यांनी दोन विद्यार्थिनींना कचरा न उचलण्याच्या कारणावरून शनिवारी (१३ सप्टेंबर) अमानुष मारहाण केली होती. या प्रकरणाची गंभीर दखल जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने घेतली असून या शिक्षिकेच्या निलंबनाचे आदेश काढण्यात आल्याची माहिती आहे.

शिक्षिकेने विद्यार्थिनींना बेशुद्ध होईपर्यंत मारहाण केल्याचा घटनेचे व्हिडीओ आणि छायाचित्र समाजमाध्यमांवर व्हायरल झाले. गावकऱ्यांनी प्रचंड संताप व्यक्त केला. साहाय्यक शिक्षिका मनिषा चौधरी यांना जाब विचारण्याकरिता सरपंचांसह गावकरी गेले असता सर्व शिक्षक आधीच शाळा बंद करून निघून गेले होते. या घटनेची माहिती सरपंच व सामाजिक संघटनांनी चाइल्ड हेल्पलाइन टोल फ्री क्रमांकावर दिली. प्रतिनिधी गावात पोहोचले. तिकडे विद्यार्थिनींच्या नातेवाइकांसह गावकऱ्यांनी कोंढाळी ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी गर्दी केली होती. यातील श्रेयाली पुंडलिक गाढवे ही विद्यार्थिनी बेशुद्ध पडली होती. सोनम नीलेश सहारे हिला उपचारानंतर सुटी देण्यात आली होती. अखेर पोलिसांनी भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. याप्रकरणाची दखल घेत या शिक्षिकेविरुद्ध निलंबनाचे आदेश काढले आहे. सीईओ विनायक महामुनी यांच्या आदेशान्वये शिक्षणाचा मोफत अधिनियम २००९ च्या कलम १७/२ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली

# अत्यावश्यक कामांसाठी महावितरणचा शटडाऊन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूर शहराला अखंडित आणि सुरक्षित वीजपुरवठा मिळावा यासाठी महावितरणकडून नियमित देखभाल आणि दुरुस्तीची कामे करण्यासाठी बुधवार, १७ सप्टेंबर रोजी शहराच्या काही भागातील वीजपुरवठा काही काळासाठी बंद राहणार आहे. महावितरणने केलेल्या या कामांमध्ये नवीन रोहित्र कार्यान्वित करणे, जुन्या वाहिन्यांची दुरुस्ती आणि उच्चदाब वाहिन्यांचे स्थलांतरण यांसारख्या अत्यावश्यक कामांचा समावेश आहे.

ग्राहकांनी या कामांमध्ये सहकार्य करावे असे आवाहन महावितरणने केले आहे, जेणेकरून भविष्यात कोणत्याही प्रकारचा अडथळा न येता त्यांना सुरक्षित आणि दर्जेदार वीजपुरवठा मिळू शकेल. या कामांमुळे काँग्रेसनगर विभागात सकाळी ८ ते ११ या वेळेत निंबा, चिकना, धामणा, खरसोली, पिलेकेपार, सालई, गोधनी, कालडोंगरी, नवेगाव, मानव मंदिर, गुरुकृपा नगर, धांडे लेआउट, वसंतनगर, लक्ष्मीनगर, विद्यापीठ परिसर. सकाळी ८ ते १२ या वेळेत जगन्नाथ नगर, लोकमान्य सोसायटी, जयंती नगरी-६, पद्मावती नगर, राजेश्वरी पार्क, मेश्राम लेआउट, मनोहर सोसायटी, जयराम कॉलनी, धोबी नगर, चिंतामणी २ आणि ३, शांती हाईट्स. सकाळी ८:३० ते १२:३० या वेळेत टेलिकॉम नगर, स्वावलंबी नगर, फ्रेंड्स कॉलनी, रवींद्रनगर, गावंडे लेआउट, पायोनियर सोसायटी, स्वरूप नगर, तात्या टोपे नगर, अत्रे लेआउट, धनगरपुरा, ग्राहक सुविधा केंद्र. सकाळी ८:३० ते ११:३० या वेळेत प्रताप नगर पोलीस स्टेशन, एनआयटी लेआउट, त्रिमूर्ती नगर, प्रियदर्शनी नगर, भुजबळ लेआउट, आदर्श कॉलनी, गेडाम लेआउट, भामटी वस्ती, गुडधे लेआउट या भागातील वीज पुरवठा बंद राहील.

महाल विभागात सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत: शितला माता मंदिर, बापू नगर, मिरे लेआउट, प्रशांत नगर, नंदनवन रोड, नंदनवन कॉलनी, कबीर नगर, गुरुदेव नगर, कीर्ती नगर, सर्वश्री नगर, नवनाथ आयटीआय, प्रगती कॉलनी, गौसिया, कंट्रोल तर सकाळी ९ ते दुपारी १२: मानापूर चौक, नवाबपुरा, लाकडी पूल, अयाचित मंदिर या भागातील वीज पुरवठा बंद राहील.

गांधीबाग विभागात सकाळी ८ ते ११:३० या वेळेत भवानी नगर, रेणुका नगर, गुरुदेव नगर, गंगाबाग, गौरी नगर आणि सकाळी ९ ते १०: होलसेल मार्केट, नंगा पुतळा आणि तहसील या भागातील वीज पुरवठा बंद राहील. सिव्हील लाईन्स विभागात सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत यशोधरा नगर, टिपू सुलतान चौक, शिवाजी चौक. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेतवांजरा औद्योगिक परिसर.

बुटीबोरी विभागात सकाळी ८ ते ११ या वेळेत कन्यकापुरम, धाबा परिसर आणि भिवसेनखोरी. तर, सकाळी १० वाजेपासून एमआयडीसी औद्योगिक परिसरातील वीज पुरवठा बंद राहील.

# अडीच हजारात व्हायचा देहाचा सौदा

नागपूर : ते स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गरीब घरातील महिला, तरुणींना जाळ्यात अडकवून देहविक्री करून घेत होते. अडीच हजारांत देहाचा सौदा करून त्यांना केवळ ५०० रुपये दिले जात होते. गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाला याबाबत माहिती मिळाली. एसएसबीच्या पथकाने तेथे धाड टाकून २ पीडित महिलांची या नरकातून सुटका केली. हॉटेल व्यवस्थापक महिलेसह तिघांना अटक केली. जयश्री संतोष सोळंकी (३८) रा. सायक, अमरावती, सलमान उर्फ रोशन राजेश डोंगरे (३६) रा. हिलटॉप रोड, वर्मा लेआउट, अंबाझरी आणि अक्षय रोशन रामटेके (३२) रा. राजगृहनगर, कपिलनगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. रोशनचा भाऊ रजत राजेश डोंगरे याचा पोलिस शोध घेत आहेत.

एमआयडीसी ठाण्यांतर्गत राजेंद्रनगर मेट्रो स्टेशनजवळ असलेल्या ओयो अर्बन रिट्रीट हॉटेलमध्ये देहविक्रीचा अड्डा असल्याची माहिती एसएसबीला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी पंटरला ग्राहक बनवून तेथे पाठवले. ग्राहकाने जयश्री आणि रोशनशी संपर्क केला. दोघांनीही त्याला हॉटेलमध्ये बोलावले. अडीच हजारात सौदा ठरला. पंटरने दबा धरून बसलेल्या पोलिसांना इशारा दिला. पोलिसांनी धाड टाकून वरील तिन्ही आरोपींना अटक केली. चौकशीदरम्यान डोंगरे बंधू हे सेक्स रॅकेट चालवत असल्याची माहिती समोर आली.

# २ ट्रकांमध्ये धडक, एक चालक ठार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

आऊटर रिंगरोडवर वेळाहरी परीसरात दोन ट्रकांमध्ये जबर धडक होऊन एका ट्रकच्या चालकाचा मृत्यू झाला. आरिफ सुब्बी खान (३८) रा. डिग, राजस्थान असे मृताचे नाव आहे. आरिफ आयटीएस कंपनीत कामाला होता. बिलासपूर येथून ट्रक क्र. एचआर-५५/एएक्स-२२३७ मध्ये माल भरून बंगळुरूला जात होता. आऊटर रिंगरोडवर वेळाहरी परिसरात त्याने समोर जात असलेल्या ट्रक क्र. जीजे-०३/बीव्ही-७३२५ ला जबर धडक दिली.

यात आरिफच्या ट्रकचे केबिन पूर्णतः चक्काचूर झाले आणि तो आतमध्येच अडकून पडला. नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिस घटनास्थळी पोहोचले, मात्र तोपर्यंत आरिफचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# आजपासून सुरू होणार सेवा पंधरवडा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाअंतर्गत राष्ट्रनेते पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती २ ऑक्टोबर या कालावधीत संपूर्ण राज्यभर सेवा पंधरवाडा साजरा केला जात आहे. या सेवा पंधरवाडा कालावधीत नागपूर जिल्ह्यात शासकीय सुविधांच्या प्रभावी अंमलबजावणीवर आधारीत सेव्हन स्टार महसूली गाव अभियान राबविले जाणार असून जिल्हास्तरीय कार्यक्रम नागपूर ग्रामीणमधील विहीरगाव येथे होणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी सांगितले.

महसूल व जिल्हा परिषदेअंतर्गत गावपातळीपर्यंत सर्व सामान्य जनतेची शासनासंदर्भात असलेली कामे सुरळीत मार्गी लागावीत, जनतेला उत्तम सेवेचा प्रत्यय यावा यावर सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. सेव्हन स्टार महसूली गाव अभियानामध्ये प्रत्येक गावासाठी पाणंद रस्ता, पात्र असलेल्या गरजूंना पट्टे वाटप, अर्धन्यायिक प्रकरणांसदर्भात स्थानिक पातळीवरच सुलभ न्यायनिवाडा व्हावा यासाठी विशेष लोक अदालत, गरजूंना प्रमाणपत्र वाटप, तक्रार निवारणातून समाधान दिवस, जिवंत सातबारा व फेरफार, संजय गांधी निराधार योजनेतून अधिकाधिकांना न्याय या सात कार्यक्षेत्रांवर केलेल्या कामांचे मूल्यमापन करुन अशा श्रेणीतील सेव्हन स्टार महसुली गाव जाहीर केले जाणार आहे. पंधरवाड्या दरम्यान पट्टे वाटप करणे, पाणंद रस्ते मोकळे करणे या कामास प्राधान्य दिले जाणार असून राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या फ्लॅगशीप योजनांचा सुध्दा पंधरवाड्यात समावेश करण्यात आला आहे

# कवितेच्या घराचे बापुरावजी पेटकर काव्य पुरस्कार जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

महाराष्ट्राच्या काव्यक्षेत्रात नवनव्या उपक्रमांसाठी चर्चेचा विषय असलेल्या कवितेच्या घराच्या वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२५ च्या बापुरावजी पेटकर राज्यस्तरीय उत्कृष्ट काव्य पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली आहे.

यात बापुरावजी पेटकर उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार प्रभू राजगडकर (नागपूर) यांच्या 'येथे आमचाही श्वास कोंडतो आहे' या कविता संग्रहाला, बापुरावजी पेटकर उत्कृष्ट गझलसंग्रह पुरस्कार गजानन वाघमारे (यवतमाळ) यांच्या 'भुकेचा केंद्रबिंदू' या गझलसंग्रहाला आणि उत्कृष्ट बालकवितासंग्रह पुरस्कार प्रसेनजित गायकवाड (नागपूर) यांच्या 'काय तसे मी काय करू?' या बालकवितासंग्रहाला जाहीर झाला आहे. बापुरावजी पेटकर राज्यस्तरीय विशेष काव्य पुरस्कारासाठी किरण भावसार (नाशिक) यांच्या घामाचे संदर्भ हा कवितासंग्रह, नंदकिशोर वाघमारे (अमरावती) यांचा किनारे सरकत आहेत हा गझलसंग्रह तसेच मोहन काळे (नवीमुंबई) यांचा एकदा आपणच व्हावे मोर हा बालकवितासंग्रह निवडण्यात आला आहे. राज्यस्तरीय उत्कृष्ट काव्य पुरस्कारासाठी प्रत्येकी ५,००० रुपए रोख राशी, मानपत्र व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. तर विशेष पुरस्कारासाठी सन्मानचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कारासाठी महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील कवींकडून कडून व प्रकाशकांकडून १५८ काव्यसंग्रह प्राप्त झाले होते.

पुरस्कार निवड समितीचे परीक्षक म्हणून अकोला येथील प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक डॉ. अशोक इंगळे, वर्धा येथील प्रसिद्ध गझलकार संजय इंगळे तिगावकर तसेच मुंबई येथील साहित्य अकादमी पुरस्कार विजेते कवी एकनाथ आहाड यांनी उत्कृष्ट ग्रंथांची पुरस्कारासाठी निवड केली. शनिवार दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता कवितेचे घर, शेगांव(बु.), त. वरोरा, जि. चंद्रपूर येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवर साहित्यिकांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल असे कवितेच्या घराचे श्रीकांत पेटकर, कार्यवाह प्रा. डॉ. प्रमोद नारायणे, संकल्पनाकार किशोर पेटकर, कार्यक्रम प्रमुख डॉ. संदीप भेले, संयोजक विकास जवादे व सूर्यकांत पाटील यांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

**महासागर प्रभाग वार्ता**

# मंगळवारी पुलावर जीवघेणी खड्ड्यांची दहशत, नागरिक संतप्त!

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि. १६

प्रभाग क्रमांक २ मधील इंदोरा कडबी चौकापासून मंगळवारी बाजाराकडे जाणाऱ्या पुलावर मोठे व धोकादायक खड्डे निर्माण झाले असून, त्यामुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत.



पुलावरील खड्डे इतके खोल व जिवघेणे झाले आहेत की लोखंडी सळाख्याही उघड्या झाल्या असून, एखादी गंभीर दुर्घटना घडण्याचा धोका सतत निर्माण झाला आहे.या रस्त्याचा वापर दररोज हजारो नागरिक, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नोकरदार करतात. परंतु या मार्गावरून जाताना अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. स्थानिक रहिवासी रवींद्र पिंपळ वालदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला सवाल केला आहे, प्रशासन झोपले आहे का? त्यांना हे खड्डे दिसत नाहीत का?नागरिक भुवनेश्वर उके म्हणतात, या पुलावरून घाईत जाणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे झाले आहे.अपघात घडण्याआधी प्रशासनाने तत्काळ लक्ष द्यावे, अशी नागरिकांची मागणी आहे.प्रभू गजभिये, अमोल गजभिये, राजेश राऊत, पवन सहारे, राजेश वासनिक, अनुप राहाटे, सुधीर खोब्रागडे, सचिन कांबळे, संजय फुलझेले,हेमराज जांभुळकर, प्रशांत साखरे, राजन शेंडे, बिनोद मुंडवाईक शैलेश बोदिले, शैलेंद्र बेहेरे, मंगेश नागबौद्ध आदी नागरिकांनी पुलाच्या दुरवस्थेबाबत चिंता व्यक्त करत तात्काळ दुरुस्तीची मागणी केली आहे.

# गायत्री पार्क २ ते झेंडा चौक मुख्य मार्गापर्यंत रस्त्याची दयनीय अवस्था



प्रफुल्ल पाटणकर,
नागपूर दि. १६

हिंगणा : वाघधरा अंतर्गत येणाऱ्या इसासनी ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या रॉयल गायत्री पार्क २ ते झेंडा चौक पोहोच रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्याची बिकट अवस्था झाली आहे. थोडा पाऊस झाला की रस्त्यावरची माती वाहून जाते व वाहनं घसरू लागतात. त्यामुळे अनेक अपघात घडले आहेत. शाळेत जाणारी मुलही या रस्त्यामुळे त्रास सहन करताना दिसली.

क्षेत्रकळाच्या दृष्टीने हा भाग मोठा असला तरी संबंधित शासन-प्रशासनाचे अधिकारी अजिबात लक्ष देत नाहीत. रहिवाशांनी ग्रामपंचायत सरपंच व अधिकाऱ्यांकडे त्वरीत समस्या सोडविण्याची मागणी केली असता सरपंच अरविंद ढोणे यांनी समस्येचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे.

# धरमपेठ म्हाडा कॉम्प्लेक्ससमोर साचले पाणी

प्रमोद जांभुळकर,
नागपूर दि.१६


### यात्रेकरूंना मोठा त्रास

धरमपेठ येथील म्हाडा कॉम्प्लेक्ससमोर पावसाचे पाणी साचल्यामुळे यात्रेकरूंना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. परिसरात अनेक ट्रॅव्हल्स कंपन्यांची कार्यालये असून, रोज शेकडो प्रवासी येथे आगमन आणि प्रस्थान करतात. मात्र, साचलेल्या पाण्यामुळे प्रवाशांची गैरसोय वाढली आहे. पावसाचे पाणी निचऱ्याची योग्य व्यवस्था नसल्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात साचत आहे. परिणामी, प्रवाशांना बूट-चप्पल हातात घेऊनच प्रवास करावा लागत आहे. यामुळे वृद्ध नागरिक, महिला आणि लहान मुलांना अधिक त्रास होत आहे. काही ठिकाणी चिखलाचे साम्राज्य पसरले असून, अपघात होण्याची शक्यताही वाढली आहे.स्थानिक



दुकानदार आणि ट्रॅव्हल्स चालकांनी या समस्येबाबत वारंवार तक्रारी करूनही अद्याप कुठलाही ठोस उपाय करण्यात आलेला नाही. "दरवर्षी हीच समस्या उद्भवते. आम्ही प्रशासनाला अनेकदा कळवले, पण काहीही उपाय केला जात नाही," अशी प्रतिक्रिया एका ट्रॅव्हल्स चालकाने दिली.यात्रेकरूंना होणारा त्रास लक्षात घेता महापालिकेने तातडीने लक्ष घालून पाण्याचा निचरा करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नगर पालिकांच्या प्रभाग रचनेची सुनावणी आटोपली




**महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १६ :** राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील सर्व १० नगरपालिका आणि चारही नगर पंचायतींमधील मतदारसंघांची रचना निश्चित करण्यात आल्यानंतर त्याद्वारे तयार झालेले प्रारूप नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यावरील हरकती व सूचनांची सुनावणी आटोपली असून आगामी दोन दिवसांनी (१८ सप्टेंबर) हा अहवाल नगरपालिका प्रशासनामार्फत राज्य निवडणूक आयोगाच्या स्वाधीन केला जाणार आहे. त्यानंतरचे सोपस्कार आटोपल्यावर २६ सप्टेंबरला कोणत्या प्रभागात कोणता भाग येतो, हे अंतिमत: नागरिकांना माहीत होणार आहे. अर्थात त्यासाठीची यादी निवडणूक आयोगाद्वारे घोषित केली जाणार आहे. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थ्यांच्या निवडणुकांचा मोसम असल्याने जिल्हा परिषद-पंचायत समितींपाठोपाठ जिल्ह्यात नगरपालिका व नगर पंचायतींच्या निवडणुकांचेही पडघम वाजले आहेत. त्यादृष्टीने सर्व राजकीय पक्ष कामाला लागले असतानाच प्रशासकीय हालचालींनीही वेग घेतला आहे. मतदारसंघांची (वार्डांची रचना) रचना निश्चित करणे त्या प्रक्रियेचाच एक भाग आहे. त्यानंतर सदर वॉर्डांमधील कोणते वार्ड कोणत्या संवर्गासाठी आरक्षित करायचे व महिलांसाठी कोणते वॉर्ड राखीव ठेवायचे, हा टप्पा पूर्ण केला जाणार आहे. निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या वेळापत्रकानुसार जिल्ह्यातील चार नगरपंचायतींपैकी दोन ठिकाणी लोकनियुक्त प्रशासन असल्यामुळे १० नगरपालिका व दोन नगरपंचायतींची निवडणूक होऊ घातली आहे. त्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत सूचना व हरकती मागवण्यात आल्या होत्या. त्यानुसार तब्बल ५२ नागरिकांनी तक्रारी नोंदवल्या. त्यावर २ सप्टेंबरपासून सलग तीन दिवस जिल्हाधिकारी यांच्या कक्षात सुनावणी घेण्यात आली.

**१८ सप्टेंबरला यादी आयोगास सादर होणार; अंतिम घोषणा २६ सप्टेंबरला, नागरिकांना प्रतीक्षा**

# शेतकऱ्यांच्या हितासाठी कायम कार्यरत राहणार

**सभापती प्रा. मापारी; लोणार येथे शेतकऱ्यांना साहित्याचे करण्यात आले वाटप**



**महासागर प्रतिनिधी लोणार, दि. १६ :** शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि त्यांच्या फायद्यासाठी कायम कार्यरत राहणार आहोत, अशी ग्वाही कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रा. बळीराम मापारी यांनी दिली. स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीत केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना माफक दरात साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रा. मापारी बोलत होते.

यावेळी शेतकऱ्यांना फवारणी बॅटरी पंप आणि पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी वॉटर फिल्टर बाजारभावापेक्षा कमी दरात उपलब्ध करून देण्यात आले. या उपक्रमास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी सभापती प्रा. मापारी यांनी, शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन त्यांच्या शेतीसाठी आवश्यक साहित्य व सोयीसुविधा स्वस्त दरात उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम राबवल्याचे सांगितले. भविष्यातही शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे ते म्हणाले.

कार्यक्रमास शिवसेना तालुकाप्रमुख भगवान सुलताने, जगन्नाथ जायभाये, संचालक शिव तेजनकर, गजेंद्र मापारी, शहरप्रमुख पांडुरंग सरकटे, युवा सेना तालुकाप्रमुख गजानन मापारी, कैलास जायभाये, अरुण मुंडे, राजू तांबिले, देवा ठाकूर, अशोक वारे, अनिल गायकवाड, दीपक दूधमोगरे, संतोष सरकटे, केशव सरकटे, देवा चौधरी यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरूबद्दल अपशब्द बोलले तर तो गुरुद्रोह : पं. किशोर नवसाळकर

## महिला महाविद्यालयात कार्यक्रम ; आजी : माजी शिक्षकांचा सन्मान





**महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १६ :** विद्यार्थ्याला शिकवणे आणि कलाकाराला घडवणे हे दोन्ही कार्य गुरू करत असतो. त्यामुळे गुरूबद्दल चांगले बोलता आले नाही, ते म्हणाले की, तरी अपशब्द कधीही बोलू नये. तो गुरुद्रोह होतो, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष पंडित किशोर नवसाळकर यांनी केले.

येथील नूतन विदर्भ शिक्षण मंडळद्वारा संचालित महिला महाविद्यालयात शिक्षक दिनाच्या निमित्ताने कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सन्मानार्थ गुरुवंदन सोहळा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

या वेळी संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी गुरुवंदना सादर केली. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयाच्या विकासात दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते माजी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा हृदयस्पर्शी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष पंडित किशोर नवसाळकर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे मंडळ प्रतिनिधी रवींद्र खांडेकर, सचिव प्रा. हितेश व्यास, प्राचार्य अरुणा वाडेकर उपस्थित होत्या.

या वेळी प्रा. कुंदा गणोरकर आणि सुरमणी कमल भोंडे, प्रा. सुनीता इथापे व प्रा. सुरेखा जोशी यांनी प्रातिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले. गुरुवंदन सोहळ्याबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, मानवता आणि राष्ट्र निर्मितीमध्ये शिक्षकांची मोठी भूमिका असते. जसे दिवा विझू नये म्हणून आपण दिव्याला काचेचे कवच लावतो. आपल्यातील माणुसकी, राष्ट्रभक्ती विझू नये. याकरिता शिक्षक आपल्याला संस्काराचे कवच लावत असतात, असे प्रतिपादन कुंदा गणोरकर यांनी केले.

तसेच प्रा. कमल भोंडे म्हणाल्या, की शिक्षक जीवनाला समृद्ध करत असतात. एक चांगला समाज निर्माण करण्याचे अधिक श्रेय हे शिक्षकाला जाते. प्रा. सुनीता इथापे म्हणाल्या, की विद्यार्थी असो अथवा शिक्षक त्यांच्या विकासामध्ये महाविद्यालयाची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. ज्या महाविद्यालयाने आपल्याला मोठे केले आहे. त्या महाविद्यालयाला मोठे करणे ही आजची गरज असल्याचेही त्या म्हणाल्या.

तत्पूर्वी, कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ममता पांडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. कांचन परतेकी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. अंकुश गिरी यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता संगीत विभागातील प्रा. डॉ. जयश्री वैष्णव यांनी गायलेल्या पसायदानाने झाली.

यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थिनींद्वारा सर्व शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयात आयोजित गुरु वंदन सोहळ्याला नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. आनंद परचुरे, ज्येष्ठ डॉ. सुभाष कसबेकर, उपाध्यक्ष प्रा. निनाद सोमण यांच्यासह कार्यकारिणीतील सर्व सभासद यांनी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य अरुणा वाडेकर यांच्या मार्गदर्शनात गुरुवंदन सोहळा हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिला महाविद्यालयात आयोजित गुरुवंदन सोहळ्याचे उद्घाटन करताना मान्यवर, तर यावेळी उपस्थित शिक्षक मंडळी. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक रवींद्र खांडेकर म्हणाले, की नूतन विदर्भ शिक्षण मंडळांतर्गत महिलांना शिक्षण देणारे महिला महाविद्यालय आहे. तसेच परिसरातील नूतन कन्या शाळा ही अमरावती शहरासाठी गौरवास्पद बाब आहे. महिला महाविद्यालयात विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी चालणारे लाठीकाठी प्रशिक्षण असो अथवा दादासाहेब खापर्डे यांच्या जयंतीनिमित्त नूतन विदर्भ शिक्षण मंडळा अंतर्गत चारही शिक्षण संस्थेद्वारे काढलेली प्रभात फेरी असो, हे कौतुकास्पद आहे.

# अधिकाऱ्यांना आदेश देणारे किरीट सोमय्या कोण?

## जन्म प्रमाणपत्रप्रकरणी सामाजिक संघटना आक्रमक ; थेट पंतप्रधानांकडे



**महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १६ :** शासकीय अधिकाऱ्यांना आदेश देणारे किरीट सोमय्या कोण आहेत? असा संतप्त सवाल करीत सन २०२४ पासून नायब तहसीलदारांच्या माध्यमातून दिलेले जन्माचे प्रमाणपत्र रद्द करू नये, अशी मागणी मूर्तिजापूर येथील सर्वपक्षीय व सामाजिक संघटनांनी केली आहे. यासंदर्भात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार यांच्या माध्यमातून निवेदन पाठवण्यात आले.जन्म प्रमाणपत्राचे तहसीलदारांकडे अधिकार देण्यात आले होते. तहसीलदारांनी नायब तहसीलदारांकडे जबाबदारी देऊन नागरिकांकडून अर्ज प्राप्त झाल्यावर आवश्यक कागदपत्रे तपासून जन्माचे प्रमाणपत्र वितरीत करण्याचे आदेश दिले होते. शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून आवश्यक कागदपत्रे घेऊन जन्म प्रमाणपत्रे तयार करण्यात आले. पूर्वीच्या काळात घरीच बाळाचा जन्म होत होता. त्यामुळे नगरपरिषदेमध्ये अनेकांची नोंद झाली नाही. त्यांना जन्म प्रमाणपत्र मिळवण्याचे हेच एक माध्यम होते. माजी खासदार किरीट सोमय्या यांनी २०२४ पासून जन्म प्रमाणपत्र मिळवणाऱ्या सरसकट सर्वांवर ते बनावट कागदपत्रांद्वारे मिळवल्याचा थेट आरोप केला. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांपासून सर्व शासकीय यंत्रणांना कामाला लावले. किरीट सोमय्या यांच्यामुळे देशातील सर्वसामान्य नागरिकांसह अधिकारी त्रस्त आहेत, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. रोहिंग्या मुस्लिमांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा घोटाळा करण्यात आल्याचा गंभीर आरोप किरीट सोमय्या यांनी केल्यानंतर संबंधितांची चौकशी करण्यात आली. त्यात एकही रोहिंग्या मुस्लीम आढळला नाही, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. शासनाने सर्व जन्म प्रमाणपत्र रद्द केल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणात काही नागरिकांनी न्यायालयात सुद्धा धाव घेतली.तरी २०२४ पासूनचे जन्म प्रमाणपत्र रद्द करू नये, अशी मागणी निवेदनातून माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे, माजी नगरसेवक चंद्रकांत तिवारी, ज्येष्ठ शिवसैनिक विनायक गुल्हाने, समाजसेवक शेख इमरान शेख खलील, संदीप जळमकर, श्रीकृष्ण बोळे, राम कोरडे, निजाम इंजिनियर, माजी नगरसेवक इब्राहिम घाणीवाला, तसलीम खान, माजी नगरसेवक वैभव यादव, पोलीस पाटील बासित पटेल, उज्ज्वल ठाकरे, डॉ.महेंद्र नवघरे, विलास वानखडे ,अन्वर खान, विशाल नाईक, मो शारिक कुरेशी, मो रिजवान

# ओला दुष्काळ कधी जाहीर करणार? शेतात साचलेल्या कंबरभर पाण्यात पोहून सरकारचा निषेध!



**महासागर प्रतिनिधी बुलडाणा, दि. १६ :** जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यात धोधो पावसाने हजेरी लावली, एवढेच काय सप्टेंबर मध्यावरच पावसाने शतक गाठले. मात्र आमदार, पालकमंत्री आणि सत्ताधारी पक्षाचेच असताना देखील आणि खरीप हंगाम निकषावर बोट ठेवून तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर झाला नाही. यामुळे तालुक्यातील हजारो शेतकरी, रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.या पार्श्वभूमीवर एका युवा शेतकऱ्याने लोकप्रतिनिधी व महायुती सरकारचा अभिनव पद्धतीने निषेध केला आहे. आजवरचा संततधार पाऊस आणि काल झालेली अतिवृष्टी यामुळे त्याच्या शेतात कंबर इतके पाणी साचले आहे. शेतात साचलेल्या पाण्यात त्याने चक्क पोहत आपला निषेध व्यक्त केला आहे. शेतात पोहण्यासारखे पाणी असल्याने आरामात पोहत त्याने निषेध व्यक्त केला.

पळसखेड चक्का, उमरदसह विविध गावात शेतकऱ्यांच्या शेतात कंबरेएवढे पाणी साचले आहे. गेल्या महिनाभरापासून सतत पाऊस पडत असल्याने पिकांची मुळे सडली आहेत. आजच्या ढगफुटीसदृश पावसाने त्यात मोठी भर पडली. त्यामुळे शेतकरी चिंतातूर झाले आहेत. शासनाने सिंदखेडराजा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत आहे. परंतु त्याची अद्याप दखल घेण्यात आली नाही.

त्यामुळे पळसखेड चक्का येथील बालाजी सोसे या शेतकऱ्याने चक्क शेतात तुंबलेल्या पाण्यात पोहून शासनाचा अनोख्या पद्धतीने निषेध नोंदविला.

'आता तरी ओला दुष्काळ जाहीर करा' अशी मागणी करीत सोशल मीडियावर शेतकऱ्याने पिकांतील पाण्यात पोहण्याचा व्हिडीओ व्हायरल केला आहे.

नेतेमंडळी आणि मायबाप राज्य सरकारला ओला दुष्काळ जाहीर करण्यासाठी आणखी किती पाऊस, किती नुकसान पाहिजे? असा सवाल त्याने केला आहे. हा व्हिडीओ समाज माध्यमावर वेगाने सार्वत्रिक होत आहे.

११ मंडळात अतिवृष्टीदरम्यान आज मंगळवारी सकाळी ८ वाजता संपलेल्या गत २४ तासात जिल्ह्यात सर्वदूर पावसाची नोंद झाली आहे. तसेच तब्बल ११ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. बुलढाणा, संग्रामपूरआणि जळगाव जामोद तालुक्यात कमी पाऊस झाला. मात्र मलकापूर (१०२. ३मिमी), देऊळगाव राजा ( ६६. ३मिमी), सिंदखेड राजा ( ६१मिमी), नांदुरा (४१), मोताळा (३३), चिखली (३६ मिमी), लोणार ( २९), शेगाव ( २४) मिमी पावसाची नोंद झाली.

तब्बल ११ महसूल मंडळात अतिवृष्टी म्हणजे ६५ मिलिमिटर पेक्षा जास्त पावसाने हजेरी लावली आहे. यामध्ये सिंदखेड राजातील सिंदखेड राजा, दुसरबीड आणि किनगाव राजा, चिखली मधील पेठ, मलकापूर तालुक्यातील मलकापूर, जांभूळ धाबा, नरवेल आणि धरणगाव देऊळगा राजा तालुक्यातील तुळजापूर, अंढेरा आणि मोताळा तालुक्यातील शेलापूर महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे.

## क्रीडांगणात दोन बिबट्यांची 'एन्ट्री'

**मूल:** शहरातील कर्मवीर महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर रविवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास बिबट्याची दोन पिल्ले झाडावर बसलेली आढळून आली. रोजच्या प्रमाणे फिरायला आलेल्या नागरिकांना हे दृश्य पाहता आले. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. या क्रीडांगणावर दररोज गावकरी, युवक व महिला मोठ्या संख्येने फिरायला येतात. याशिवाय परिसरात महाविद्यालयदेखील असल्याने अनेक विद्यार्थी ये-जा करतात. त्यामुळे या सर्वांना प्राण्यांच्या हल्ल्याचा धोका निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या बछड्यांची आई जवळपास असण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात असून, पुराच्या पाण्यापासून बचाव करण्यासाठी मादी बिबट्याने बछड्यांना झाडावर ठेवले असावे, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# वेध नवरात्रोत्सवाचे: गरब्यासाठी पोषाख, दागिन्यांची मागणी वाढली

## गरबाप्रेमींकडून ऑनलाइन खरेदीला प्राधान्य, भाड्याने ड्रेस मिळण्याची सुविधा

**महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १६ :** नवरात्रोत्सवात तरुणाईत गरबा नृत्याचा उत्साह असून, घागरा-चोली, चुनरी, धोती-कुर्ता, टिपऱ्यांसह मल्टिऑक्सिडाईज दागिन्यांना पसंती वाढली आहे. ऑनलाइन खरेदीही होत आहेत. नवरात्रीनिमित्त बाजारपेठा सजल्याचे दिसते. दररोज वेगळा ड्रेस खरेदी करणे परवडत नसल्याने घागरा-चोली, केडीया भाड्याने घेत आहे. त्यावरील डिझाइननुसार त्याची किंमत ठरते या कपड्यांसह दागिनेही भाड्याने दिले जात असून, गतवर्षीच्या तुलनेत ३० टक्के मागणी वाढल्याचे विक्रेत्यांनी सांगितले आहे.

त्यात बाजूबंद, मांगटिका, कडा, झुमके, ब्रेसलेट, हारसेट, कमरबंध, बाजूबंद, बांगड्या, इअरिंगची रेंज आहे. ब्लॅक मेटलमध्ये मल्टिऑक्सिडाईज सेट तसेच आकर्षक ज्वेलरीची क्रेझ दांडियाप्रेमींमध्ये आहे. नवरात्रात गरबा खेळण्यासाठी वेगवेगळे ड्रेस घ्यावे लागतात. हे ड्रेस खरेदी करण्यासाठी पैसे जास्त लागतात. पैशांची बचत करण्यासाठी दांडिया, गरबा खेळण्यासाठी ड्रेस भाड्याने मिळण्याची सोय अमरावतीत आहे. दरदिवशी ३०० ते ५०० रुपयांपर्यंत भाडे आहे.

याशिवाय ज्वेलरीही भाड्याने मिळते. अनेकजण एक दिवस गरबा खेळण्यासाठी ड्रेस भाड्याने आणतात. नवरात्रीतील पेहरावावर घालण्यासाठी चांदीसह व ऑक्सिडाइज दागिन्यांची मागणी वाढली आहे. यामध्ये चांदीचे झुमके, रिंग, बिंदी, बांगड्या, हार, कमरपट्टा यासारख्या दागिन्यांना विशेष मागणी आहे. यासोबतच पेंटेड ज्वेलरीलाही मागणी आहे

**कपड्यांची किंमत अशी**

आकर्षक रंगांची वाढती क्रेझ भ



नवरात्रोत्सवात कपडे भाड्याने देण्याचा व्यवसाय करतो. दरवर्षी गरबा व दांडियाच्या कार्यक्रमात वाढच होत असल्याने या कपड्यांची मागणीही वाढली आहे. तरुणांमध्ये महिलांप्रमाणे नऊ दिवस नऊ रंगांची क्रेझ आहे. विशेष म्हणजे भाड्याने मिळणारे कपडे, दागिन्यांना मागणी वाढत आहे. - अंबुसेठ सेदानी, व्यावसायिक.

चांदीसह ऑक्सिडाइज दागिन्यांना गरबाप्रेमींकडून दिले जाते प्राधान्य.

# खामगावच्या शासकीय तंत्रनिकेतनला राष्ट्रीय प्रमाणन संस्थेच्या पथकाची भेट



संगणक व विद्युत विभागांना उत्कृष्ट मानांकन मिळण्याची शक्यता

**महासागर प्रतिनिधी, खामगाव, दि. १६ :** शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव येथे १२ ते १४ सप्टेंबरदरम्यान नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडीटेशन, नवी दिल्लीच्या पथकाने भेट दिली. संगणक आणि विद्युत विभागांना मानांकन मिळवून देण्यासाठी ही तपासणी झाली. पथकात एक चेअरमन आणि दोन विषयतज्ज्ञांचा समावेश होता. प्राचार्य डॉ. समीर प्रभुणे यांनी संस्थेची माहिती सादर केली. पथकाने विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळाली. १२ व १३ सप्टेंबर रोजी चेअरमन यांनी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सुविधा, समित्यांच्या फाईली, कागदपत्रे, कार्यालयीन विभाग, कोषागार, शिष्यवृत्ती, पगारपत्रक यांची पाहणी केली. संगणक व विद्युत विषयतज्ज्ञांनी प्रयोगशाळा, अध्यापन पद्धती, अभ्यासक्रम नियोजन, व्याख्याने, सत्रे, अंतर्गत मूल्यमापन याची तपासणी केली. विद्यार्थ्यांशी संवाद साधला. १३ सप्टेंबर रोजी माजी विद्यार्थी, उद्योजक व पालकांची सभा झाली. अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांची स्वतंत्र बैठकही झाली.

१४ सप्टेंबर रोजी एक्झिट मिटींग झाली. संस्थेची धोरणे, प्रशासन, गुणवत्ता हमी प्रणाली, अभिप्राय यंत्रणा, सामाजिक बांधिलकी यावर चर्चा झाली. संस्थेच्या ताकदी व कमकुवत बाजूंवर प्रकाश टाकण्यात आला. समितीची भूमिका समाधानकारक वाटली. संगणक व विद्युत विभागांना उत्कृष्ट मानांकन मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

याआधी अणू विद्युत विभागाला २०२३ मध्ये, स्थापत्य विभागाला २०२४ मध्ये मानांकन मिळाले आहे.

# २३२ हेक्टरवर जागतिक दर्जाचा पर्यावरण पर्यटन प्रकल्प



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूर महानगर क्षेत्रातील कोराडी (ता.कामठी) येथे पर्यावरणीय पर्यटन स्थळ (ईकोटुरिझम) विकसित करण्यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) आणि महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (महाजनको) यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबईत सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी नागपूरचे पालकमंत्री नचंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.

या करारानुसार पर्यटनस्थळ विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीची २३२.६४ हे.आर. जागा नागपूर प्रदेश विकास प्राधिकरणाला ३० वर्षाच्या भाडे करारावर प्रतिवर्ष एक रुपए भाडेपट्ट्यावर हस्तांतरीत करण्यात येणार आहे. महाजेनको कंपनीने भाडे कराराने दिलेली जागा कोराडी, महादुला, खापरखेड़ा, नांदा (तालुका कामठी) आणि घोगली ता. नागपूर (ग्रामीण) या भागातील आहे. ही जमिन नैसर्गिक संसाधनांच्या सान्निध्यात असून, जागतिक दजार्चे पर्यावरणीय पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे.

या प्रकल्पात नॉन-मोटरायइड बोटिंग (पॅडल बोट्स, कायाक्स, कॅनू), पर्यावरणपूरक शिकारा आणि फ्लोटिंग डेक राइड्स, फ्लोटिंग प्लॅटफॉर्मवरून पक्ष्यांचे निरीक्षण, निसग पर्यटन आदींचा समावेश आहे.

प्राधिकरणाला दिलेली जमिन ही जमीन नागपूरच्या महत्त्वाच्या शहरी आणि नैसर्गिक संसाधनांच्या जवळ असल्यामुळे, जागतिक दर्जाचे पर्यावरण पर्यटन स्थळ म्हणून तिचा विकास केला जाणार आहे.

### सामंजस्य कराराचे तपशील

कराराची मुदतः सुरुवातीला ३०वर्षे, वार्षिक भाडे १ रुपया

महाजेनकोचे अधिकारः सध्याच्या थर्मल पॉवर स्टेशन आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्र यांच्यावर पूर्ण मालकी व नियंत्रण कायम राहणार.

प्राधिकरणाचे अधिकारः तलावाच्या जलपृष्ठभागाचा वापर फक्त पर्यावरण पर्यटन प्रकल्पासाठी करण्याचे विशेष हक्क एनएमआरडीएला दिले जातील. महाजेनकोच्या संचालक मंडळाने या प्रस्तावास मान्यता दिली आहे.

# नवीन अमृत भारत एक्स्प्रेस नागपूरमार्गे धावणार




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

भारतीय रेल्वेने जोगबनी (बिहार) आणि इरोड (तामिळनाडू) यांना जोडणारी एक नवीन अमृत भारत एक्सप्रेस सुरू केली आहे. ती ३,१०० किलोमीटर पेक्षा अधिक अंतर ६३.५ तासांत कापते. १६६०१/१६६०२ क्रमांकाची ही साप्ताहिक ट्रेन उत्तर-दक्षिण एक महत्त्वाचा दुवा प्रदान करेल. ही गाडी नागपूर मार्गे धावणार आहे. २२ कोच असलेल्या या रेकमध्ये ८ स्लीपर, ११ जनरल, एक पेंट्री कार, एक जनरेटर आणि दोन एसएलआर कोच असतील. ही कमी उत्पन्न गटांसाठी आहे.

सोमवारी दुपारी ३.३० वाजता जोगबनी येथून ०६६०२ जोगबनी-इरोड ही पहिली विशेष गाडी रवाना झाली. बुधवारी पहाटे ३.४५ वाजता ही गाडी नागपूरला पोहोचेल आणि पहाटे ३.५० वाजता निघेल आणि नंतर सेवाग्राम, चंद्रपूर आणि बल्लारशाह येथे जाईल.

या सेवेमुळे मध्य भारतातील, विशेषतः नागपूरमधील प्रवाशांना बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, तेलंगाना, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूमधील प्रमुख शहरांशी थेट कनेक्टिव्हिटी मिळेल आणि त्यामुळे त्यांना फायदा होईल. झेडआरयूसीसी एसईसीआरचे सदस्य ब्रजभूषण शुक्ला म्हणाले की, नागपूरमधील प्रवाशांसाठी ही एक महत्त्वाची लिंक असेल. या रेकमध्ये नागपूरसह अनेक स्थानकांवर पाण्याची व्यवस्था असेल.

भारतीय रेल्वेने अमृत भारत एक्सप्रेसच्या माध्यमातून देशभरात प्रवासाच्या नव्या पर्वाची सुरुवात केली आहे. ही नॉन-एसी सुपरफास्ट ट्रेन स्वस्त, जलद आणि आरामदायी प्रवासाचा पर्याय देत आहे. महाराष्ट्रात लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई येथून बिहारमधील सहरसापर्यंत ही सेवा सुरू करण्यात आली आहे.

दर शुक्रवारी दुपारी १२ वाजता ही ट्रेन मुंबईहून रवाना होते आणि रविवारी सकाळी सहरसाला पोहोचते. महाराष्ट्रात ठाणे, कल्याण, नाशिक रोड, जळगाव आणि भुसावळ येथे थांबे आहेत. ट्रेनमध्ये २२ बोगी असून स्लीपर आणि चेअरकार कोच आहेत. प्रवासाचा कालावधी सुमारे ३८ तासांचा असून तिकीट दर सामान्य प्रवाशांना परवडणारे आहेत.

देशभरात अशा आणखी १५० अमृत भारत एक्सप्रेस गाड्या सुरू करण्याचा रेल्वेचा मानस आहे. ही सेवा विशेषतः उत्तर भारतातील प्रवाशांसाठी उपयुक्त ठरणार असून मुंबईतील रोजगार, शिक्षण आणि व्यवसायासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. अमृत भारत एक्सप्रेस ट्रेनमध्ये एकूण २२ कोच असतात, ज्यामध्ये स्लीपर आणि जनरल अनारक्षित कोचचा समावेश आहे. प्रत्येक फेरीत ही ट्रेन सुमारे १,८०० प्रवाशांना वाहून नेण्याची क्षमता ठेवते. ही सेवा नुकतीच सुरू झाल्यामुळे एकूण किती प्रवाशांनी या गाडीचा वापर केला आहे याची अचूक आकडेवारी अद्याप उपलब्ध नाही. मात्र, या ट्रेनच्या लोकप्रियतेमुळे आणि स्वस्त दरामुळे दर आठवड्याला हजारो प्रवासी या सेवेचा लाभ घेत आहेत.

# ॲलोपॅथी डॉक्टरांच्या राज्य संघटनेची सूत्र महिलेच्या हाती

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :



नागपूरकर असलेल्या डॉ. मंजूषा प्रमोद गिरी यांनी इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) महाराष्ट्राच्या अध्यक्षपदाची निवडणूक मोठ्या फरकाने जिंकली आहे. त्या आयएमए महाराष्ट्रच्या इतिहासातील पहिल्या महिला अध्यक्षा ठरल्या आहेत. नागपुरातील प्रसिद्ध न्यूरोडेव्हलपमेंटल बालरोगतज्ज्ञ आणि किशोरवयीन मुलांच्या समुपदेशक म्हणून डॉ. मंजुषा गिरी कार्यरत आहेत. नागपुरातील न्यूरॉन ब्रेन स्पाईन अँड क्रिटिकल केअर सेंटरच्या त्या संचालिका आहेत. २०२४- २५ मध्ये त्यांनी आयएमए नागपूरचे अध्यक्षपद भूषविले होते. डॉ. गिरी यांच्याकडे वैद्यकीय कौशल्य, प्रशासकीय अनुभव आणि वैद्यकीय समुदायाला बळकट करण्याची दूरदृष्टी आहे. त्या आयएमए महाराष्ट्रच्या अध्यक्षपदाची नोव्हेंबर २०२६ मध्ये अधिकृतपणे पदभार स्वीकारतील. त्यांच्या निवडीबाबत नागपुरातील वैद्यकीय क्षेत्रासह इतरही क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत केले आहे. आयएमएच्या नागपूर शाखेच्या अध्यक्ष असतांना त्यांनी किशोयवयीन मुलांमध्ये शालेय पातळीवर जनजागृतीबाबत विशेष मोहीम राबवली होती. त्या स्वतः शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होत्या. डॉ. मंजुषा गिरी म्हणाल्या, हा माझा विजय नाही, तर प्रत्येक आयएमए सदस्याचा, माज्या पाठीशी असलेल्या माज्या कुटुंबीयांचा आणि मित्रांचा आहे.

# आधुनिक संत्रा केंद्र उभारण्याच्या योजनेस दोन वर्षे मुदतवाढ

## नागपूर, काटोल, कळमेश्वर, मोर्शी, संग्रामपूर येथे प्रक्रिया प्रकल्प उभारणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

नागपूर, काटोल व कळमेश्वर (जि.नागपूर), मोर्शी (जि.अमरावती) आणि संग्रामपूर (जि.बुलढाणा) येथे आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारण्याच्या योजनेस आणखी दोन वर्षांची मुदत वाढ देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

अमरावती, नागपूर, अकोला आणि बुलढाणा या जिल्ह्यात संत्र्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. संत्रा फळाचे सुमारे २५ ते ३० टक्के नुकसान काढणी पश्चात होते. हे नुकसान टाळण्यासाठी नागपूर, काटोल, कळमेश्वर, मोर्शी, संग्रामपूर येथे आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्यात येऊन त्यासाठी २० कोटी रुपये निधी दिला जाईल, अशी घोषणा २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली होती.

त्यानुसार २७ डिसेंबर, २०२३ रोजी याबाबतचा शासन निर्णय काढण्यात आला होता. या योजनेसाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ नोडल एजन्सी म्हणून काम करीत आहे. या केंद्रांसाठीच्या योजनेत ३९.९० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता. आता या योजनेत सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेत सन २०२५-२६ आणि सन २०२६-२७ या दोन आर्थिक वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे.

संत्र्यांच्या उपपदार्थावरील प्रकल्प रद्द करण्यास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पासाठीची रक्कम दीड कोटी रुपये दुय्यम प्रक्रिया प्रकल्पाकरिता वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच दुय्यम प्रकल्पाकरिता १ कोटी ५८ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली. पूर्वी १६ दुय्यम प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली होती. मात्र आता नागपूर, काटोल व कळमेश्वर (जि.नागपूर), मोर्शी (जि.अमरावती) आणि संग्रामपूर (जि.बुलढाणा) हे पाच दुय्यम प्रकल्प निश्चित करण्यात आले आहेत.

## नागपूरला गॅस पाईपलाईनचे दुहेरी गिफ्ट

# ओडिशाचा धामरा पोर्ट नागपूरात

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :

नागपूरसह विदर्भवासीयांना येत्या नववर्षात दुहेरी गॅस पाईपलाईनचे गिफ्ट मिळणार आहे. पुढील तीन महिन्यात नागपूर पश्चिम भागातील पोर्टसह पूर्व भागातील पोर्टलाही कनेक्ट होत असल्यामुळे थेट पाईपलाईनच्या माध्यमातून नागपूरकरांना गॅसचा अविरत पुरवठा होईल. पूर्व किनारट्टीवरील ओडिशामधील अदानी समूहाच्या धामरा पोर्टच्या माध्यमातून नागपूरच्या भविष्यातील ऊर्जेच्या गरजा पूर्ण होणार आहेत. गॅस ॲथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड (गेल) मुंबई ते झारसुगुडा (ओडिशा) पर्यंत नैसर्गिक वायूची पाइपलाइन टाकत असल्याने पश्चिम व पूर्व दोन्ही किनाऱ्यावरून गॅस मिळणार आहे.

पश्चिम किनाऱ्यावर तरल नैसर्गिक वायू (एलएनजी) टर्मिनल रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळमध्ये तर पूर्व किनाऱ्यावर ओडिशातील धामरा पोर्ट आहे. दाभोळ मुंबईतील पाईपलाईनशी तर धामरा झारसगुंडा येथील पाईपलाईनशी जुळलेला आहे. नागपूरला दाभोळहून गॅस मिळेल. नागपूर-जबलपूर व नागपूर-झारसुगुडा पाइपलाइन पुढील दोन ते तीन महिन्यांत तयार होतील. झारसुगुंडा आधीच धामराशी गॅस पाइपलाइनद्वारे जोडलेले आहे आणि त्यानंतर नागपूरलाही धामराहून गॅस मिळू लागेल.

धामरा एलएनजी टर्मिनलची क्षमता प्रतिवर्ष ५० लाख टन (एमटीपीए) आहे. आतापर्यंत धामरामध्ये एकूण २३ लाख टन एमटीपीए हाताळले आहे आणि त्यामुळे विदभार्ची गॅसची गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशी क्षमता उपलब्ध आहे. हे टर्मिनल २०२३ मध्ये ६ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणूकीने सुरू झाले होते, जे १० हजार कोटी रुपयांत बांधलेल्या धामरा पोर्टचाच एक भाग आहे.

टर्मिनलवर ही एलएनजी-१६५ अंश सेल्सिअस तापमानात साठवली जाते. याचे तापमान नियंत्रित करून ते द्रवरूपातून वायुरूपात बदलले जाते आणि नंतर गेलला पुरवठा केला जातो. अदानीचे एलएनजी टर्मिनल रिटेल, औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांसाठी गॅस उपलब्धतेत वाढ करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल.

# गोंदिया ते इंदूर-बंगळुरू विमानसेवा सुरू




■ महासागर प्रतिनिधी,
गोंदिया, दि. १६ :

इंडिगो एअरलाईन्स सारख्या प्रतिष्ठित कंपनीची गोंदिया ते हैदराबाद दैनंदिन विमानसेवा सुरू असतानाच आता स्टार एअर कंपनीने आज मंगळवार, १६ सप्टेंबरपासून गोंदिया ते इंदूर-बंगळुरू विमानसेवा सुरू केली आहे. ही विमानसेवा आठवड्यातून मंगळवार, बुधवार आणि शुक्रवार या तीन दिवसांसाठी असेल. येथील बिरसी विमानतळावरून उड्डाण घेतलेले विमान इंदूरला पोहोचेल आणि अर्ध्या तासानंतर हेच विमान इंदुरहून बंगळुरूलाही रवाना होईल.

हे विमान इंदूरहून संध्याकाळी ५ वाजता उड्डाण करेल आणि गोंदियातील बिरसी विमानतळावर ५.५५ वाजता उतरेल, तर गोंदियाहून ६.२५ वाजता उड्डाण करेल आणि ७.२० वाजता इंदूरला पोहोचेल. अर्ध्या तासानंतर हेच विमान बंगळुरूला उड्डाण करेल. अशा प्रकारे, गोंदियाचा प्रवास अवघ्या ५५ मिनिटांत पूर्ण होईल. गोंदिया-इंदूर उड्डाणाकरिता आज पहिल्याच दिवशी एकूण ४४ प्रवाशांनी नोंदणी केली होती. सध्या स्टार एअरलाईन्सने गोंदिया ते इंदूर अशी तीन दिवसांसाठी विमानसेवा सुरू केली आहे, जी लवकरच नियमित दैनंदिन सेवेत रूपांतरित होईल.

### २० सप्टेंबरपासून गोंदिया ते हैदराबाद विमानसेवा दररोज

गोंदियामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे बिरसी विमानतळ आणि वैमानिक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. एअर इंडिया विमान अपघातानंतर बिरसी विमानतळावरील गोंदिया ते हैदराबाद विमानसेवा आठवड्यातून तीन दिवस करण्यात आली होती. आता २० सप्टेंबरपासून इंडिगोची विमाने बिरसी विमानतळावरून हैदराबादला नियमितपणे उड्डाण घेतील. विमानांमध्ये सतत येणाऱ्या समस्यांमुळे, खबरदारीचा उपाय म्हणून इंडिगोने त्यांच्या सेवेत बदल केले आणि २ जुलैपासून पुढील आदेश येईपर्यंत, दररोज चालवल्या जाणाऱ्या इंडिगोच्या उड्डाणे आठवड्यातून फक्त तीन दिवस चालवल्या जात होत्या.

## आयुध निर्माणीच्या माजी महासंचालकांच्या घरी चोरी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :

आयुध निर्माणीचे माजी महासंचालक (डीजी) यांच्या घरी अज्ञात आरोपींनी चोरी केली. कुलूप तोडून घरातील रोख 20 हजार रुपये, हिरे, ६४३ ग्रॅम सोन्याचे दागिने, २ किलो २०० ग्रॅम चांदीचे दागिने असा एकूण ३१ लाख ४३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. ही खळबळजनक घटना कोराडी ठाण्याच्या हद्दीत घडली. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच कोराडी पोलिस घटनास्थळी पोहोचले. फॉरेन्सिक, श्वान आणि अंगुलिमुद्रा पथकानेही घटनास्थळी पोहोचून पाहणी केली. चोरांनी रेकी करून घरफोडी केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये ४ आरोपी घरात शिरताना दिसत आहेत. पोलिसांनी हिमांशू चौधरी (७२) रा. शिल्पा सोसायटी, स्मृतीनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# १९ सप्टेंबरला अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे चिंतन शिबीर

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तारीख जरी जाहीर झाली नसली, तरी सर्व प्रमुख पक्षांनी त्यासाठी पूर्वतयारी सुरू केली आहे. सत्ताधारी महायुती तर यात अग्रस्थानी आहे, ही निवडणूक एकत्र लढणार असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले असले तरी, बलस्थान असलेल्या शहरात हे तीनही पक्ष स्वतंत्र लढण्याच्या मानसिकतेत आहेत.

भाजपसाठी नागपूर तर अजित पवार यांच्यासाठी पुणे महापालिका महत्वाची आहे. महायुती झाली तर जास्तीत जास्त जागा पदरी पडाव्या म्हणून आत्तापासूनच डावपेच आखले जात आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा बालेकिल्ला असलेल्या, नागपुरात १९ सप्टेबरला अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे चिंतन शिबीर आयोजित केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका हा शिबिराचा महत्वाचा उद्देश आहे.

लोकसभा निवडणुकीत विदर्भात एकही जागा न लढवणाऱ्या अजित पवार यांच्या पक्षाला विधानसभेत मात्र आश्चर्यकारकरित्या सहा जागा मिळाल्या. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने पक्षाचा विस्तार करण्याचा या पक्षाचा प्रयत्न आहे, त्याचाच एक भाग म्हणून पक्षाचे चिंतन शिबीर नागपुरात आयोजित करण्यात आले आहे. राष्ट्रवादी हा ग्रामीण भागावर जोर देणारा पक्ष असला तरी नागपूर महापालिकाही त्यांच्या अजेंड्यावर आहेच. येथे पक्षाची स्थिती जेमतेम आहे, त्यात प्राण पुंकण्याचा प्रयत्न चिंतन शिबिराच्या माध्यमातून केला जाऊ शकतो. बरखास्त महापालिकेत एकसंघ राष्ट्रवादी काँग्रेसचा ऐकमेव नगरसेवक होता. तो सध्या शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात ११ मंडळात अतिवृष्टी



■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १६ :

बुलढाणा जिल्ह्यात अनेक गावात सोमवारी रात्री वरुण राजा कोपला. जिल्ह्यातील तब्बल ११ महसूल मंडळात जोरदार पाऊस झाला. मलकापूर तालुक्यातील जांभूळधाबा महसूल मंडळात पावणे दोनशे मिलिमिटर पावसाची नोंद झाली आहे. मंगळवारी सकाळी साडे आठ वाजता संपलेल्या गत २४ तासात जिल्ह्यात एकूण ४४३ मिमी पावसाची नोंद झाली. मलकापूर मंडळात १२३.५ मिमी, नरवेल मंडळात ७९, धरणगाव मंडळात ७९.३ मिमी पाऊस झाला. सिंदखेड राजा तालुक्यातील सिंदखेड राजा मंडळात १५२ मिमी, दुसरबीड मंडळात ६५.५ मिमी, किनगाव राजा मध्ये ६९.८ मिमी, देऊळगाव राजा तालुक्यातील तुळजापूर मंडळात १५२ मिमी, अंढेरा मंडळात ६९ मिमी, चिखली तालुक्यातील पेठ मंडळात ६९ मिमी तर मोताळा तालुक्यातील शेलापूर मंडळात ६५. ८ मिमी पावसाची नोंद झाली.

**Med-Pro College of Nursing. Nagpur.**
**ADMISION NOTICE 2025-26**
**(PB B.Sc. NURSING)**
Application are inviting from eligible candidate for the admission to **PB BSc Nursing** course for the 2025-26 academic. Application form is available from Principal office from 16.09.2025 in working Hours Till 25.09.2025 upto 01.00 PM Last date of admission 29.09.2025
**Note: NO SOFT COPY. Intrested candidate can contact on below Numbers and to the Principal office directly.**
**Contact with Originals at :**
Vidhya Nagar, Nandanvan, Nagpur
Email: hrsanstha@gmail.com, 8999699735, 9325416849.

## खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्यावतीने पहिल्यांदाच

# शिववैभव किल्ले स्पर्धेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :




किल्ल्यांचे भारतीय इतिहासात अतिशय महत्त्वाचे स्थान राहिले असून स्वराज्य स्थापनेच्या काळात हे किल्ले राजकीय, लष्करी व सामाजिक केंद्र ठरले होते. शत्रूंच्या आक्रमणापासून संरक्षण, प्रशासनाचे संचालन आणि जनतेचा आत्मविश्वास दृढ करणारे हे किल्ले आजही शौर्य, पराक्रम आणि स्वातंत्र्याचे प्रतीक मानले जातात. या वारशाचे स्मरण ठेवण्यासाठी आणि नव्या पिढीला त्याची जाणीव करून देण्यासाठी खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्यावतीने यंदा पहिल्यांदाचा शिववैभव किल्ले स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून कला, साहित्य, संस्कृती, परंपरांचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने दरवर्षी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले जाते. तसेच, गणेशोत्सव, शारदोत्सव, दुर्गोत्सवामध्ये मंडळांना विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. या सर्व उपक्रमाला नागपूरकरांनी उदंड प्रतिसाद दिला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांविषयी अभिमान, इतिहासाची जाण व सांस्कृतिक परंपरेची जपणूक रुजविण्याच्या तसेच, पर्यावरणपूरक व पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्याच्या माध्यमातून सर्जनशीलता व कल्पकता प्रोत्साहित करण्याच्या हेतुने यंदा दिपावलीच्या शुभ पर्वावर ही शिववैभव किल्ले स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी शिव किल्ले, वैदर्भीय किल्ले आणि काल्पनिक किल्ले असे तीन विषय ठेवण्यात आले आहेत. संस्थात्मक आणि खुल्या अशा दोन गटात ही स्पर्धा होईल. इच्छूकांनी या स्पर्धेसाठी २० ते ३० सप्टेंबर दरम्यान नोंदणी करावयाची आहे. किल्ला तयार करण्याची इच्छा असलेल्या स्पर्धकांना दोन ते तीन दिवसांचे प्रशिक्षणही दिले जाणार आहे. स्पर्धकांनी तयार केलेल्या किल्यांचे २५ ते ३० ऑक्टोबर दरम्यान परीक्षकांद्वारे परीक्षण केले जाईल. पर्यावरणपूरक व पुनर्वापर करता येणा-या साहित्याचा वापर करून किल्ले तयार करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. या स्पर्धेतील विजेत्यांना भरघोस बक्षिसे दिली जाणार असून प्रथम क्रमांकासाठी ५१,००० द्वितीय ३१,००० तर तृतीय क्रमांकासाठी २१,००० चे बक्षिस राहील. पाच प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जाणार असून त्यांना प्रत्येकी ५००० ची राशी दिली जाणार आहे. याशिवाय, काही विशेष बक्षिसेदेखील दिली जाणार आहेत. या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. नावे नोंदणीकरीता व अधिक माहितीकरिता नितीन गडकरी यांचे जनसंपर्क कार्यालय, सावरकर नगर, ऑरेंज सिटी हॉस्पिटल समोर, खामला चौक, नागपूर येथे २० ते ३० सप्टेंबर दरम्यान सकाळी १२ ते ३ या वेळेत संपर्क साधावा. पत्रकार परिषदेला प्रा अनिल सोले यांनी संबोधित केले.